



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, शुक्रवार ५ जून २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०


## TCS नंतर विप्रोमध्ये धर्मांतराचा आरोप

### इस्लाम स्वीकारण्यास, मुस्लीम व्यक्तीशी संबंध ठेवण्यास सांगितले, तक्रारीनंतर राजीनामा घेतला



**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यातील एका महिलेने विप्रो टेक्नॉलॉजीज कंपनीवर धार्मिक छळ, कामाच्या ठिकाणी भेदभाव आणि जबरदस्तीने राजीनामा घेतल्याचा आरोप केला आहे. ही महिला यापूर्वी या कंपनीत काम करत होती. हे आरोप पुण्यातील हिंदू जनजागृती समितीने आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेदरम्यान करण्यात आले. यावेळी, माजी कर्मचा-याने हिंजवडी कार्यालयात काम करत असताना तिच्यासोबत घडलेल्या घटनांची माहिती दिली. यानंतर, पुण्यातील हिंजवडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. माजी कर्मचा-याच्या वकिलांनी सांगितले की, कंपनीला कायदेशीर नोटीस देखील पाठवण्यात आली आहे. त्यांनी ५० लाख रुपये नुकसानभरपाईची मागणी केली आहे.

पीडित महिला म्हणाली- ऑगस्ट २०२५ मध्ये कंपनीच्या एका टीम मीटिंगमध्ये बोलावण्यात आले होते. यावेळी, माझ्यावर राजीनामा देण्यासाठी दबाव टाकण्यात आला. मला माझी बाजू मांडण्याची संधी दिली नाही आणि राजीनामा घेण्यात आला.ऑफिसमध्ये इस्लाम धर्म स्वीकारण्यासाठी दबाव टाकला जात होता

पीडित महिलेने आरोप केला की, तिची एक महिला सहकारी अनेक वेळा तिच्यावर इस्लाम स्वीकारण्यासाठी आणि एका मुस्लिम पुरुषासोबत संबंध ठेवण्यासाठी दबाव टाकत होती. तिचे म्हणणे आहे की, सहकारी वारंवार तिच्या खासगी आयुष्यात ढवळाढवळ करत होती आणि तिला हिंदू धर्म सोडायला सांगत होती. महिलेनुसार, सहकारी म्हणत होती की असे केल्याने तिचे आयुष्य चांगले होईल आणि तिला परदेशात जाण्याची संधी मिळेल.

***१० महिन्यांपर्यंत छळ सहन केल्याचा आरोप-*** महिलेने आरोप केला की, या प्रकरणाची माहिती कंपनीच्या वरिष्ठ अधिका-यांनाही देण्यात आली होती, परंतु तिच्या तक्रारीवर कोणतीही कारवाई झाली नाही. याउलट, कंपनीच्या ओम्बड्स कमिटीमध्ये तिच्याविरुद्धच तक्रार दाखल करण्यात आली. तर, हिंजवडी पोलिसांनी तक्रार मिळाल्यानंतर प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. (पान २ वर)




**मुंबई/प्रतिनिधी :** विधान परिषदेच्या १७ स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या निवडणुकीत गुरुवारचा अर्ज माघारीचा शेवटचा दिवस नाट्यमय घडामोडींनी गाजला. ठाणे, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, पुणे, यवतमाळ, छत्रपती संभाजीनगर, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली या मतदारसंघात आघाडीच्या अधिकृत उमेदवारांनी माघार घेतल्याने मतदानाआधीच ५ जागा गमावण्याची नामुष्की ओढवली.

निवडणूक रिंगणातून माघार घेण्याच्या उमेदवारांच्या निर्णयाची गंभीर दखल घेत शिवसेना ठाकरे पक्षाने कोकणातील उमेदवार बाळ माने आणि संभाजीनगरच्या देवयानी डोणगावकर आणि कृष्णा डोणगावकर यांची हकालपट्टी केली. दरम्यान, उमेदवारांनी माघार घेतल्याने ठाणे, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, पुणे, यवतमाळ, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली या ५ मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले. विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघासाठी येत्या १८ जून रोजी मतदान होत आहे. या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची आज शेवटची मुदत होती. त्यामुळे आज लढतींचे चित्र स्पष्ट झाले. १७ पैकी पाच मतदारसंघात एकच उमेदवार रिंगणात असल्याने येथील निवडणूक बिनविरोध झाली. त्यामुळे उर्वरित १२ मतदारसंघात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी किंवा अपक्ष उमेदवार असा सामना होईल. महायुतीला अनेक मतदारसंघातील बंडखोरी शमविण्यात यश आले. त्यामुळे या निवडणुकीत महायुतीचे पारडे जड आहे.

**ठाकरे गटाला फटका-** विधान परिषद निवडणुकीत शिवसेना ठाकरे गटाला सार्वधिक फटका बसला. नाशिक मतदारसंघात उमेदवार जाहीर होउनही ठाकरे गटाच्या उमेदवाराने अर्ज दाखल केला नव्हता. त्यानंतर रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग आणि छत्रपती संभाजीनगरच्या अधिकृत उमेदवारांनी चकवा दिला रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्गमधून ठाकरे गटाने माजी आमदार बाळ माने यांना उमेदवारी दिली होती. मात्र, माने यांनी मातोश्रीला अंधारात ठेवून माघार घेतली.

# महायुतीचे 5 उमेदवार बिनविरोध



### बिनविरोध निवडून आलेले ऊमेदवार

रायगड- रत्नागिरी-सिंधुदुर्ग- अनिकेत तटकरे (राष्ट्रवादी अजित पवार गट)
ठाणे- रवींद्र फाटक (शिवसेना शिंदे गट)
पुणे- विक्रम काकडे (राष्ट्रवादी अजित पवार गट)
यवतमाळ- दुष्यन्त चतुर्वेदी (शिवसेना शिंदे गट)
वर्धा- गडचिरोली-चंद्रपूर- अरुण लखानी (भाजप)

### विधान परिषदेच्या लढती

- **सोलापूर :** राजेंद्र राउत (भाजप) विरुध्द वसंतराव देशमुख (राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार)
- **अहिल्यानगर -**प्राजक्त तनपुरे (भाजप) विरुध्द दत्तात्रय पानसरे (अपक्ष)
- **जळगाव :** नंदकिशोर महाजन (भाजप) विरुद्ध शरद तायडे (ठाकरेंची शिवसेना) विरुद्ध रेश्मा काळे (शिंदेंची शिवसेना बंडखोर)
- **सांगली-सातारा :** धैर्यशील कदम (भाजप)विरुध्द अभयसिंह जगताप (राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार) विरुद्ध किशोर धुमाळ (अपक्ष)
- **नांदेड :** अमर राजूरकर (भाजप) विरुद्ध रामदास पाटील-सुखटनकर (काँग्रेस)
- **भंडारा-गोंदिया :** नरेश ईश्वरकर (काँग्रेस पाठिंबा) विरुद्ध अविनाश ब्राह्मणकर (भाजप)
- **नाशिक :** गोकुळ गीते (अपक्ष) विरुध्द नरेंद्र दराडे (शिवसेना)
- **अमरावती :** हर्षदीप देशमुख (काँग्रेस) विरुध्द प्रवीण पोटे (भाजप) विरुद्ध निलेश विश्वकर्मा (वंचित )
- **धाराशिव-लातूर-बीड :** बसवराज पाटील (भाजप) विरुद्ध महेश देशमुख (काँग्रेस)
- **परभणी-हिंगोली :** सईद खान (शिवसेना) विरुध्द डॉ. विवेक नावंदर ( शिवसेना ठाकरे गट ) विरुद्ध सुशील देशमुख (अपक्ष)
- **छत्रपती संभाजीनगर-जालना :** सुहास शिरसाट (भाजप) विरुध्द गणेश लोखंडे (शिवसेना ठाकरे गट )
- **नागपूर (पोटनिवडणूक) :** डॉ. राजीव पोतदार (भाजप) विरुध्द अतुल लोंढे (काँग्रेस)

त्यामुळे ठाकरे गटाने माने यांच्यावर पक्षविरोधी कारवाया केल्याचा ठपका ठेवत पक्षातून हकालपट्टी केली.

**छ. संभाजीनगरमध्ये लोखंडे मैदानात-** शिवसेना ठाकरे गटाने छत्रपती संभाजीनगरमधून देवयानी कृष्णा पाटील डोणगावकर यांना उमेदवारी दिली होती. निवडणुकीत त्यांचा अर्ज वैध ठरला होता. मात्र, देवयानी पाटील डोणगावकर यांनी आज अर्ज मागे घेण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे शिवसेना ठाकरे गटाने देवयानी आणि कृष्णा पाटील या दोघांवर कारवाई करत बाहेरचा रस्ता दाखवला असून येथे गणेश लोखंडे हे आता ठाकरे गटाचे अधिकृत उमेदवार आहेत.

**ठाणे, पुण्यात शरद पवार गटाचे पांढरे निशाण-** विधान परिषदेच्या ठाणे आणि पुणे स्थानिक प्राधिकारी मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या उमेदवारांनी आज पांढरे निशाण दाखवले. ठाण्याचे उमेदवार अभिजित पवार आणि पुणे मतदारसंघातील उमेदवार श्रीकांत पाटील यांनी आज आपले (पान २ वर)

## प्रतीक्षा संपली, अखेर मान्सून केरळमध्ये दाखल

**मुंबई/प्रतिनिधी :** अखेर मोठ्या प्रतीक्षेनंतर केरळमध्ये मान्सून दाखल झाला. केरळमध्ये मान्सून ३ दिवस उशिराने दाखल झाला. याबाबत बोलताना प्रवीण कुमार वैज्ञानिक हवामान विभाग यांनी म्हटले की, मान्सून केरळमध्ये आला आहे. दक्षिण महाराष्ट्रात पुढच्या काही दिवसांत मान्सून दाखल होईल. विदर्भात १५ जूननंतरच मान्सून दाखल होण्याची शक्यता आहे. पुढचे २ ते ३ दिवस विदर्भातील काही जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट असून जोरदार वा-यासह हलक्या पावसाचा अंदाज आहे. विदर्भातील जिल्ह्यात ढगाळ वातावरण असले तरी सध्या असेच तापमान कायम असेल, ४० ते ४२ डिग्री पर्यंत उन्हाचा पारा असेल. विदर्भात पुढील काही दिवस वादळीवा-याचा मध्यमस्वरूपाचा पाउस होईल. विदर्भासह राज्यात १५ जूनच्या आसपास मान्सून दाखल होईल. वर्धा, चंद्रपूर, यवतमाळ या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. मध्यम स्वरूपाचा पाउस आणि वादळी वारा असणार आहे. पण अवकाळी पाउस असेल, हा मान्सून पूर्व पाउस नसेल. विदर्भाला मान्सूनसाठी अजून प्रतीक्षा कायम असणार आहे, मात्र १० जूननंतर परिस्थितीच्या अनुषंगाने याचा अंदाज घेता येईल. विदर्भातील काही जिल्ह्यांत येत्या २४ तासांत काही ठिकाणी वादळासह तुरळक पावसाचा हवामान विभागाचा अंदाज आहे. उत्तर प्रदेशपासून विदर्भ होत रायलसीमापर्यंत उंचावर सायक्लोनिक सर्क्युलेशन (पान २ वर)



## ऊमेदवार पळाल्याने यवतमाळात महाविकास आघाडी रस्त्यावर; सात खोके घेतल्याचा आरोप



**यवतमाळ/प्रतिनिधी :** विधान परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार साहेबराव कांबळे यांनी बुधवारी निवडणुकीतून माघार घेतली. यामुळे संतापलेल्या महाविकास आघाडीच्या नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी गुरुवारी यवतमाळातील दत्त चौक येथे रस्त्यावर उतरून निदर्शने केली. ७ खोके एकदम ओके असे नारे लावले. यासोबतच जिल्हाधिकारी विकास मीना यांना निवदेन देउन याची सखोल चौकशी करण्याची मागणी केली. माघार घेत असताना कोणत्याही पक्षाला विश्वासात न घेता विरोधी पक्षातील लोकांना सोबत घेउन त्यांनी हा निर्णय घेतला. यामध्ये कुठेतरी आर्थिक प्रलोभन आणि दडपशाही अशा दोन्ही मार्गाचा वापर करून महायुती सरकारने लोकशाहीचा गळा दाबला आहे. याचा निषेध महाविकास आघाडीच्या वतीने यवतमाळ येथील दत्त चौकात करण्यात आल्याचे काँग्रेस जिल्हाध्यक्ष अॅड. सचिन नाईक यांनी सांगितले. आंदोलनात सर्व मतदार नगरसेवक, गटनेते, महाविकास आघाडीचे नेते उपस्थित होते. शिवसेना संपर्क प्रमुख राजेंद्र गायकवाड, जिल्हाप्रमुख किशोर इंगळे, संजय ठाकरे, जितेंद्र मोघे, राहुल ठाकरे, आरिज बेग, संजय वानखेडे, प्रा.डॉ. बबलू देशमुख, वैशाली सवई, कुणाल जानकर, शशांक केंढे,सय्यद रियाझ, कुशाल ठाकरे, रहमान शाह, जयराम मुनेश्वर, संजय महल्ले आदी उपस्थित होते.

## बिनविरोध निवडणुकीसाठी भाजपकडून कोट्यवधींची ऑफर्स-हर्षवर्धन सपकाळ



**बुलढाणा /प्रतिनिधी-**भाजपची सर्वत्र सत्ता असतानाही आणखी सत्ता हवी या हव्यासापोटी ते लोकशाही मुल्ये पायदळी तुडवत आहेत. विधान परिषद निवडणूक बिनविरोध करण्यासाठी विरोधी पक्षांच्या उमेदवारांना कोट्यवधी रुपयांच्या ऑफर्स दिल्या जात आहेत, असा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी गुरुवारी केला. उमेदवारी अर्ज मागे घ्यावेत यासाठी भाजपने नैतिकता गुंडाळून सर्व हातखंडे वापरले आहेत. भाजपला इलेक्शन सिस्टिम नाही तर नॉमिनेशन सिस्टिम हवी आहे, असा घणाघातही त्यांनी केला. विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या निवडणुकीत उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या आजच्या शेवटच्या दिवशी महविकास आघाडीच्या अनेक उमेदवारांनी निवडणूक रिंगणातून माघार घेतली. यासंदर्भात आज बुलडाणा येथे प्रसार माध्यमांशी बोलताना सपकाळ यांनी उमेदवारांच्या माघारीला भाजपला जबाबदार धरले. विधान परिषदेच्या सध्या सुरु असलेल्या निवडणुकीचा मतदार स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडून गेलेले प्रतिनिधी असतात, हा मर्यादीत मतदार असतो. पण या निवडणुकीतही सत्ताधारी महायुतीकडून पैसा फेक तमाशा देख, चा खेळ खुलेआम सुरु आहे. विरोधी पक्षाच्या उमेदवारांनी अर्ज माघारी घ्यावेत यासाठी सत्ताधारी भाजप महायुतीने सत्ता, पैसा या सर्व तंत्राचा गैरवापर केला. घातपात, विश्वासघात, पैशाचे प्रचंड वाटप करण्यात आले. या निवडणुकीला सत्ताधारी महायुती अत्यंत विकृत पद्धतीने सामोरे जात असून हे चित्र लोकशाहीसाठी अजिबात चांगले नाही, अशी टीका सपकाळ यांनी केली.

## भारताच्या रूपयाची आशियात घसरण



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** संसदेच्या समितीच्या गुरुवारी झालेल्या बैठकीत रुपयाची घसरण आणि खासगी क्षेत्रातील गुंतवणुकीचा मंदावलेला वेग यावर चिंता व्यक्त करण्यात आली. देशाची अर्थव्यवस्था अधिक मजबूत होत असल्याचा दावा केंद्र सरकार सातत्याने करत आहे. त्या पार्श्वभूमीवर समितीचे निष्कर्ष महत्त्वाची मानले जात आहेत. भाजप नेते भ्रतृहरी माहताब या समितीचे अध्यक्ष आहेत. माहताब यांच्यासह अर्थ मंत्रालयाच्या आर्थिक व्यवहार खात्याच्या सचिव अनुराधा ठाकूर आणि मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन यांनी या बैठकीत देशाच्या अर्थव्यवस्थेविषयी सादरीकरण केले. यावेळी अर्थव्यवस्थेच्या विविध पैलूंवर चर्चा करण्यात आली. महागाई, चलनवाढ, पश्चिम आशियातील संघर्ष आणि चीनमधील उद्योगांचे संरक्षण करण्यासाठी त्या देशाने अलीकडे केलेले कठोर कायदे या मुद्द्यांवर बैठकीत चर्चा करण्यात आली. परिस्थिती निश्चितच आव्हानात्मक आहे, पण ही आव्हाने असताना देशाची अर्थव्यवस्था मजबूत आहे, असे माहताब यांनी बैठकीनंतर पत्रकारांना सांगितले.गेल्या वर्षाच्या तुलनेत घरगुती बचतीत वाढ झाली आहे आणि गुंतवणूकही वाढत आहे, असे माहताब म्हणाले. समितीची पुढील बैठक या महिन्याच्या तिस-या आठवड्यात होईल, अशी माहिती त्यांनी दिली. रुपयाच्या घसरणीबद्दल रिझर्व्ह बँक उपाययोजना करत आहे, असे माहताब यांनी सांगितले. (पान २ वर)

## बंगालमध्ये महाराष्ट्र पॅटर्न; 58 आमदारांचा 'खरे तृणमूल'चा दावा

### ऋतब्रत विधिमंडळ गटनेते



**कोलकाता/वृत्तसंस्था :**पश्चिम बंगाल निवडणुकीतील दारुण पराभवानंतर तृणमूल काँग्रेसमध्ये (टीएमसी) उफाळलेले अंतर्गत बंड बुधवारी निर्णायक वळणावर पोहोचले. पक्षातून निलंबित आमदार ऋतब्रत बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखाली ५८ असंतुष्ट आमदारांनी एकत्र येत विधानसभा अध्यक्ष रथिंद्र बोस यांना लेखी पत्र दिले. यात त्यांनी ऋतब्रत यांना आपले विरोधी पक्षनेते आणि विधिमंडळ गटनेते मानले. अध्यक्षांनी हा दावा स्वीकारला आहे. ऋतब्रत गटाने स्वतःला खरे तृणमूल म्हणून घोषित केले असून अखरुज्जमान यांची आपला मुख्य प्रतोद म्हणून नियुक्ती केली. याला प्रत्युत्तर म्हणून माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या गटाने राज्यातील टीएमसीच्या सर्व संघटनात्मक समित्या बरखास्त केल्या. मात्र, असंतुष्ट गटाने थेट ममतांच्या सर्वोच्च स्थानाला आव्हान दिले नाही. पत्रात त्यांना टीएमसी अध्यक्षा मानले गेले असून मुख्य सल्लागार म्हणून नेतृत्व करण्याची मागणी करण्यात आली आहे. ऋतब्रत यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, त्यांचा गट ममता यांचे भाचे अभिषेक बॅनर्जी यांचा अधिकार स्वीकारणार नाही. आणखी दोन आमदार आमच्यासोबत आहेत. दरम्यान, या घडामोडींवर उशिरापर्यंत ममता यांचे कोणतेही विधान आले नाही.



**१० वर्षांत देशातील चार मोठ्या राज्यांमध्ये पाच पक्षांत फूट :** उत्तर प्रदेशात **समाजवादी पक्षः** २०१६-१७ मध्ये काका-पुतण्याच्या लढाईत अखिलेश यादव यांनी पक्ष आणि सायकल चिन्हावर पूर्ण नियंत्रण मिळवले. शिवपाल यादव पुन्हा सपामध्ये परतले आहेत.

**बिहारमध्ये लोजपः** २०२१ मध्ये रामविलास पासवान यांच्या निधनानंतर काका पशुपती पारस यांनी चिराग यांना हटवले. चिराग आज मोदी मंत्रिमंडळात मंत्री आहेत.

**तामिळनाडूमध्ये अण्णाद्रमुकः** २०१७ मध्ये जयललिता यांच्यानंतर पलानीस्वामी कायदेशीर लढाई जिंकून पक्षाचे निर्विवाद प्रमुख बनले.

महाराष्ट्रामध्ये शिवसेना आणि राष्ट्रवादी : २०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांनी बंड केले. निवडणूक आयोगाकडून शिवसेना नाव आणि धनुष्यबाण मिळवून ते तेव्हा मुख्यमंत्रीही बनले. पण आज ते उपमुख्यमंत्री आहेत, तर उद्धव ठाकरे विरोधात आहेत. याचप्रमाणे २०२३ मध्ये अजित पवार यांनी काका शरद पवार यांच्याविरोधात बंड केले. ते खरे राष्ट्रवादी आणि घड्याळ चिन्हासह उपमुख्यमंत्री राहिले. अजित पवार आता नाहीत.

## संपन्न महाराष्ट्रासाठी पायाभूत सुविधांचे निर्मिती प्रकल्प गतीने पूर्ण करावेत-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



### पायाभूत सुविधा मुख्यमंत्री वॉर रूम बैठकीत विविध प्रकल्पांचा आढावा

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या संपन्नतेसाठी पायाभूत सुविधांच्या निर्मिती प्रकल्पांची कामे गतीने पूर्ण होणे गरजेचे आहे. संबंधित यंत्रणांनी प्रकल्प पूर्णत्वातील अडचणी दूर कराव्यात. कंत्राटदाराला देण्यात आलेल्या कालावधीत प्रकल्प पूर्ण झाला पाहिजे याकडे संबंधित यंत्रणांनी लक्ष द्यावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. विलंबाने काम पूर्ण करणा-या कंत्राटदारांना पुढील कुठलेही नवीन काम संबंधित यंत्रणेने देउ नये, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या. सह्याद्री अतिथिगृह येथे आयोजित पायाभूत सुविधा मुख्यमंत्री वॉर रूम बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस प्रकल्पांचा आढावा घेताना ते बोलत होते. कुठल्याही परिस्थितीत पायाभूत सुविधांचे प्रकल्प हा तीन ते साडेतीन वर्षांमध्ये पूर्ण झाला पाहिजे, असे निर्देश देउन मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, निविदा प्रक्रिया राबवताना त्यामध्ये कंत्राटदाराने मागील प्रकल्प पूर्ण करण्यासाठी लावलेल्या कालावधीच्या निकषाचाही समावेश असावा. कंत्राटदारांनी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी विलंब केल्यास देशाचे व पर्यायाने राज्याचे नुकसान होते. त्यामुळे कुठल्याही परिस्थितीत प्रकल्पाच्या पूर्णत्वामध्ये होणारा विलंब खपवून घेतला जाणार नाही. प्रकल्पाच्या पूर्णत्वामध्ये अनेक अडचणी असतात. मात्र यंत्रणांनी अडचणींवर मात करीत पुढे वाटचाल केली पाहिजे. धारावी झोपडपट्टी पुनर्विकास आढावा घेताना मुख्यमंत्री म्हणाले की, धारावी मधील उद्योजकांना स्टेट जीएसटी'मधून सवलत मिळण्याबाबत कार्यवाही करावी. यामुळे धारावीमधील उद्योगांना बळ मिळेल. तेथील 'इन्फार्मल इकानोमी' ही 'फॉर्मल' होईल. धारावी पुनर्विकाससंदर्भात निविदा प्रक्रियेत असलेल्या विषयांबाबत पुन्हा मंत्रिमंडळासमोर येण्याची आवश्यकता नाही,याबाबत यंत्रणेने संबंधित विभागांशी चर्चा करून समन्वयाने मुद्दे सोडवावेत. ना.म जोशी मार्ग, नायगाव, वरळी येथील बीडीडी चाळींचा पुनर्विकास करताना तेथील रहिवाशांना भाडे देउन सध्या राहत असलेली घरे विनाविलंब ताब्यात घेत तिथे पुनर्विकास सुरू करावा. ठाणे ते बोरीवली दुहेरी बोगदा प्रकल्प हा विहित असलेल्या कालमर्यादेत पूर्ण करण्यात यावा. यामध्ये पुढील तीन-तीन महिन्याचे उद्दिष्ट ठेवून काम पूर्णत्वास न्यावे. गोरेगाव ते मुलुंड दुहेरी बोगदा प्रकल्प जानेवारी २०२९ पर्यंत पूर्ण करण्यात यावा. त्यामुळे पश्चिम आणि पूर्व उपनगरांमधील दळणवळण सोयीचे होणार आहे. वांद्रे ते वर्सोवा सागरी सेतू मार्गाच्या कामांमध्ये प्रगती करावी. हा अत्यंत महत्त्वपूर्ण प्रकल्प असून यामधील अडचणी सोडविण्यात याव्यात. पायाभूत सुविधा निर्मिती प्रकल्पांच्या पूर्णत्वासाठी इंधनाचा पुरवठा सुरळीत राहण्याबाबत दक्षता घ्यावी, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या. (पान २ वर)

## राज्याचे माजी शिक्षणमंत्री अनंतराव थोपटे यांचे पुण्यात निधन



**पुणे/प्रतिनिधी :** भोर मतदारसंघासह जिल्ह्याच्या राजकारणात दबदबा असलेले, माजी शिक्षणमंत्री, पालकमंत्री, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अनंतराव थोपटे यांचे अल्पशा आजाराने गुरुवारी (४ जून) निधन झाले. ते ९३ वर्षांचे होते. थोपटे यांच्या निधनामुळे जिल्ह्याचा बुलंद आवाज हरपल्याची भावना काँग्रेसकडून व्यक्त करण्यात आली.अनंतराव थोपटे यांच्यावर दीनानाथ मंगशेकर रुग्णालयात गेल्या काही महिन्यांपासून उपचार सुरू होते. दोन दिवसांपासून त्यांची प्रकृती खालावली होती. उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली. भोर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार संग्राम थोपटे यांचे ते वडील होत. थोपटे यांचा जन्म ११ जानेवारी १९३३ रोजी झाला. ते काँग्रेसचे निष्ठांवत कार्यकर्ते होते. भोर विधानसभा मतदारसंघासह जिल्ह्याच्या राजकारणात त्यांचा एकेकाळी मोठा दबदबा होता. जिल्ह्यातील काँग्रेसची पक्षसंघटना मजबूत करण्यात थोपटे यांचे महत्त्वाचे योगदान होते. थोपटे यांनी भोर मतदारसंघातून सहा वेळा विजय मिळविला. राज्याच्या मंत्रिमंडळात त्यांनी १४ वर्षे विविध मंत्रीपदाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या. दुस-यांदा आमदार झाल्यानंतर त्यांना वसंतदादा पाटील यांच्या मंत्रिमंडळात स्थान मिळाले होते.



# विदर्भातील पाचही जागा जिंकणार

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**-संख्याबळाच्या जोरावर महायुतीचा विजय निश्चित**

**-बिनविरोध निवडणुकांसाठी काँग्रेसनेही विचार करावा**

**-विप्लव बाजोरिया प्रकरणात न्यायालयावर विश्वास**

नागपूर/प्रतिनिधीः-
महायुतीकडे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये स्पष्ट संख्याबळ असून विदर्भातील पाचही जागासह राज्यातील सर्व १७ जागांवर महायुतीचा विजय निश्चित असल्याचा विश्वास महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला.

महसूलमंत्री तथा नागपूर व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपूर विमानतळावर प्रसारमाध्यमांशी संवाद साधला.अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिवसाच्या पार्श्वभूमीवर बोलताना बावनकुळे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार तसेच भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी अपक्ष उमेदवारांशी चर्चा केली असून महायुतीतील बहुतांश अपक्ष उमेदवार आपले अर्ज मागे घेतील.ज्या ठिकाणी काँग्रेसची स्थिती स्पर्धात्मक नाही,त्या ठिकाणी काँग्रेसनेही बिनविरोध निवडणुकीचा विचार करावा,असे आवाहन त्यांनी केले.

ही निवडणूक जनतेची नसून संख्याबळावर आधारित असल्याने ज्या पक्षाकडे अधिक सदस्य आहेत,त्याच पक्षाचा विजय होणार असल्याचे त्यांनी सांगितले. नागपूर,भंडारा,अमरावतीसह राज्यातील सर्व १७ जागांवर महायुती विजयी होईल,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महाविकास आघाडीनेही वास्तववादी भूमिका घेतल्यास महाराष्ट्रात काही ठिकाणी बिनविरोध निवडणुका होऊ शकतात,असे ते म्हणाले. महायुतीतील बंडखोरीबाबत विचारले असता,आमचे कार्यकर्ते पक्ष नेतृत्वाचे ऐकतील आणि



बंडखोरीची शक्यता अत्यल्प असल्याचे बावनकुळे यांनी स्पष्ट केले. अब्दुल सत्तार यांच्याशी नुकतीच भेट झाल्याचे सांगत, काही मतभेद असले तरी मनभेद नसल्याचे त्यांनी नमूद केले.यवतमाळमध्ये काँग्रेसच्या उमेदवारीबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, उमेदवारही विजयाची शक्यता लक्षात घेऊन निर्णय घेत असतात.विदर्भातील पाचही जागांवर महायुतीचा विजय होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**कळमना बाजार समितीचे महत्त्व वाढणार-**

कळमना बाजार समिती ही आशियातील सर्वात मोठी बाजार समिती असून राज्य सरकारने विशेष कायद्याद्वारे तिला राष्ट्रीय स्तरावरील बाजार समितीचा दर्जा दिला आहे, असे बावनकुळे यांनी सांगितले. या निर्णयामुळे कळमना बाजार समितीमार्फत देश-विदेशातील बाजारपेठांमध्ये मालाची निर्यात सुलभ होणार असून विदर्भ व नागपूरच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**राहुल गांधींवर टीका-**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना बावनकुळे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गरीब कल्याणाला प्राधान्य देत देशाची अर्थव्यवस्था मजबूत केली आहे. त्यामुळे देशातील आर्थिक परिस्थितीबाबत राहुल गांधी यांनी केलेली टीका वास्तवापासून दूर असून ती हास्यास्पद आहे.

**विप्लव बाजोरिया प्रकरणात न्यायालयावर विश्वास-**

विप्लव बाजोरिया प्रकरणाबाबत बोलताना त्यांनी न्यायव्यवस्थेवर विश्वास व्यक्त केला. उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालय जे निर्णय देतील ते संबंधित आयोगाला मान्य करावे लागतील.या प्रकरणात सरकारने कोणताही हस्तक्षेप केलेला नाही,असे त्यांनी स्पष्ट केले.

# संच मान्यता मसुद्यावर महासंघ व विज्युक्टाची सहसंचालकांसोबत चर्चा



## अन्यायकारक निकषाबाबत दिले निवेदन

अमरावती/प्रतिनिधीः-
कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या शैक्षणिक वर्ष २०२५ -२६ च्या संच मान्यतेत काही प्रचलित निकष बदलण्यात येणार असल्यामुळे, शिक्षक संख्या कमी होणार आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे.आता अस्तित्वात असलेले संच मान्यतेचे निकष वेळोवेळी शासनादेशानुसार असून गेली पन्नास वर्षे ते अस्तित्वात आहेत. हे प्रचलित निकष कोणालाही विश्वासात न घेता, गुप्तपणे बदलण्याच्या धोरणाला व शिक्षक संखेत कपात करण्याच्या आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि कारणीभूत होणाऱ्या या कृतीचा महासंघ निषेध करीत असून, त्यामुळे सध्या प्रचलित असलेले निकष कायम ठेवावेत याबाबत पुणे येथे सहसंचालक डॉ.श्रीराम पानझाडे यांचे सोबत महासंघ व विज्युक्टा ने चर्चा करुण यासंदर्भातील (दि.२) निवेदन सादर केले.

याप्रसंगी महासंघाचे अध्यक्ष डॉ संजय शिंदे, समन्वयक प्रा मुकुंदराव आंधळकर, विज्युक्टाचे अध्यक्ष डॉ. अविनाश बोर्डे, महासचिव डॉ.अशोकराव गव्हाणकर, प्रा.लक्ष्मण रोडे ,प्रा. रवींद्र पाटील ,प्रा. दिलीप शितोळे आदी विज्युक्टा व महासंघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

अन्यायकारक संच मान्यतेतील तरतुदीमुळे शिक्षकांच्या संख्येवर कसा विपरीत परिणाम होणार आहे, त्याचबरोबर विद्यार्थ्यांचे देखील कशा पद्धतीने नुकसान होणार आहे, याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली असून त्यासंबंधीचे निवेदन सहसंचालकांना देण्यात आले.

या निवेदनाच्या माध्यमातून महासंघ कोणत्याही परिस्थितीत प्रॅक्टिकलची बॅच ही २० विद्यार्थ्यांच्या संख्येवरून ३० विद्यार्थ्यांपर्यंत मान्य करणार नाही, बॅचमधील विद्यार्थी संख्या ही पूर्वीप्रमाणे २०च ठेवण्यात यावी. तसेच राज्यातील विविध विभागात असलेल्या ४० व ४५ मिनिटाच्या तासिका पूर्वीप्रमाणेच जैसे थे ठेवण्यात याव्या, विद्यार्थी पटसंख्येची अटीसह प्रचलित निकषानुसारच संच मान्यता करावी अशी जोरदार मागणी लावुन धरण्यात आली.

याबाबत बोलताना सहसंचालक डॉ. श्रीराम पानझडे यांनी संघटनेच्या या मागणीचा सकारात्मक विचार करून, संच मान्यतेच्या ड्राफ्ट मध्ये योग्य त्या दुरुस्ती करण्याची शिफारस शासनास पाठविण्यात येईल याबाबत त्यांनी आश्वस्थ केले. राज्यभर दि.१ जून ला झालेले आंदोलन व दि. ३ जून रोजी आझाद मैदान मुंबई येथे होणाऱ्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर संच मान्यते प्रचलित निकष डावलल्यास पुढील काळात प्रचंड आंदोलन घेण्याची भूमिका सुद्धा स्पष्ट करण्यात आली.

# ७.५ एचपीपेक्षा जास्त क्षमता असणाऱ्यांना कृषीपंपाचे वीज बिल भरणे बंधनकारक -मुख्य अभियंता अशोक साळुंके

## २२० कोटींचे वीज बिल थकीत, बिल न भरल्यास होणार वीज पुरवठा खंडित

अमरावती/प्रतिनिधीः-
राज्यातील ७.५ अश्वशक्तीपेक्षा जास्त क्षमता असलेल्या कृषी पंपाचे वीज बिल भरणे बंधनकारक असून महावितरणच्या अमरावती परिमंडळाअंतर्गत अमरावती आणि यवतमाळ जिल्ह्यातील या प्रवर्गात मोडणाऱ्या ६ हजार २७८ कृषीपंप ग्राहकाकडे २२० कोटी ७९ लाख रूपयाचे वीज बिल थकीत आहे. बील न भरल्यास वीज पुरवठा खंडित करण्याचे निर्देश क्षेत्रिय कार्यालयांना देण्यात आले असून , थकबाकी असलेल्या कृषीपंप वीज ग्राहकांनी थकीत बिल भरून सहकार्य करावे असे आवाहन मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी केले आहे. महावितरणने स्पष्ट केले आहे की, 'बळीराजा मोफत वीज योजना' ही सर्व कृषीपंपधारकांसाठी लागू नसून केवळ ७.५ एचपीपेक्षा कमी क्षमतेच्या कृषीपंपांसाठीच लागू आहे. या योजनेअंतर्गत शासनाने २०२४ ते मार्च २०२९ या कालावधीत अशा पंपांचे चालू वीजबिल शून्य केले आहे. मात्र ७.५ एचपीपेक्षा जास्त क्षमतेच्या कृषीपंपधारकांना वीजबिल भरणे बंधनकारक असल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे.

शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी राज्यात 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना' राबविली जात आहे. या योजनेअंतर्गत विकेंद्रीत स्वरूपातील सौर प्रकल्प उभारणी, फिडर विलगीकरण, नवीन वीजवाहिन्या, रोहित्रे आणि उपकेंद्र उभारणीची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. परिमंडळातील सुमारे २ लाख ८० हजार शेतकऱ्यांपैकी जवळपास ७० टक्क्यापेक्षा जास्त शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठ्याचा लाभ देण्यात येत असून पुढील काही महिन्यात शंभर टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज देणे शक्य होणार आहे.

परिमंडळातील ७.५ एचपीपेक्षा जास्त क्षमतेच्या एकूण ६ हजार २७८ कृषीपंपधारक शेतकऱ्यांकडे २२० कोटी ७९ लाख रुपयांची थकबाकी आहे. यापैकी अमरावती जिल्ह्यातील ४ हजार २०८ शेतकऱ्यांकडे ११६ कोटी ३३ लाख रुपयांची थकबाकी असून, यवतमाळ जिल्ह्यातील २ हजार ७० शेतकऱ्यांकडे १०४ कोटी ७९ लाख रुपयांची वीजबिल थकीत आहे. त्यामुळे महावितरणने थकबाकीदार शेतकऱ्यांना वेळेत वीजबिल भरून सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

# १ व १० वरिल उर्वरित

## महायुतीचे ५ उमेदवार

अर्ज माघार घेतले. त्यामुळे ठाण्यातून शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार रवींद्र फाटक तर पुण्यातून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे विक्रम काकडे यांचा बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला आहे.

वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली, यवतमाळमध्ये काँग्रेसची माघार

वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली मतदारसंघातील काँग्रेसचे उमेदवार शैलेश अग्रवाल यांनी आज निवडणुकीतून माघार घेतली. अग्रवाल यांच्या माघारीने भाजपचे उमेदवार अरुण लखानी बिनविरोध निवडून आले आहेत. यवतमाळमध्ये काँग्रेस उमेदवार साहेबराव कांबळे यांनी बुधवारीच माघार घेतली होती. आज अन्य अपक्ष उमेदवारांनी माघार घेतल्याने शिवसेना शिंदे गटाचे दुष्यन्त चतुर्वेदी बिनविरोध निवडून आले.

अहिल्यानगरमधून काँग्रेसने उमेदवारी दिलेले करण ससाणे यांनी माघार घेतली. मात्र, या मतदारसंघात अपक्ष दत्तात्रय पानसरे यांनी आपला उमेदवारी अर्ज कायम ठेवला. त्यामुळे भाजप उमेदवार प्राजक्त तनपुरे यांच्यासमोर पानसरे यांचे आव्हान आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये शिवसेना शिंदे गटाचे बंडखोर समीर सत्तार यांनी उमेदवारी अर्ज माघार घेतल्याने भाजपला दिलासा मिळाला. नांदेडमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या प्रवीण पाटील-चिखलीकर यांनी आज आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला.

## TCS नंतर विप्रोमध्ये धर्मांतराचा

**नाशिकच्या आयटी कंपनीत लैंगिक छळ आणि जबरदस्तीने धर्मांतराचे आरोप**-यापूर्वी नाशिकमधील एका मल्टीनॅशनल आयटी कंपनीत हिंदू महिला कर्मचा-यांचा लैंगिक छळ, ऑफिसमध्ये जबरदस्तीने नमाज पढायला लावणे, हिंदू देवी-देवतांचा अपमान करणे आणि धर्मांतरासाठी दबाव टाकल्याचा प्रकार समोर आला होता. महिला कर्मचा-यांचा आरोप आहे की, गेल्या चार वर्षांपासून एचआर मॅनेजरकडे तक्रार करण्यात आली होती, परंतु प्रत्येक वेळी त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले.

## प्रतीक्षा संपली, अखेर मान्सून

आणि झंझावात तयार झाला आहे. याच्या प्रभावाने येत्या २४ तासांत विदर्भातील काही जिल्ह्यांत विजा आणि वादळासह तुरळक स्वरूपात पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

या काळात तापमानात चढ-उतार होणार असून उकाड्याचा त्रास कायम राहण्याचा अंदाज आहे. बुधवारी विदर्भाच्या बहुतेक शहरांत तापमानवाढ नोंदविण्यात आली असून ब्रह्मपुरीत राज्यात सर्वाधिक ४४ अंश सेल्सियस तापमानाची नोंद करण्यात आली. नागपूर, अमरावती, अकोला, भंडारा, गोंदिया आणि वर्धा येथे १ ते २ अंशाची वाढ होउन तापमान ४१ ते ४२ अंशावर गेले.

## भारताच्या रूपयाची आशियात

खासगी गुंतवणुकीला चालना देण्यासाठी धोरणांमध्ये काही विशिष्ट बदल आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. सरकारी गुंतवणूक आणि भांडवली खर्च वाढत असताना, खासगी गुंतवणूक त्या वेगाने वाढत नाही हे आव्हान आहे. यावर उपाय शोधणे आवश्यक आहे. आम्ही या आव्हानांचे वर्णन करणारा तसेच सरकारला शिफारसी करणारा अहवाल तयार करणार आहोत.

**कौशल्य विकास मंत्रालयाचे उपक्रम असमाधानकारक-**कौशल्य विकास मंत्रालयाच्या काही प्रमुख उपक्रमांचे परिणाम असमाधानकारक असल्याचे निरीक्षण लोकलेखा समितीचे अध्यक्ष आणि काँग्रेस नेते के. सी. वेणुगोपाल यांनी व्यक्तकेले. या योजनांमध्ये अनेक कमतरता, विसंगती आणि गैरप्रकाराचे प्रसंग आहेत, असे त्यांनी सांगितले. या समितीची बुधवारी बैठक झाली, त्यामध्ये ही धक्कादायक माहिती उघड झाल्याचे ते म्हणाले. वेणुगोपाल यांनी सांगितले की,गेल्या १० वर्षांमध्ये कौशल्य विकास मंत्र्यांनी पहिल्या, दुस-या आणि तिस-या टप्प्याच्या अनेक योजना जाहीर केल्या. पण त्याचे परिणाम समाधानकारक नसल्याचे समितीला आढळले आहे.

## संपन्न महाराष्ट्रासाठी पायाभूत

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, विरार ते अलिबाग या मल्टी म?डेल क?रिडोरच्या प्रगतीसाठी भूसंपादनाची प्रक्रिया गतिमान करावी. या मार्गाच्या निर्मितीनंतर आजूबाजूच्या जमिनीचे मूल्य वाढणार आहे. याबाबत संबंधित यंत्रणेने विचार करून या वाढणा-या मूल्याचा शासनाच्या माध्यमातून कशा पद्धतीने उपयोग करता येईल, याबाबत नियोजन करावे. या मार्गाच्या आजूबाजूला काही क्षेत्र निश्चित करून त्या ठिकाणी शासनाने जमिनीची उपलब्धता करून देत गुंतवणूकदाराकडून त्या क्षेत्रावर विशिष्ट उद्योगाचा विकासाबाबत पडताळणी करावी.

पुणे वर्तुळाकार मार्गाचे काम गतीने पूर्ण करावे

मुळा व मुठा नदी पुनरुज्जीवन प्रकल्पासाठी जमीन उपलब्ध करून द्यावी. पुण्यामध्ये मेट्रोचे जाळे विस्तारात आहे. यासाठी एकीकृत तिकीट व्यवस्था असावी. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका व पाणीपुरवठा विभागाने समन्वयाने काम करावे. यामधील अडचणी दूर करत छत्रपती संभाजीनगर वासियांना मुबलक पाणीपुरवठा करावा, असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (वित्त) विकासचंद्र रस्तोगी, अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम) मिलिंद म्हैसकर, अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे, प्रधान सचिव (कामगार) आय ए. कुंदन, प्रधान सचिव (पाणीपुरवठा व स्वच्छता) पराग जैन, प्रधान सचिव (विधि व न्याय) दिलीप घुमरे, सचिव (पर्यावरण) जयश्री भोज, एमएमआरडीएचे महानगर आयुक्त संजय मुखर्जी, बृहन्मुंबई आयुक्त अ[illegible]नी भिडे आदी उपस्थित होते.

आढावा घेतलेले प्रकल्प

मेट्रो लाईन २ ब (डी एन नगर ते मंडले),

मेट्रो लाईन २ (कासारवडवली ते वडाळा),

मेट्रो लाईन ५ (ठाणे - भिवंडी- कल्याण),

मेट्रो लाईन ६ (स्वामी समर्थ नगर ते विक्रोळी),

मेट्रो लाईन ७ अ (अंधेरी पूर्व ते छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ),

मेट्रो लाईन ९ (दहिसर पूर्व ते मीरा-भाईंदर),

शिवडी ते वरळी उन्नत मार्ग,

पुणे शहरातील पिंपरी चिंचवड महानगरपालिका ते निगडी टप्पा १ मेट्रो लाईन ,

छत्रपती संभाजीनगर शहर पाणीपुरवठा योजना,

पुणे शहरातील मान - हिंजवडी - शिवाजीनगर मेट्रो लाईन ३, मुळा व मुठा नदी पुनरुज्जीवन प्रकल्प, पुणे वर्तुळाकार मार्ग, विरार ते अलिबाग मल्टीम?डल क?रिड?र, वांद्रा वर्सोवा सागरी सेतू मार्ग, गोरेगाव ते मुलुंड जोड रस्ता प्रकल्प, ठाणे ते बोरिवली दुहेरी बोगदा प्रकल्प, ना.म जोशी मार्ग, वरळी व नायगाव येथील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्प, धारावी पुनर्विकास प्रकल्प.

## दगडाने ठेचून तरुणाची हत्या

यांना माहिती दिली.त्यांनी पोलिसांना माहिती दिली. गुरुवारी सकाळी पोलिसांना आदिशक्ती ढाब्यासमोर नितीन भगतचा रक्ताच्या थारळयात मृतदेह आढळला. पोलिसांनी भावाच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करून तपासाचे चक्र फिरवत फरार होण्याच्या बेतात असणाऱ्या दोन्ही आरोपींना चांदुर रेल्वे येथून दोन तासाच्या आत अटक केली. त्यांच्यावर बीएनएस १०३ (१), ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अप्पर अधीक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय अधिकारी अशोक थोरात, ठाणेदार अजय आकरे यांच्या मार्गदर्शनात पीएसआय नितेश आंधळे, रोहित कुदळे, नंदलाल लिंगोट, शिवाजी, वसंत, योगेश, स्वप्निल, भागवत, निलेश यांनी केली.

## कोणार्क कंपनीच्या सुपरवायझरची

खाली पडले. त्याचवेळी त्यांचा मुलगा मोहम्मद अर्षद आपल्या वडिलांसाठी टिफिन घेऊन आला होता .आर्शदला पाहताच दोन्ही हल्लेखोर फरार झाले. अरशद ने हल्ला करणाऱ्यांना ओळखले होते. जखमी रफिक यांना पहिले डॉ. सोहेल बारी यांच्या बेस्ट रूग्णालयात दाखल करण्यात आले होते, परंतु त्यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना दुसऱ्या दवाखान्यात घेऊन जाण्याचा सल्ला दिला होता. त्यामुळे कुटुंबीयांनी रफिक यांना रिम्स हॉस्पिटलमध्ये दाखल केले होते. गेल्या चार दिवसापासून ते जीवन आणि मृत्यूशी झुंज देत होते.गुरुवारी दुपारी त्यांचा मृत्यू झाला. या घटनेने कोणार्क कंपनीच्या कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. पोलीस याप्रकरणी तपास करीत आहे.

## प्राणघातक हल्ल्यातील जखमी

दाखल करण्यात आले. प्रकृती गंभीर असल्यामुळे त्याला नागपूर रेफर करण्यात आले होते. जेथे उपचारादरम्यान त्याचा गुरुवारी पहाटे मृत्यू झाला. यामुळे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. हे प्रकरण दाखल झाल्यानंतर पोलिसांनी दोन आरोपींना ताब्यात घेतले आहे. दोन आरोपी फरार आहे. त्यांचा शोध घेतला जात आहे. शेखरच्या मृत्यूनंतर आता पोलिसांनी या प्रकरणात हत्येचे कलम वाढवले आहे.

## शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख

वाढीसाठी प्रयत्न केले.मात्र अमरावती जिल्ह्यात कार्यरत असलेल्या पदाधिकाऱ्यांना काम करू दिले जात नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. काही पदाधिकाऱ्यांकडून बैठका आणि संघटनात्मक कामकाजात अडथळे निर्माण केले जात असल्याचेही त्यांनी पत्रात म्हटले आहे.

जिल्हा परिषद व विधानसभा निवडणुकांमध्ये पक्षासाठी सातत्याने काम करूनही कार्यकर्त्यांना डावलले जात असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. अचलपूर तालुक्यातील आपल्या प्रभाव क्षेत्रातून मोठ्या प्रमाणात मतदान मिळवून दिल्यानंतरही पक्षातील गटबाजी कायम राहिल्याने आपण राजीनामा देत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तथापि, पदाचा राजीनामा दिला असला तरी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा शिवसैनिक म्हणून कार्यरत राहणार असल्याचे पडोळे म्हणाले, लवकरच शिवसेना पक्षात प्रवेश करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

विशेष म्हणजे शिवसेना शिंदे गटाचे विधानपरिषद आमदार बच्चू कडू यांची भेट सुद्धा नरेंद्र पडोळे यांनी घेतली असून लवकरच असंख्य कार्यकर्त्यांसह त्यांचा शिवसेना शिंदे गटात प्रवेश होणार असल्याची माहिती समोर आली आहे . आमदार बच्चू कडू यांच्या संघटन कौशल्यामुळे त्यांना विदर्भाची मोठी जबाबदारी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. यानंतर दर्यापूर येथील सहकार नेते सुधाकर भारसाकळे यांच्या सह शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला.आणि आता नरेंद्र पडोळे सुद्धा शिवसेना शिंदे गटात प्रवेश घेणार असल्याने विधानपरिषद आमदार बच्चू कडू काही कालावधीतच स्थानिक महाविकास आघाडी मधील काँग्रेस ,शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्याचा प्रवेश शिवसेना शिंदे गटामध्ये करण्यात यशस्वी झाल्याने जिल्ह्यासह विदर्भात शिवसेना शिंदे गटाची ताकद वाढत असल्याचे चित्र आहे

## अपक्ष उमेदवार प्रशांत महल्ले

उमेदवारी अर्ज बाद ठरल्याने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे दार ठोठावणाऱ्या विप्लव बाजोरिया यांना हायकोर्टाने दिलासा देण्यास नकार दिला आहे. त्यामुळे आता या निवडणुकीत महायुतीचे प्रवीण पोटे पाटील, महाविकास आघाडीचे हर्षजित देशमुख आणि वंचित बहुजन आघाडीचे नीलेश विश्वकर्मा यांच्यातच त्रिकोणी लढत रंगणार असल्याचे निश्चित झाले आहे.

या निवडणुकीसाठी आगामी १८ जून रोजी मतदान होणार आहे. अपक्ष उमेदवार प्रशांत महल्ले यांनी अर्ज मागे घेतला. त्यांनी स्वतःला काँग्रेस पक्षाचा समर्पित कार्यकर्ता असल्याचे सांगितले आहे. या निवडणुकीत ते काँग्रेसला पाठिंबा देणार असल्याचेही ते म्हणाले.

यामुळे आता या निवडणुकीची रंगत आणखीन वाढलेली आहे. निवडणुकीमध्ये महायुतीचे प्रवीण पोटे यांचे पारडे जड असल्याचे म्हटले जात आहे. यामुळे आता निवडणुकीची चुरस आणखी वाढलेली आहे. शिवसेनेचे (शिंदे गट) विप्लव बाजोरिया यांचा नामांकन अर्ज प्रशासनाने छाननीदरम्यान बाद ठरवला होता. या निर्णयाविरोधात बाजोरिया यांनी नागपूर खंडपीठात याचिका दाखल करून निवडणूक लढवण्याची परवानगी मागितली होती. मात्र, न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावत पुढील सुनावणी थेट दोन आठवड्यांनंतर ठेवली आहे. परिणामी, बाजोरिया या निवडणुकीच्या रिंगणातून पूर्णपणे बाद झाले आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, बाजोरिया यांनी या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे, मात्र याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

**महायुतीचे पारडे जड-** आकड्यांचा विचार केला तर भाजप, शिंदे गट, अजित पवार गट आणि युवा स्वाभिमान मिळून महायुतीकडे स्पष्ट बहुमत दिसत आहे. मात्र, काँग्रेस, ठाकरे गट आणि शरद पवार गटाची महाविकास आघाडी अपक्ष आणि छोट्या पक्षांच्या २५ मतांवर डोळा ठेवून आहे. प्रहार पक्षाचे २१ मतदार आणि एमआयएमचे १६ मतदार कोणाच्या पारड्यात आपले मत टाकतात, यावर निवडणुकीचा अंतिम कौल अवलंबून असणार आहे. 'मविआ'चे हर्षजित देशमुख हे महायुतीचे उमेदवार प्रवीण पोटे पाटील यांना कशी टक्कर देतात, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## रुक्मिणी नगर परिसरात

सुनील चोरपगार, सचिन सैनी, निलेश तंबोले, मनीष हडाले, संजय माहूरकर, प्रसाद कुलकर्णी व शैलेश डोंगरे उपस्थित होते.

महानगरपालिकेच्या या विशेष मोहिमेमुळे प्लास्टिक वापरावर नियंत्रण ठेवण्यास मदत होणार असून नागरिक व व्यापाऱ्यांनी पर्यावरणपूरक पर्यायांचा अवलंब करून प्लास्टिकमुक्त शहर घडविण्यास सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाने केले आहे.

## पोलिसांची अवैध दारू विक्रेत्यावर

अधीक्षक यांच्या आदेशानुसार, अंजनगाव सुर्जी पोलीस कर्मचारी पेट्रोलिंग करत असताना त्यांना गुप्त बातमीदारामार्फत महत्त्वाची माहिती मिळाली. एक व्यक्ती अंजनगाव सुर्जीकडून परतवाडा रोडने मोटारसायकलवरून अवैध देशी दारूची विक्री करण्यासाठी जात असल्याची खात्रीशीर माहिती मिळताच पोलिसांनी सापळा रचला.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांनी पदमश्री हॉटेलसमोरील कच्च्या रोडवर, जय दुर्गा टायर वर्कच्या बाजूला पाळत ठेवली. यावेळी संशयित इसम मोटारसायकलवरून येताना दिसताच पोलिसांनी त्याला अडवले. त्याची विचारपूस केली असता त्याने आपले नाव योगेश ज्ञानदेवराव वानखडे (वय ४२ वर्षे, रा. ग्राम गावंडगाव, ता. अंजनगाव सुर्जी) असल्याचे सांगितले.

पोलिसांनी योगेश वानखडे याच्या मोटारसायकलवर असलेल्या दोन प्लास्टिक पोत्यांची झडती घेतली. त्यामध्ये गोल्डन संत्रा कंपनीच्या देशी दारूच्या ९० मि.ली. च्या ६०० सीलबंद बाटल्या (किंमत ३०,००० रुपये).हिरो कंपनीची एच.एफ. डिलक्स मोटारसायकल (क्र. MH २७ BM ५०४५) (किंमत ८५,००० रुपये) असा एकूण १,१५,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याप्रकरणी आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (अ) (ई) अन्वये गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम , अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोडेवाड आणि वि.पो.अधि. मनिष ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशनचे ठाणेदार सूरज बोंडे, पोउपनी भारत चिरडे, पोहेकॉ जयसिंग चव्हाण, रवी राळेड, आकाश रंगारी, अमित घाटे, शुभम मार्कंड, मोहसिन पठाण, प्रमोद चव्हाण आणि नितीन इंगळे यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

## उपनिबंधक नोंदणी कार्यालयात

झाली. प्रेमविवाहाची भनक लागताच कुटुंबीय येथे धडकले आणि त्यांनी लग्न मोडले. प्रकरणाची गंभीरता पाहून गाडगेनगर पोलिसांना बोलविण्यात आले. पोलिसांनी तिथे येऊन परिस्थिती हाताळली आणि दोन्ही पक्षांच्या लोकांना आपल्या सोबत ठाण्यात नेले. माहितीनुसार तरुण आणि तरुणी आंतरजातीय विवाह करणार होते. यासाठी दोघे उपनिबंधक नोंदणी कार्यालयामध्ये पोहोचत त्यांनी रितसर अर्ज केले होते. त्यांचे नाव नियमानुसार बोर्डवर लावण्यात आले होते.

याची माहिती ओळखीच्या लोकांनी त्यांच्या कुटुंबीयांना दिली. ठरलेल्या तारखेनुसार तरुण-तरुणी गुरुवारी सकाळी उपनिबंधक कार्यालयात पोहोचले. याचवेळी दोन्ही पक्षातील लोकही तिथे दाखल झाले. त्यांनी या लग्नाचा विरोध केला. तरुणी बालीग असल्याने तिने त्याच मुलासोबत लग्न करण्याचा हट्ट धरला, ती दुसऱ्यासोबत लग्न करायला तयार नव्हती. यामुळे इथे मोठा गोंधळ निर्माण झाला होता. प्रकरणाचे गांभीर्य पाहून गाडगे नगर पोलिसांना बोलविण्यात आले होते. पोलिसांनी दोन्हीकडील लोकांना समजविण्याचे प्रयत्न केले ,पण ते काहीही ऐकाला तयार नव्हते. शेवटी पोलीस दोन्ही पक्षातील लोकांना घेऊन पोलीस ठाण्यात गेली. या संपूर्ण प्रकारामुळे चांगलाच गोंधळ निर्माण झाला होता.

## लोकेश चंद्र यांना महा आयकॉन

परिवहन आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते मुंबईत गुरुवारी हा पुरस्कार देण्यात आला.

राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत, प्रसिद्ध शास्त्रज्ञ अनिल काकोडकर, पुढारी समुहाचे मुख्य संपादक प्रतापसिंह जाधव आणि संपादक योगेश जाधव मंचावर उपस्थित होते.

महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीत आणि राष्ट्राच्या उभारणीत मोलाचे योगदान देणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान करण्यासाठी 'पुढारी?' माध्यम समूहाने 'महा आयकॉन २०२६' या नव्या उपक्रमाचे आयोजन केले होते

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ शुक्रवार, ५ जून २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# आदर्श ग्रामपंचायतीचा मुखवटा फाटला! ढोरखेडा सरपंच २५ हजारांची लाच घेताना रंगेहात जेरबंद

■ प्रतिनिधी | वाशिम ■

मालेगाव तालुक्यातील आदर्श ग्रामपंचायत म्हणून नावाजलेल्या ढोरखेडा ग्रामपंचायतीच्या महिला सरपंचाला २५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहात पकडल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, ही कारवाई सुरू असतानाच मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत उच्चस्तरीय पथक ग्रामपंचायतीच्या कामकाजाची तपासणी करत होते.



मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित महिला सरपंच यांनी एका कामाच्या मोबदल्यात तक्रारदाराकडे २५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. याबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर एसीबीने ३ जून रोजी मागणीची पडताळणी केली. पडताळणीत लाचेची मागणी निष्पन्न झाल्यानंतर ४ जून रोजी सापळा रचण्यात आला.

एसीबीच्या पथकाने कारवाईदरम्यान महिला सरपंचाला २५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात ताब्यात घेतले. या प्रकरणी शिरपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

या घटनेतील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, ज्या वेळी एसीबीची कारवाई सुरू होती, त्याच वेळी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत गोंदिया जिल्ह्यातील उच्चस्तरीय तपासणी पथक ढोरखेडा ग्रामपंचायतीच्या विकासकामांचे आणि प्रशासनाच्या कार्यपद्धतीचे मूल्यमापन करत होते. एकीकडे आदर्श ग्रामपंचायतीच्या कामगिरीचा आढावा घेतला जात असताना दुसरीकडे सरपंच लाच स्वीकारताना पकडल्या गेल्याने ग्रामस्थांसह प्रशासनातही मोठी खळबळ उडाली आहे.

या घटनेमुळे आदर्श ग्रामपंचायत म्हणून मिळालेल्या प्रतिमेला मोठा धक्का बसला असून ग्रामपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एसीबीच्या या कारवाईची जिल्हाभरात जोरदार चर्चा सुरू आहे.

## एमएच ३७ एएन नवीन मालिका सुरू

■ प्रतिनिधी | वाशिम ■

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वाशिम येथे दुचाकी वाहनांसाठी MH 37 AN ही नवीन नोंदणी मालिका सुरू करण्यात येत असून आकर्षक व पसंतीचे नोंदणी क्रमांक आरक्षित करण्यासाठी इच्छुक वाहनधारकांनी विहित मुदतीत अर्ज सादर करावेत, असे आवाहन सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी संग्रामकुमार जगताप यांनी केले आहे. नवीन मालिका सुरू होताना नागरिक कार्यालयात येत असल्याने कार्यालयीन व्यवस्थेवर ताण पडतो इच्छुकांना पसंतीचे क्रमांक सुलभतेने उपलब्ध करून देण्यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.

नव्याने सुरू होणाऱ्या दुचाकी मालिकेतील आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहित शुल्काच्या तिप्पट शुल्कासह आरक्षित करण्यासाठी चारचाकी वाहन मालकांनी दि. ८ जून २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी २.३० वाजेपर्यंत विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

# घरफोडी प्रकरणाचा उलगडा चोरट्यास बेड्या, ४.५४ लाखांचा मुद्देमाल जप्त

■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्थानिक गुन्हे शाखा, वाशिम यांनी घरफोडीच्या गुन्ह्याचा यशस्वी तपास करून आरोपीला अटक केली असून चोरीस गेलेला ४ लाख ५४ हजार रुपयांचा मुद्देमाल शंभर टक्के हस्तगत केला आहे.

मेडशी येथील अश्विनी प्रविण तायडे यांनी १२ मे रोजी मंगरुळपीर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यांच्या माहेर असलेल्या येडशी येथील घराचा दरवाजा तोडून अज्ञात चोरट्याने कपाटातील सोने-चांदीचे दागिने चोरी केल्याची घटना ११ मेच्या रात्री घडली होती. याप्रकरणी मंगरुळपीर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३३१(३), ३३१(४) व ३०५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.



घटनेची माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी यांनी विशेष पथक तयार करून तपास सुरू केला. पथकाने घटनास्थळ व परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली तसेच तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपीचा शोध घेतला. तपासादरम्यान चोरी करणारा आरोपी हा येडशी येथील रहिवासी असल्याचे निष्पन्न झाले. आरोपी पुणे येथे फरार झाल्याची माहिती मिळाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तत्काळ पुण्याकडे रवाना झाले.

तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपी संघदीप चंदू वानखडे (रा. येडशी, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम) याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान त्याने अश्विनी तायडे यांच्या वडिलांच्या घरात चोरी केल्याची कबुली दिली. तसेच चोरी केलेले सोने-चांदीचे दागिने शेलूबाजार येथील दोन सोनारांना विकल्याचे सांगितले. यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पंचांसमक्ष कारवाई करून ५२ ग्रॅम सोने व ४२ ग्रॅम चांदी असा एकूण ४ लाख ५४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

# गरीब रुग्णाला मिळाले नवे आयुष्य वाशीम जिल्हा रुग्णालयाचा वैद्यकीय चमत्कार



■ प्रतिनिधी | वाशिम ■

'सरकारी दवाखान्यात जाऊन काय होणार?' हा प्रश्न सामान्य माणसाच्या मनात नेहमीच घर करून असतो. मात्र, वाशीम जिल्हा सामान्य रुग्णालयातील डॉक्टरांच्या टीमने या प्रश्नाला आपल्या कर्तृत्वाने एक सकारात्मक उत्तर दिले आहे. केवळ उपचारच नव्हे, तर गरिबांच्या चेहऱ्यावर हसू फुलवणारे 'देवदूत' म्हणून या रुग्णालयातील वैद्यकीय पथक समोर आले आहे.

नुकत्याच घडलेल्या एका घटनेत, ६० वर्षांच्या एका ज्येष्ठ रुग्णाच्या स्वरयंत्रावर (वोकॅल कॉर्ड) दुर्मिळ आणि अत्यंत गुंतागुंतीची गाठ काढण्याची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. वृद्धत्वामुळे आणि आजाराच्या गांभीर्यामुळे रुग्णाचे कुटुंब पूर्णपणे खचले होते. खाजगी रुग्णालयांचा महागडा खर्च त्यांच्या आवाक्याबाहेरचा होता. अशा निराशेच्या छायेखाली असताना, जिल्हा रुग्णालयाचे दार त्यांच्यासाठी 'आशेचा किरण' ठरले. ही शस्त्रक्रिया केवळ तंत्रज्ञानाची कसोटी नव्हती, तर ती डॉक्टरांच्या संयमाची आणि माणुसकीची परीक्षा होती.

कान-नाक-घसा तज्ज्ञ डॉ. संतोष बेदरकर, डॉ. योगेश जाजू आणि डॉ. सोनाली टिकाईत यांनी अत्यंत नाजूकपणे, नसा-नसांची काळजी घेत शस्त्रक्रिया पूर्ण केली. त्यांना बधिरीकरण तज्ज्ञ डॉ. राम हजारे, डॉ. भाग्यश्री भालेराव आणि डॉ. गौरव महाजन यांनी तितक्याच ताकदीने साथ दिली. शस्त्रक्रिया यशस्वी होताच, रुग्णाच्या कुटुंबियांच्या डोळ्यांत आलेले आनंदाश्रू हेच या कामगिरीचे खरे फलित होते. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे आणि डॉ. अविनाश पुरी यांच्या मार्गदर्शनाखाली आज जिल्हा रुग्णालय केवळ इमारत राहिली नसून, ते सामान्य माणसाचा 'आधारस्तंभ' बनले आहे. पूर्वी ज्या शस्त्रक्रियांसाठी लोकांना खासगी दवाखान्यात धाव घ्यावी लागत असे, त्या आज मोफत आणि दर्जेदार पद्धतीने आपल्याच वाशीममध्ये होत आहेत. अपेंडिक्स, गर्भाशयाचे विकार किंवा पित्ताशयाचे खडे यांसारख्या आजारांवर आता लॅप्रोस्कोपीद्वारे विनासायास उपचार मिळणे, ही गोरगरिबांसाठी मोठी सुखद बाब आहे.

# एक हजार एकर सिंचन क्षमता असणारा सावरगांव कान्होबाचा धरण प्रशासकीय नाकर्तेपणाचा बळी

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

तालुक्यातील तीर्थक्षेत्र सावरगांव कान्होबा येथे तत्कालीन लघुपाटबंधारे विभागाने बांधलेले व ४०२ हेक्टर सिंचन क्षमता असलेले धरण सध्याच्या मृदा व जलसंधारण विभागाच्या नाकर्तेपणामुळे शेतकऱ्यांच्या मुळावर उठले आहे. पोटाला भाकर देणारी शेतजमीन त्यावेळी शासनाच्या धरण निर्मितीच्या उदात्त धोरणाला दिलेल्या शेतकऱ्यांच्या पदरी या धरणाचे पाणी मागील वीस वर्षांपासून दुसरीकडेच वाहून जात असल्याने वैफल्य आणि निराशेच्या रूपाने पडत असल्याचे वास्तव व संतापजनक चित्र कोरडे ठाक पडलेल्या धरणाच्या चित्रावरून पुढे येत आहे.

## दरवर्षी गळ्यापर्यंत भरूनही पाण्याला फुटतात पाय



दरवर्षी काठोकाठ भरणारे मात्र प्रशासकीय दिवाळखोरपणामुळे वाहून जाणारे धरण क्षेत्रातील पाण्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांच्या डोळ्यात दरवर्षी पाणी येत असल्याचे सध्या तळ गाठलेल्या धरणाला बघितल्यावर ठळकपणे स्पष्ट होते.

सन १९७७-७८ मध्ये स्थानिक शेतकऱ्यांकडून धरण निर्मितीसाठी शेतजमीन शासनाकडून संपादित करण्यात आली. भले मोठे धरण कानिफनाथ महाराज देवस्थानाच्या उजव्या बाजूला निर्माण करण्यात आले.

धरणाच्या कालव्यांनी तब्बल १००० एकर जमीन त्यावेळेस सिंचित होत होती. सावरगांव कान्होबा ,साळंबी आणि चिखलागड या गावातील शेतकरी सुद्धा या धरणाच्या त्यामुळे सुजलाम सुफलाम झाला होता.

मृदा व जलसंधारण विभागाचे उपविभाग तालुक्याला आहे केवळ दहा किमी.अंतरावर असलेल्या या विभागाचे उपविभागीय जलसंधारण अधिकारी कधी या धरणाच्या कालव्यांकडे फिरकल्याचे स्थानिक शेतकऱ्यांना आढळून आल्याचे कुणी सांगत नाही.

भ्रष्ट प्रशासकीय व्यवस्थेने शेतकऱ्यांचा तळतळाट स्वतःवर ओढवून घेऊ नये व या धरणाच्या कालव्याची दुरुस्ती पारदर्शकपणे करून सिंचनाची सुविधा उपलब्ध न करून दिल्यास स्थानिक शेतकरी जागृत होऊन प्रशासन आणि शासनाला त्यांच्या रोशाला सामोरे जावे लागेल अशी परिस्थिती आता येथे निर्माण होण्याचे संकेत प्राप्त होत आहेत.

# संगीतमय सुंदरकांडाने भाविक मंत्रमुग्ध



## प्राचीन हनुमान मंदिरात भक्तिरसाची मैफल

■ प्रतिनिधी | कारंजा ■

येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील प्राचीन हनुमान मंदिर संस्थानमध्ये मंगळवार, दि. २ जून रोजी आयोजित करण्यात आलेल्या संगीतमय सुंदरकांड कार्यक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सायंकाळी ७ ते रात्री १० वाजेपर्यंत रंगलेल्या या भक्तिमय सोहळ्याने परिसरात आध्यात्मिक आणि भक्तिरसपूर्ण वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाची सुरुवात सामूहिक आरती व हनुमान चालीसाच्या पठणाने करण्यात आली. त्यानंतर संगीतमय सुंदरकांडाचे सुरेल व भावपूर्ण सादरीकरण करण्यात आले. सौ. रूपाली बाहेती यांनी आपल्या सुमधुर वाणीमधून सुंदरकांडाचे प्रभावी वाचन करून उपस्थित भाविकांना भक्तिरसात तल्लीन केले.

या सादरीकरणाला पियानो वादक दीपक राऊत, ऑक्टोपॅड वादक वैभव गायकवाड, ढोलकी वादक देवा काळे तसेच बासरी वादक अमोल कानडे यांनी सुरेल साथ दिली. संगीत आणि भक्तीचा सुंदर संगम अनुभवत उपस्थित भाविकांनी कार्यक्रमाचा मनसोक्त आनंद घेतला.

सुंदरकांड श्रवणाचा लाभ घेण्यासाठी परिसरातील नागरिक, महिला, युवक तसेच मोठ्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमादरम्यान मंदिर परिसर भक्तिमय जयघोष आणि रामनामाच्या गजराने दुमदुमून गेला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजकांनी अथक परिश्रम घेतले. त्यांच्या नियोजनबद्ध व्यवस्थेमुळे हा भक्तिमय सोहळा अत्यंत उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाला.

# शाहीर उत्तम भगत यांची कलापथकाद्वारे जनजागृती



■ प्रतिनिधी | वाशिम ■

तालुक्यातील उमराकापसे येथील ५६ वर्षीय शाहीर तथा लोक कलावंत उत्तम नारायण भगत यांनी कलापथकाच्या माध्यमातून जनजागृती करण्याचा संकल्प केला आहे. ५६ वर्षीय उत्तम भगत आपल्या लोककलेच्या माध्यमातून समाजातील अनिष्ठ चालीरिती व अंधश्रद्धेबाबत कलापथकातून जागर करून नि:स्वार्थपणे समाजसेवा करत आहेत.

उमरा कापसे येथील गरीब कुटुंबात जन्मलेल्या उत्तम नारायण भगत यांना बालपणापासूनच शाहीरीची आवड होती.गावात व परिसरात येणाऱ्या कलापथकात सहभागी होवून ते आपली लोककला जनतेसमोर सादर करत होते. १५ वर्षापूर्वी त्यांनी गावामध्ये असलेल्या कलापथकात सहभागी होवून आपल्या सहका—यांसोबत उमराकापसे व परिसरातील गावात सन,उत्सव,राष्ट्रीय कार्यक्रमाचे औचित्य साधून कलापथकाद्वारे सामाजिक,सांस्कृतिक विषयाला अनुसरून समाजातील अनिष्ठ चालीरिती व अंधश्रद्धेबाबत जन जागरणाचे कार्य अविरतपणे सुरू ठेवून आपली लोककला जोपासली आहे. शाहीर उत्तम भगत यांचे कलापथकात कचरू खडसे,गायक मधुकर भगत, तबला वादक मारोती निरगुडे,देवराव भगत, श्रीराम भगत ,यशवंता खडसे,शाहीर शंकर भगत, भिकाजी भगत व इतर सहकारी सहभागी होतात.आज शाहीर उत्तम भगत यांनी वयाची पन्नासी ओलांडली असूनही शासनाकडून त्यांना अद्यापही लोक कलावंताचे दरमहा मानधन सुरू झालेले नाही.समाजकल्याण विभागाने शाहीर उत्तम भगत यांना लोक कलावंताचे दरमहा मिळणारे अनुदान सुरू करून त्यांच्या लोककलेचा सन्मान करावा अशी जनतेची मागणी आहे.

# खेती बचाव अभियानांतर्गत नैसर्गिक हळद उत्पादन तंत्रज्ञान विषयक प्रशिक्षण उत्साहात



■ प्रतिनिधी | वाशिम ■

भारतीय कृषी अनुसंधान परिषद पुरस्कृत कृषी विज्ञान केंद्र वाशिम आणि विठ्ठल रुक्मिणी मंदिर संस्थान, वाकद यांच्या संयुक्त विद्यमाने 'खेती बचाव अभियान' अंतर्गत नैसर्गिक हळद उत्पादन तंत्रज्ञान या विषयावरील प्रशिक्षण कार्यक्रम दि. २ जून रोजी विठ्ठल रुक्मिणी मंदिर, वाकद येथे यशस्वीरीत्या संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विठ्ठल रुक्मिणी मंदिर संस्थानचे अध्यक्ष श्री. नामदेव मामा चव्हाण हे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून कृषी विज्ञान केंद्र येथील उद्यानविद्या तज्ज्ञ निवृत्ती पाटील उपस्थित होते. तसेच संतोषसिंह ठाकूर आणि पी. पी. देशमुख यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

तांत्रिक मार्गदर्शन करताना श्री. निवृत्ती पाटील यांनी नैसर्गिक पद्धतीने हळद लागवडीसाठी उत्तम प्रतीच्या बेण्यांची निवड, बेणे प्रक्रिया, योग्य लागवड अंतर, उंच वाफे तयार करण्याची पद्धत, जलनियोजन, आच्छादन आणि तण व्यवस्थापन याविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच जमिनीचे आरोग्य सुधारण्यासाठी शेणखत, कंपोस्ट खत, सेंद्रिय पदार्थांचा वापर आणि गोकृपा अमृत आधारित जैविक व्यवस्थापनाचे महत्त्व त्यांनी विशद केले.

यावेळी त्यांनी नैसर्गिक शेती पद्धतीमध्ये जमिनीतील सूक्ष्मजीवांची संख्या वाढवून पोषणद्रव्यांची उपलब्धता सुधारण्यास गोकृपा अमृत उपयुक्त ठरते, असे सांगितले. मोठ्या प्रमाणात सेंद्रिय खतांचा वापर, जैविक निविष्ठांचे योग्य व्यवस्थापन आणि नैसर्गिक शेतीच्या तत्त्वांचा अवलंब केल्यास हळद पिकाचे उत्पादन, गुणवत्ता व जमिनीची सुपीकता वाढविणे शक्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच हळद पिकामध्ये येणाऱ्या प्रमुख कीड व रोगांच्या प्रतिबंधात्मक आणि एकात्मिक व्यवस्थापनाबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात नामदेव मामा चव्हाण यांनी शेतकऱ्यांनी पारंपरिक शेतीसोबतच नैसर्गिक व शाश्वत शेती पद्धतींचा अवलंब करून उत्पादन खर्च कमी करावा व उत्पादनाची गुणवत्ता वाढवावी, असे आवाहन केले. यावेळी संतोष भैय्या ठाकूर यांनी नैसर्गिक शेती पद्धतीचा अवलंब करताना आलेले अनुभव आणि त्यातून मिळालेले सकारात्मक परिणाम शेतकऱ्यांसमोर मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन माजी सभापती . सय्यद अखिल यांनी केले. सदर प्रशिक्षणासाठी वाकद तसेच परिसरातील विविध गावांतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रशिक्षणाद्वारे शेतकऱ्यांना नैसर्गिक हळद उत्पादनाच्या वैज्ञानिक तंत्रज्ञानाची माहिती मिळाल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले.

# शेगाव ते सोमनाथ सायकलवारी यशस्वा



## योगशिक्षक राजू डांगे व धनंजय मुखमाले यांचे जल्लोषात स्वागत

■ प्रतिनिधी | शेजूबाजार ■

शेलूबाजार येथील योगशिक्षक राजू डांगे आणि धनंजय मुखमाले यांनी शेगाव ते सोमनाथ अशी सायकल यात्रा अवघ्या दहा दिवसांत पूर्ण करून साहस, जिद्द आणि आरोग्यप्रेमाचा प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. दररोज शेकडो किलोमीटरचा प्रवास करत त्यांनी सायकलद्वारे सोमनाथ येथे पोहोचून ही यात्रा यशस्वीरीत्या पूर्ण केली. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

योगशिक्षक म्हणून परिसरात परिचित असलेले राजू डांगे हे नागरिकांना योग, व्यायाम आणि निरोगी जीवनशैलीबाबत सातत्याने मार्गदर्शन करत असतात. शरीर सुदृढ ठेवण्यासाठी नियमित व्यायाम, योगसाधना आणि सायकलिंगचे महत्त्व पटवून देण्यासाठी ते विविध उपक्रम राबवत असतात. शेगाव ते सोमनाथ सायकलवारीद्वारे त्यांनी 'आरोग्यासाठी सायकल हा सर्वोत्तम पर्याय' हा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला.

# अवैध गावठी दारू अड्डयांवर मोठी कारवाई

## पुणे येथील विषारी दारू दुर्घटनेनंतर मालेगाव पोलिसांचा धडाकेबाज ॲक्शन मोड

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

पुणे येथे विषारी दारू पिऊन झालेल्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर मालेगाव पोलीस प्रशासन अलर्ट मोडवर आले असून अवैध गावठी, देशी व विदेशी दारू विक्री करणाऱ्यांविरुद्ध जोरदार मोहीम हाती घेण्यात आली आहे

मालेगाव पोलीस स्टेशन अंतर्गत ग्राम अमाणी येथे वेगवेगळ्या चार ठिकाणी धाड टाकून चार इसमांविरुद्ध दारूबंदी कायद्यान्वये कारवाई करण्यात आली. या कारवाईत मोहफुल २२५ किलो, सडवा मोहामाच ४० किलो, गावठी हातभट्टी दारू १२५ लिटर, देशी दारू, ६ बिअर तसेच एक दुचाकी वाहन असा एकूण १ लाख ३६ हजार ५५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला



कारवाईदरम्यान गावठी हातभट्टी दारूचा माल जागीच नष्ट करण्यात आला असून उर्वरित मुद्देमाल पोलीस स्टेशनच्या मालखान्यात जमा करण्यात आला आहे. संबंधित आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे

सदर संयुक्त कारवाई सहायक पोलीस अधीक्षक नवदीप अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या कारवाईत पीआय राजेश खेरडे , एपीआय दिनेश शिरेकर , पीएसआय रवी सैबेवार, सुनील पवार , शिवाजी काळे , प्रशांत वानखेडे ,स्वप्नील शेळके , अमोल पवार यांनी सहभाग घेतला.

जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १८८ ■ शुक्रवार, ५ जून २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

## विधान परिषद : अरुण लखानी बिनविरोध

# १५ लाखांचे गाजर कुठे गेले : मतदारांच्या हाती फक्त हापूस आंबे अन् हेरिटेजची मेजवानी

### विधान परिषदेच्या रणधुमाळीत कोट्यवधींच्या चर्चांचा धूर; शेवटी मतदारांच्या वाट्याला आली फक्त मेजवानीची चव

**वर्धा । रवींद्र लाखे :** चंद्रपूर-गडचिरोली-वर्धा स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत भाजपचे अरुण लखानी बिनविरोध विजयी झाले. मात्र या निवडणुकीपेक्षा जास्त चर्चा रंगली ती निवडणुकीआधीच्या राजकीय दाव्यांची, आरोपांची आणि मतदारांमध्ये निर्माण झालेल्या अपेक्षांची. निवडणुकीच्या काळात काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी मतदारांना १५ लाख रुपये द्यावे लागतील' अशी टिपणी करून राजकीय वातावरण तापविले होते. या वक्तव्यानंतर मतदारांमध्ये आणि राजकीय वर्तुळात मोठी उत्सुकता निर्माण झाली होती.

मात्र निवडणूक होण्याआधीच काँग्रेसचे शैलेश अग्रवाल आणि राष्ट्रवादीचे सुधीर कोठारी यांनी माघार घेतल्याने संपूर्ण समीकरणच बदलले. निवडणूकच झाली नाही आणि १५ लाखांच्या चर्चेलाही पूर्णविराम मिळाला. त्यामुळे आता राजकीय वर्तुळात उपरोधिकपणे चर्चा रंगली आहे की, १५ लाखांचे गाजर दाखविले गेले; पण हातात आले काय,

या चर्चेला आणखी खतपाणी घातले ते काही दिवसांपूर्वी वडेट्टीवार यांच्या मुलीच्या विवाह सोहळा पार पडला. त्या विवाह सोहळापुर्वी विवाह निमंत्रणासोबत शहरातील अनेक मतदारांना हापूस आंब्यांच्या पेट्याही पाठविण्यात आल्या. त्यामुळे आता विरोधक टोला लगावत म्हणत आहेत की, गाजर नाही मिळाले, पण हापूस आंब्यांची गोडी मात्र चाखायला मिळाली.







दुसरीकडे भाजपचे उमेदवार अरुण लखानी यांनी निवडणुकीच्या काळात गुरुवारी हेरिटेज येथे आयोजित केलेल्या भोजन कार्यक्रमाचीही मोठी चर्चा झाली. अनेक मतदारांनी त्या तांबड्या रस्त्यांवर मेजवानीचा आस्वाद घेतल्याचे बोलले जाते. परिणामी, राजकीय गल्लीबोळात आता उपरोधिक चर्चा सुरू आहे की, मतदारांच्या वाट्याला ना १५ लाख आले, ना निवडणुकीचा थरार; शेवटी हापूस आंबे आणि हेरिटेजचे जेवण यावरच समाधान मानावे लागले.

दरम्यान, मोठी डील करून निवडणुकीतून माघार घेतल्यानंतर काँग्रेसचे शैलेश अग्रवाल यांनी पक्षातील काही नेत्यांवर भाजपला मदत केल्याचे गंभीर आरोप केले. यामुळे काँग्रेसमधील अंतर्गत कलह पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला. मात्र पक्षातच आता 'उलटा चोर कोतवाल को दाटे' अशी कुजबूज ऐकायला मिळत असून, पराभवाची चाहूल लागताच आरोपांचे राजकारण सुरू झाल्याची चर्चा आहे.

एकीकडे भाजपने विरोधकांचे उमेदवारही माघारी फिरवले का, याची चर्चा सुरू आहे; तर दुसरीकडे काँग्रेसमधील गटबाजी आणि घरभेदी राजकारण उघडे पडल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे या निवडणुकीत मतपेटी उघडली नसली तरी राजकीय चर्चांची पेटी मात्र चांगलीच उघडली आहे.

#### 'गाजर' नव्हे, हापूस आंब्यांचीच चर्चा

विजय वडेट्टीवार यांच्या १५ लाखांच्या वक्तव्यानंतर मतदारांमध्ये मोठ्या अपेक्षा निर्माण झाल्या होत्या. मात्र निवडणूक बिनविरोध झाल्यानंतर त्या चर्चेवर पडदा पडला. दरम्यान, मुलीच्या विवाहानिमित्त पाठविण्यात आलेल्या निमंत्रणासोबत हापूस आंब्यांच्या पेट्या दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली. त्यामुळे आता उपरोधिकपणे म्हटले जात आहे की, १५ लाखांचे गाजर दिसले नाही, पण हापूस आंब्यांची पेटी मात्र पोहोचली.

#### मतदार म्हणतात...

निवडणूक झाली नाही, १५ लाख मिळाले नाहीत, शेवटीमिळाल, आंबे आणि हेरिटेजचे जेवण यावरच समाधान मानावे लागले.

अशी उपरोधिक प्रतिक्रिया राजकीय वर्तुळात ऐकायला मिळत आहे. निवडणुकीपेक्षा पडद्यामागील घडामोडींचीच चर्चा आता अधिक रंगत आहे.

#### माघारीमागे 'मेगा डील'चा संशय

विधान परिषद निवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार शैलेश अग्रवाल यांनी ऐनवेळी उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने राजकीय वर्तुळात संशयाचे धुके अधिक गडद झाले आहे. अग्रवाल यांच्या माघारीमागचे नेमके कारण अद्याप गुलदस्त्यात असून त्यांनीही याबाबत स्पष्ट भूमिका मांडलेली नाही. आमच्या प्रतिनिधीने संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र तो होऊ शकला नाही. दरम्यान, राजकीय वर्तुळात अग्रवाल यांनी मोठ्या राजकीय अथवा आर्थिक व्यवहारानंतर माघार घेतल्याची जोरदार चर्चा रंगली आहे.

## अर्बन बँकेतील 'काळा कारभार' बाहेर; फसवणूक प्रकरणात पोलिसांची कारवाई

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा अर्बन अँड रुरल को-ऑपरेटिव्ह बँकेतील कथित गैरव्यवहार प्रकरणात अखेर शहर पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. बँकेचे तत्कालीन व्यवस्थापक प्रवीण बोरकर यांच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, एका महिलेची सुमारे ३५ लाख रुपयांनी फसवणूक केल्याचा आरोप आहे. या कारवाईमुळे बँकेतील जुन्या व्यवहारांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, आणखी तक्रारी पुढे येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

बढे चौक परिसरातील रहिवासी संगीता श्रीकांत बढे (५२) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, २०१३ मध्ये त्यांनी मुलांच्या आणि स्वतःच्या नावाने एकूण २० लाख रुपयांच्या मुदत ठेवी केल्या होत्या. तसेच सुमारे १५ लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने बँकेतील लॉकरमध्ये ठेवले होते. प्रवीण बोरकर यांच्यावर असलेल्या विश्वासामुळे हे व्यवहार करण्यात आले. मात्र बँकेतील गैरव्यवहार उघडकीस आल्यानंतर चौकशी केली असता ठेवीची रक्कम आणि दागिने गायब झाल्याचे समोर आले. यानंतर त्यांनी पोलिसांत धाव घेतली.

**बनावट स्वाक्षऱ्यांचा खेळ; एफडीची रक्कम गायब**

संगीता बढे यांच्या तक्रारीनुसार, त्यांच्या मुदत ठेवीवरील रक्कम बनावट स्वाक्षऱ्या व बनावट कागदपत्रांच्या आधारे काढून घेण्यात आली. एवढेच नव्हे तर लॉकरमधील सोन्याचे दागिनेही काढून ते अन्य व्यक्तीच्या नावाने गहाण ठेवण्यात आल्याचा आरोप आहे. प्राथमिक चौकशीनंतर पोलिसांनी प्रवीण बोरकर यांच्याविरुद्ध विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

#### ३५ लाखांच्या फसवणुकीचा आरोप; तत्कालीन व्यवस्थापकाविरुद्ध कारवाई, आणखी बडे चेहरे तपासाच्या रडारवर

**बँकेतील 'मोठे मासे'ही जाळ्यात येणार**

या प्रकरणात केवळ एका अधिकाऱ्याची भूमिका होती की संपूर्ण व्यवस्थेचे संगनमत होते, हा आता तपासाचा केंद्रबिंदू ठरणार आहे. बँक प्रशासनानेही स्वतंत्र तक्रार दिल्याची माहिती समोर आली असून इतर पीडितही पुढे येत आहेत. गैरव्यवहाराची साखळी उलगडू लागल्याने आणखी काही अधिकारी, कर्मचारी किंवा संबंधित व्यक्ती तपासाच्या कक्षेत येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या प्रकरणात आरोपींची संख्या वाढण्याची चर्चा जोर धरू लागली आहे. पीडितांनी संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून सर्व दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## कुलूपबंद घरांवर डल्ला; दोन अल्पवयीन चोरटे पोलिसांच्या जाळ्यात

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील स्टेशन फैल परिसरातील कुलूपबंद घराला लक्ष्य करून रोख रक्कम व सोन्या-चांदीचे दागिने लंपास करणाऱ्या दोन अल्पवयीन चोरट्यांना शहर पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने ताब्यात घेत घरफोडीचा यशस्वी उलगडा केला. आरोपींकडून एकूण २ लाख १२ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



स्टेशन फैल येथील रहिवासी बेबी लक्ष्मण कोराटे यांच्या घरातून अज्ञात चोरट्यांनी ५८ हजार रुपये रोख व सोन्या-चांदीचे दागिने असा एकूण १ लाख ८३ हजार ७०० रुपयांचा ऐवज चोरून नेला होता. याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल होताच गुन्हे शोध पथकाने तपासाची सूत्रे हाती घेतली. गुप्त माहिती व तांत्रिक तपासाच्या आधारे दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली. चौकशीत त्यांनी घरफोडीची कबुली दिली. आरोपींकडून सोन्याचे कानातील दागिने, तीन नथ, सोन्याचे मनी, बेसर, चांदीच्या पायपट्ट्या, मनगटे, जोडवे, चाळ, रोख ५२ हजार ८०० रुपये, चोरीच्या पैशातून खरेदी केलेले कपडे तसेच गुन्ह्यात वापरलेले दोन मोबाईल जप्त करण्यात आले.

ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रमोद मकेश्वर व पोलिस निरीक्षक संतोष टाले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक शरद गायकवाड व त्यांच्या पथकाने केली. या कारवाईमुळे शहरातील घरफोडीच्या घटनांवर आळा बसण्यास मदत होणार असल्याचे बोलले जात आहे.

## खड्ड्यात दुचाकी कोसळून युवक जखमी; ठेकेदाराच्या निष्काळजीपणावर संताप

**सेलू जनमाध्यम :** केळझर येथील अंतर्गत रस्त्याच्या कामादरम्यान खोदलेल्या नालीजवळ कोणतीही सुरक्षा व्यवस्था किंवा इशारा फलक न लावल्याने दुचाकीस्वार खड्ड्यात कोसळून जखमी झाल्याची घटना बुधवारी सायंकाळी घडली. या घटनेमुळे ग्रामस्थांनी संबंधित ठेकेदाराच्या निष्काळजीपणावर तीव्र संताप व्यक्त केला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, केळझर येथील गजानन (गजू) लोणकर हे सायंकाळी दुचाकीने वायगावकडे जात होते. दरम्यान, गुणकारी हनुमान मंदिराजवळ सुरू असलेल्या रस्त्याच्या कामासाठी कंबरभर खोल नाली खोदण्यात आली होती. मात्र तेथे कोणतेही बॅरिकेड्स किंवा धोक्याचा इशारा देणारे फलक लावण्यात आले नव्हते. अंधारामुळे नाली न दिसल्याने त्यांची दुचाकी थेट खड्ड्यात कोसळली. अपघातानंतर ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेऊन गजानन लोणकर यांना बाहेर काढत रुग्णालयात दाखल केले. त्यांच्या हात व पायाला दुखापत झाली असून तीन टाके पडल्याची माहिती आहे. हेल्मेटमुळे मोठी जीवितहानी टळली. विशेष म्हणजे, काही वेळातच आणखी एक दुचाकीस्वार याच खड्ड्यात पडल्याची माहिती समोर आली. त्यामुळे ग्रामस्थांनी ठेकेदारावर कारवाई करून जखमींना नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे.

## वडेट्टीवार यांच्या शब्दापोटी माघार; पण माझा गेम झाला

### अग्रवालांच्या वक्तव्याने राजकीय वर्तुळात खळबळ

**वर्धा । जनमाध्यम :** वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीतून अचानक माघार घेतलेल्या शैलेश अग्रवाल यांच्या प्रतिक्रियेमुळे राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना उधाण आले आहे. विजय वडेट्टीवार यांच्या शब्दापोटी मला उमेदवारी मागे घ्यावी लागली, पण माझा गेम झाला, अशी भावना त्यांनी व्यक्त केल्याची चर्चा रंगत असून, या एका वाक्याने पडद्यामागील राजकीय डावपेचांवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.



उमेदवारी जाहीर झाल्यानंतरही अग्रवाल यांना माघार का घ्यावी लागली, याचे गूढ अद्याप कायम आहे. मात्र त्यांच्या वक्तव्यातील खंत आणि नाराजी अनेक अर्थांनी घेतली जात आहे. राजकीय वर्तुळात आता 'गेम नेमका कोणी केला?' याचीच चर्चा सुरू झाली आहे. काही जण यामागे पक्षांतर्गत दबाव असल्याचा अंदाज व्यक्त करीत आहेत, तर काहींच्या मते विधान परिषदेच्या रणांगणात शेवटच्या क्षणी समीकरणे बदलली गेली.

अग्रवाल यांनी कोणाचेही नाव घेतले नसले तरी त्यांच्या वक्तव्याचे बोट थेट काँग्रेसमधील सत्ताकेंद्रांकडे असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे या माघारीमागे केवळ पक्षशिस्त होती की आखीव-रेखीव राजकीय रणनीती, याबाबत तर्क-वितर्कांना उधाण आले आहे.

राजकारणात मित्र आणि शत्रू क्षणाक्षणाला बदलतात. मात्र 'माझा गेम झाला' या एका वाक्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या असून, या विधानाचे पडसाद अजूनही राजकीय वर्तुळात जोरदार उमटत आहेत.

## नोकरीचे आमिष दाखवून १३ लाखांची फसवणूक

### जलसंपदा विभागात नोकरी लावून देण्याचे आश्वासन; दोन जणांविरुद्ध गुन्हा

**वर्धा जनमाध्यम :** जलसंपदा विभागात नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत तीन माजी सैनिकांसह एका व्यक्तीकडून तब्बल १३ लाख रुपये उकळल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी रामनगर पोलिसांनी विपीन मोघे (रा. म्हाडा कॉलनी, वर्धा) आणि राहुल थूल (रा. नागपूर) यांच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

नटाळा पुनर्वसन येथील विवेक शुला हे माजी सैनिक असून सध्या देवळी येथील पॉवर ग्रीड कंपनीत सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत आहेत. जलसंपदा विभागातील कालवा निरीक्षक पदाच्या भरतीसाठी त्यांनी अर्ज केला होता.

त्यावेळी परिचयातील विपीन मोघे याने मंत्रालयापर्यंत ओळख असल्याचे सांगून नोकरी निश्चित मिळवून देण्याचे आश्वासन दिले. त्यासाठी टप्प्याटप्प्याने प्रत्येकी नऊ लाख रुपये लागतील, असे सांगण्यात आले.

मोघे यांच्या आश्वासनावर विश्वास ठेवून विवेक शुला, परीक्षित डांगे व महेंद्र बावने यांनी प्रत्येकी तीन लाख रुपये, तर अमित पिडिया यांनी चार लाख रुपये दिले.

अशाप्रकारे एकूण १३ लाख रुपये आरोपींकडे सुपूर्द करण्यात आले. मात्र भरती प्रक्रिया पूर्ण होऊनही कोणाच्याही नावाचा समावेश निवड यादीत झाला नाही. पैशांची परतफेड मागितल्यानंतर आरोपींकडून उडवाउडवीची उत्तरे दिली जात होती.


चौकशीदरम्यान पैसे घेतल्याची कबुली देत आरोपींनी धनादेश दिले; मात्र ते वटले नाहीत. अखेर तक्रारीनंतर रामनगर पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

## हमदापूरात सुगंधित तंबाखूवर धाड; २४ हजारांचा साठा जप्त

**वर्धा जनमाध्यम :** अन्न व औषध प्रशासन विभागाने हमदापूर येथील एका किराणा दुकानावर छापा टाकून सुगंधित तंबाखूचा साठा जप्त केला. या कारवाईत सुमारे २४ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून संबंधिताविरुद्ध दहेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हमदापूर येथील विलास चांभारे यांच्या वैष्णवी किराणा स्टोअर्समध्ये मोठ्या प्रमाणात सुगंधित तंबाखूचा साठा असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाला मिळाली होती. त्यानुसार अधिकाऱ्यांनी दुकानावर छापा टाकून तपासणी केली.

तपासणीदरम्यान विविध कंपन्यांच्या सुगंधित तंबाखूची पाकिटे मोठ्या प्रमाणात आढळून आली. महाराष्ट्रात सुगंधित तंबाखू व तत्सम पदार्थांच्या विक्रीवर बंदी असतानाही त्याची विक्री होत असल्याचे निदर्शनास आल्याने अधिकाऱ्यांनी संपूर्ण साठा जप्त केला. जप्त करण्यात आलेल्या मालाची किंमत सुमारे २४ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या तक्रारीवरून दहेगाव पोलिसांनी संबंधिताविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. जिल्ह्यात बंदी असलेल्या तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीविरोधात प्रशासनाने मोहीम तीव्र केली असून अशा प्रकारच्या कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.




## तीन वर्षांच्या मुलासह महिला बेपत्ता; कुटुंबीयांची चिंता वाढली

**सेलू जनमाध्यम :** तालुक्यातील कान्हापूर येथील ३० वर्षीय विवाहित महिला आपल्या तीन वर्षांच्या मुलासह बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी सेलू पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून महिलेचा शोध घेण्याची मागणी कुटुंबीयांनी केली आहे.

माहितीनुसार, कान्हापूर येथील रहिवासी स्नेहा प्रशांत येळणे (वय ३०) या त्यांचा मुलगा हर्षल (वय ३) याच्यासह ३० मे रोजी शेगाव रेल्वे स्थानक परिसरातून बेपत्ता झाल्या. त्यानंतर नातेवाईकांनी विविध ठिकाणी शोध घेतला; मात्र त्यांचा कोणताही ठावठिकाणा लागला नाही.

याबाबत २ जून रोजी सेलू पोलिस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आली आहे. तक्रार दाखल झाल्यानंतरही महिलेचा अद्याप शोध लागलेला नसल्याने कुटुंबीयांची चिंता वाढली आहे. स्नेहा येळणे व त्यांचा मुलगा सुरक्षित असल्याची माहिती मिळावी, अशी अपेक्षा नातेवाईकांनी व्यक्त केली आहे.



दरम्यान, अलीकडच्या काळात महिला व तरुणी बेपत्ता होण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे अशा प्रकरणांमध्ये तातडीने शोधमोहीम राबवून संबंधितांचा माग काढण्याची गरज व्यक्त होत आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला असून उपलब्ध माहितीच्या आधारे महिलेचा शोध घेतला जात आहे. कुटुंबीयांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, स्नेहा येळणे किंवा त्यांचा मुलगा आढळल्यास जवळच्या पोलिस ठाण्याशी संपर्क साधावा.

#### जाहीर सुचना

माझे अशील अंकुश किशोर सहारे हे मौजा काकडदरा, ता. आष्टी व जि. वर्धा येथील ग्रामपंचायत तळेगाव शामजी पंत हद्दीतील झोन क्र. ०३, घर क्र. १०२० (नमुना ८-अ प्रमाणे), क्षेत्रफळ ६७.१५ चौ. मीटर (७२२.५६ चौ. फूट) असलेल्या मिळकतीचे मालक आहेत.सदर मिळकतीच्या सीमा पुढीलप्रमाणे आहेत :-

पूर्वेस : सौ. सुनीता उईके यांचे घर,
पश्चिमेस : विनायक चचाने यांचे घर, उत्तरेस : सिमेंट रस्ता,
दक्षिणेस : शालू भोकारे यांचे घर,

नामदेव सहारे हे सन २००४पासून सदर मिळकतीचे मालक व कब्जेदार होते.नामदेव महादेव सहारे यांनी घर क्र. १०२० (नमुना ८-अ प्रमाणे), क्षेत्रफळ ६७.१५ चौ. मीटर (७२२.५६ चौ. फूट) ही मिळकत दिनांक १३/०४/२०२६ रोजी दस्त क्र. ७३६/२०२६ अन्वये अंकुश किशोर सहारे यांच्या नावे बक्षीसपत्र (गिफ्ट डीड ) करून दिली आहे.

माझ्या अशीलांनी पिरामल फायनान्स लिमिटेड येथे कर्जासाठी अर्ज केला असून, यानिमित्ताने सर्वसामान्य जनतेस जाहीर सूचना देण्यात येते की, वरील व्यवहाराबाबत कोणास काही हरकत, दावा, हक्क अथवा आक्षेप असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून सात (७) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**ॲड. आर. आर. तिवारी**
**रामनगर, वर्धा.**
**मो. नं. ९९२२४२६१६८**

#### जाहीर सुचना

माझे अशील शमशेर अली रमजान अली खान हे मौजा पिंपरी मेघे, ता. व जि. वर्धा येथील ग्रामपंचायत पिंपरी मेघे हद्दीतील मौजा क्र.८७, प.ह. क्र. २१, वॉर्ड क्र. ५, फील्ड सर्व्हे क्र. २९२/६ मधील प्लॉट क्र. १९ वर बांधलेल्या व्यावसायिक गाळ्याचे मालक आहेत. सदर व्यावसायिक गाळा भूतळावरील ब्लॉक क्र. २ असून त्याचे क्षेत्रफळ ११.१५ चौ. मीटर (१२०.०० चौ. फूट) आहे.सदर मालमत्तेच्या सीमा पुढीलप्रमाणे आहेत :-

पूर्वेस : ३० फूट रस्ता,
पश्चिमेस : फ्लॅट योजनेचा उर्वरित, भाग, उत्तरेस : फ्लॅट योजनेचा, उर्वरित भाग, दक्षिणेस : ब्लॉक क्र. १, सौ. संगीता बाबाराव रघाटाटे यांनी वरील वर्णित बांधकामयुक्त व्यावसायिक गाळा, ब्लॉक क्र. २, क्षेत्रफळ ११.१५ चौ. मीटर (१२०.०० चौ. फूट) हा दिनांक १५/१५/०७/२०१६रोजी दस्त क्र.१८४६/२०१६ अन्वये श्री. शमशेर रमजान अली खान यांना विक्री केला आहे. त्यानंतर दिनांक ०१/०६/२०२६ रोजी दस्त क्र. २०१७/२०२६ अन्वये दुरुस्तीखत ( करेक्शन डीड) निष्पादित करण्यात आले आहे.

माझ्या अशीलांकडून सदर मालमत्तेचे मूळ लिंक विक्रीखत दिनांक २१/०५/२०१४, दस्त क्र. २६६४/२०१९ हरवले/गहाळ झाले आहे. माझ्या अशीलांनी पिरामल फायनान्स लिमिटेड येथे कर्जासाठी अर्ज केला असून, यानिमित्ताने सर्वसामान्य जनतेस जाहीर सूचना देण्यात येते की, वरील व्यवहाराबाबत कोणास काही हरकत, दावा, हक्क अथवा आक्षेप असल्यास किंवा हरवलेले वरील नमूद मूळ विक्रीखत कोणास मिळून आल्यास, त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून सात (७) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**ॲड. आर. आर. तिवारी**
**रामनगर, वर्धा.**
**मो. नं. ९९२२४२६१६८**

# महाराष्ट्र बोर्डाचा मोठा निर्णय;
# परीक्षा केंद्रांवर ई-मेलद्वारे पोहोचणार प्रश्नपत्रिका

**पुणे/प्रतिनिधी :** दहावी आणि बारावीच्या परीक्षा अधिक पारदर्शक, सुरक्षित तसेच पर्यावरणपूरक करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. पुढील वर्षापासून बोर्डाच्या प्रश्नपत्रिका ऑनलाइन पद्धतीने परीक्षा केंद्रांवर पाठविण्यात येणार असून, त्यासाठी आवश्यक डिजिटल सुविधा मंडळाकडून उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघ आणि महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्यात राज्य मंडळाच्या मुख्य कार्यालयात झालेल्या संयुक्तसहविचार सभेत हा निर्णय घेण्यात आला.बैठकीस राज्य मंडळाचे अध्यक्ष डा. त्रिगुण कुलकर्णी, सचिव डा. दीपक माळी, महासंघाचे अध्यक्ष डा. संजय शिंदे उपस्थित होते. या नव्या व्यवस्थेनुसार परीक्षा सुरू होण्याच्या काही वेळ आधी प्रश्नपत्रिका ई-मेलद्वारे परीक्षा केंद्रांवर पाठविण्यात येतील.नवीन प्रणालीअंतर्गत परीक्षा सुरू होण्याच्या काही वेळ आधी प्रश्नपत्रिका ई-मेलद्वारे संबंधित परीक्षा केंद्रांवर पाठविण्यात येतील. त्यानंतर केंद्रांवरच प्रश्नपत्रिकांच्या आवश्यक प्रती छापून विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार त्यांचे वितरण केले जाईल.या व्यवस्थेसाठी परीक्षा केंद्रांवर संगणक, प्रिंटर, साफ्टवेअर, वायफाय सुविधा आणि अन्य आवश्यक डिजिटल पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी राज्य मंडळाने स्वीकारली आहे.या नव्या उपक्रमामुळे प्रश्नपत्रिका वाहतूक, साठवणूक आणि सुरक्षेशी संबंधित अडचणी कमी होण्यास मदत होणार आहे. तसेच प्रश्नपत्रिका गळती रोखणे, परीक्षा प्रक्रिया अधिक सुरक्षित करणे आणि कागदाचा वापर नियंत्रित ठेवणे यासाठीही ही प्रणाली उपयुक्त ठरेल, असा विश्वास शिक्षण मंडळाने व्यक्त केला आहे.राज्यातील लाखो विद्यार्थी आणि हजारो परीक्षा केंद्रांसाठी ही डिजिटल परीक्षा व्यवस्था महत्त्वाचा बदल ठरणार असून तिच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक तयारी लवकरच सुरू करण्यात येणार आहे.



# सीबीएसईने मनमानीपणे त्रि-भाषा सूत्र लागू केले : काँग्रेस


**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** काँग्रेस पक्षाने गुरुवारी केंद्र सरकारवर, सीबीएसईने इयत्ता नववी आणि दहावीमध्ये त्रि-भाषा सूत्र लागू करण्यासंदर्भात राजकीय अजेंडा राबवत असल्याचा आरोप केला. पक्षाचे सरचिटणीस जयराम रमेश म्हणाले की, या निर्णयाला कोणताही शैक्षणिक आधार नाही आणि तो पूर्णपणे राजकीय हेतूने प्रेरित आहे. त्यांनी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्यावर निशाणा साधत त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली.

जयराम रमेश यांनी 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफ?र्मवर सांगितले की, डिसेंबर २०२५ मध्ये सीबीएसई नियामक मंडळाच्या बैठकीत, जोपर्यंत एनसीईआरटी विविध भाषांसाठी वर्गनिहाय पाठ्यपुस्तके प्रसिद्ध करत नाही, तोपर्यंत सध्याची भाषा प्रणाली सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या निर्णयावर तत्कालीन सीबीएसई अध्यक्ष आणि सचिवांनीही स्वाक्षरी केली होती.

त्यांनी असा आरोप केला की, असे असूनही, मे २०२६ मध्ये सीबीएसईने १ जुलै २०२६ पासून इयत्ता नववी आणि दहावीमध्ये तिसरी भाषा अनिवार्य करणारे परिपत्रक जारी केले. इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना तिसरी भाषा शिकवण्यासाठी एनसीईआरटीची इयत्ता सहावीची पाठ्यपुस्तके वापरण्याचे निर्देशही शाळांना देण्यात आले होते.

गेल्या सहा महिन्यांत काय बदलले आहे, असा प्रश्न काँग्रेस नेत्याने विचारला. एनसीईआरटीने (ग्क्व्व्छ्) अद्याप इयत्ता नववी आणि दहावीसाठी तिस-या भाषेची नवीन पाठ्यपुस्तके प्रसिद्ध केलेली नाहीत. ते म्हणाले की, सीबीएसईने (क्एच्क्) स्वत?च्याच अभ्यासक्रम समिती आणि नियामक मंडळाच्या शिफारशींकडे दुर्लक्ष करून यू-टर्न घेतला आहे.

रमेश म्हणाले की, या निर्णयामुळे शाळांच्या शैक्षणिक योजनांमध्ये व्यत्यय येत आहे आणि याचा परिणाम लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्यावर होउ शकतो. त्यांच्या मते, शिक्षण मंत्रालय आणि सीबीएसईसारख्या स्वायत्त संस्था शिक्षण तज्ज्ञांच्या सल्ल्याऐवजी सरकारच्या राजकीय अजेंड्यानुसार काम करत आहेत.ते म्हणाले की, जेव्हा उत्तरदायित्व निश्चित करण्याचा प्रश्न येतो, तेव्हा अधिका-यांच्या बदल्या केल्या जातात, तर राजकीय नेतृत्वाला संरक्षण दिले जाते. रमेश यांनी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना शैक्षणिक तज्ञतेचा अनादर करणारी राजकीय व्यक्ती म्हटले आणि त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली.



हे लक्षात घेण्यासारखे आहे की, सीबीएसईच्या ऑन-स्क्रीन मार्किंग (ग्ध्) वादावरून काँग्रेस गेल्या काही काळापासून केंद्र सरकार आणि शिक्षण मंत्रालयावर सातत्याने टीका करत आहे. पक्षाने इयत्ता बारावीच्या उत्तरपत्रिकांच्या डिजिटल मूल्यांकनात गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप केला आहे. या वाद प्रकरणानंतर, सीबीएसईचे अध्यक्ष राहुल सिंह आणि सचिव हिमांशू गुप्ता यांच्या बदल्या करण्यात आल्या. केंद्र सरकारने ओएसएम प्रणालीशी संबंधित खरेदी प्रक्रिया आणि संबंधित बाबींची चौकशी करण्यासाठी एक सदस्यीय समिती स्थापन केली आहे. या समितीचे अध्यक्षपद क्षमता विकास आयोगाच्या अध्यक्षा एस. राधा चौहान भूषवतील.

# भारताची परराष्ट्र नीती अमेरिकेच्या दबावाखाली -राहुल गांधी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्रातील मोदी सरकारवर जोरदार टीका केली आहे. सिमकनी येथे आयोजित काँग्रेसच्या जाहीर सभेला खराब हवामानामुळे राहुल गांधी प्रत्यक्ष उपस्थित राहू शकले नाहीत. मात्र, त्यांनी दिल्लीहून दूरध्वनीद्वारे सभेला संबोधित केले. आपल्या भाषणात राहुल गांधी यांनी देशाची परराष्ट्र नीती, कृषी क्षेत्र आणि शिक्षण व्यवस्थेच्या मुद्द्यांवरून केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला.



गुरुवारी झालेल्या या सभेत राहुल गांधी यांनी केंद्र सरकारच्या परराष्ट्र धोरणावर गंभीर प्रश्न उपस्थित करत आरोप केला की, नरेंद्र मोदी सरकारने अमेरिकेसमोर पूर्णपणे शरणागती पत्करली आहे. ते म्हणाले, आज आपल्या देशाची परराष्ट्र नीती अमेरिकेच्या प्रभावाखाली आहे. अमेरिका भारतावर दबाव टाकत आहे आणि भारताने कोणत्या देशाकडून तेल खरेदी करावे आणि कोणत्या देशाकडून करू नये, हेही तीच ठरवत आहे. परराष्ट्र धोरणासोबतच काँग्रेस नेत्यांनी केंद्र सरकारच्या अंतर्गत धोरणांवरही तीव्र टीका केली. त्यांनी म्हटले की, केंद्राच्या सध्याच्या धोरणांमुळे देशातील शिक्षण व्यवस्था आणि कृषी क्षेत्र गंभीर संकटाचा सामना करत आहेत. सरकारची धोरणे सामान्य जनता आणि शेतक-यांच्या हितासाठी नसून, काही मोजक्या लोकांना लाभ मिळावा यासाठी आखली जात आहेत. वस्तू आणि सेवा कराचा (जीएसटी) उल्लेख करत राहुल गांधी म्हणाले की, हा कर चुकीच्या पद्धतीने लागू करण्यात आल्यामुळे देशातील लहान उद्योग आणि व्यवसाय बंद पडले आहेत.त्यामुळे रोजगाराच्या संधी कमी झाल्या असून व्यापार काही मोठ्या उद्योगपतींच्याच हातात केंद्रित झाला आहे.भाषणाच्या शेवटी राहुल गांधी यांनी अल्मोडा येथील नागरिक आणि पक्ष कार्यकर्त्यांना निराश न होण्याचे आवाहन केले. ते म्हणाले की, ते लवकरच पुन्हा त्यांच्या भेटीस येतील. त्यानंतर त्यांनी आपले भाषण समाप्त केले. सभास्थळी उपस्थित असलेल्या काँग्रेसच्या राज्य प्रभारी कुमारी शैलजा यांनी खराब हवामानामुळे राहुल गांधी यांचा दौरा रद्द झाल्याची अधिकृत घोषणा केली आणि त्यांनी दूरध्वनीद्वारे सभेशी संवाद साधल्याची माहिती दिली. यावेळी प्रदेशाध्यक्ष गणेश गोदियाल, माजी मुख्यमंत्री हरीश रावत, आमदार सुमित हृदयेश, मनोज तिवारी, यशपाल आर्य, प्रीतम सिंह, भुवन कापडी, हरीश धामी आदी नेते उपस्थित होते.

# पंतप्रधान शुक्रवारी सुरत आणि दमणच्या दौ-यावर

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवारी गुजरातमधील सूरत आणि केंद्रशासित प्रदेश दमन यांच्या दौ-यावर जाणार आहेत. या दौ-यात ते सूरत येथे सुमारे १८,८०० कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन, लोकार्पण आणि भूमिपूजन करणार आहेत. त्यानंतर दमन येथेही सुमारे २,९७० कोटी रुपयांच्या विकासकामांचे उद्घाटन आणि भूमिपूजन करण्यात येणार आहे. पंतप्रधान शुक्रवारी दुपारी सुमारे २.३० वाजता सूरत जिल्ह्यातील हजीरा येथे पोहोचतील. तेथे सुरू असलेल्या औद्योगिक कामकाजांचा आणि पायाभूत सुविधा प्रकल्पांचा आढावा घेतील. त्यानंतर सायंकाळी ४.१५ वाजता सूरतमधील जाहीर सभेला संबोधित करत १८,८०० कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या प्रकल्पांचे राष्ट्राला समर्पण करतील.पंतप्रधान वडोदरा-मुंबई आठ पदरी नियंत्रित प्रवेश असलेल्या द्रुतगती महामार्गाच्या (एक्सप्रेसवे) पॅकेज क्रमांक ६ आणि ७ चे लोकार्पण करतील. या प्रकल्पामुळे गुजरात आणि महाराष्ट्र यांच्यातील जलद वाहतूक, लाजिस्टिक्स आणि आर्थिक संपर्क अधिक मजबूत होणार आहे.याशिवाय, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५६ (एनएच-५६) वरील महत्त्वाच्या मार्गांचे चौपदरीकरण करण्याच्या प्रकल्पाची पायाभरणीही ते करतील. या प्रकल्पामुळे आदिवासी भागांतील रस्ते संपर्क सुधारेल आणि स्टॅच्यू ऑफ युनिटीपर्यंतचा प्रवास अधिक सुलभ होईल.सूरतमध्ये २०० खाटांच्या ईएसआयसी रुग्णालयाचे उद्घाटनही करण्यात येणार आहे. या रुग्णालयात अत्याधुनिक आरोग्य सुविधा, २४ तास आपत्कालीन सेवा आणि ट्रामा केअर उपलब्ध असेल. तसेच वीज वहन (ट्रान्समिशन) जाळ्याचा विस्तार, वलसाडमधील सुधारित वीज वितरण योजना, दहेज पीसीपीआयआर (पेट्रोलियम, रसायन व पेट्रोकेमिकल गुंतवणूक क्षेत्र) आणि जंबूसर बल्क ड्रग पार्क यांसारख्या महत्त्वाच्या औद्योगिक व सार्वजनिक उपयुक्तता प्रकल्पांचे उद्घाटन आणि भूमिपूजनही होणार आहे.सूरतमधील कार्यक्रमानंतर पंतप्रधान दमनला रवाना होतील. सायंकाळी ६.१५ वाजता ते नमो विमानतळाच्या नव्या टर्मिनल इमारतीचे उद्घाटन करतील. त्यानंतर लगेचच नमो रुग्णालय राष्ट्राला समर्पित केले जाईल.दमनमध्ये एकूण २,९७० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे उद्घाटन आणि लोकार्पण होणार असून त्यामध्ये सुमारे १,३४० कोटी रुपयांच्या पूर्ण झालेल्या प्रकल्पांचा समावेश आहे. सायंकाळी ७.१५ वाजता पंतप्रधान १,६३० कोटी रुपयांच्या नव्या प्रकल्पांची पायाभरणी करतील. यामध्ये आयक?निक ब्रिज, दमन कन्व्हेन्शन सेंटर आणि निफ्ट कॅम्पस यांचा समावेश आहे.पंतप्रधान लक्षद्वीप केंद्रशासित प्रदेशातील ८८५ कोटी रुपयांच्या चार महत्त्वाच्या बंदर प्रकल्पांचीही पायाभरणी करणार आहेत. कल्पेनी आणि कदमत बेटांवर उभारल्या जाणा-या बहुउद्देशीय जेटींमुळे मोठ्या क्रूझ जहाजांना आणि प्रवासी नौकांना धक्का लावणे अधिक सुलभ होईल.या प्रकल्पांमुळे पर्यटन, मत्स्यव्यवसाय आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा आहे. हे सर्व प्रकल्प रस्ते, आरोग्य, हवाई संपर्क, वीज, औद्योगिक विकास आणि पर्यटन क्षेत्र अधिक बळकट करण्यासाठी महत्त्वाचे ठरणार आहेत. विशेषत? आदिवासी भागांचा विकास, बंदर पायाभूत सुविधा आणि आरोग्य सेवांवर विशेष भर देण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन्ही ठिकाणी जाहीर सभांनाही संबोधित करणार असून, हा दौरा गुजरात तसेच दादरा आणि नगर हवेली व दमण-दीव यांच्या विकासाला नवी गती देणारा मानला जात आहे.



# सेन्सॉर बोर्डाचे माजी अध्यक्ष पहलाज निहलानी यांचे निधन

**मुंबई/प्रतिनिधी :** चित्रपटसृष्टीतून एक दु:खद बातमी समोर येत आहे. प्रसिद्ध निर्माते आणि केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाचे (सेन्सार बोर्ड) माजी अध्यक्ष, पहलाज निहलानी यांचे निधन झाले आहे. सेन्सार बोर्डातील त्यांच्या कठोर भूमिकेसाठी पहलाज ओळखले जात होते. वयाच्या ७६ व्या वर्षी त्यांचे निधन झाले असून, त्यांच्या निधनाने चित्रपटसृष्टीत शोककळा पसरली आहे. पहलाज निहलानी त्यांच्या स्पष्टवक्तेपणासाठी ओळखले जात होते. सेन्सार बोर्डाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी असे अनेक निर्णय घेतले, ज्यांची आजही चर्चा होते.पहलाज निहलानी यांनीच गोविंदाला चित्रपटसृष्टीत आणले आणि त्याला सुपरस्टार बनवले. त्यांनी १९८६ साली 'इल्झाम' या चित्रपटातून त्याला लाँच केले. पहलाज यांना गोविंदाचा लूक आवडला नसला तरी, त्याच्या नृत्यकौशल्याने आणि अक्शन कौशल्याने ते इतके प्रभावित झाले की त्यांनी गोविंदाला मुख्य अभिनेता म्हणून लाँच केले.पहलाज निहलानी यांनी केवळ गोविंदालाच स्टार बनवले नाही, तर त्यांनी चंकी पांडेलाही लाँच केले. इतकेच नाही, तर ९० च्या दशकात, अल्पावधीतच इंडस्ट्रीत आपली ओळख निर्माण करणा-या दिव्या भारतीलाही पहलाज निहलानी यांनी सुपरस्टार बनवले.१९८७ मध्ये, त्यांनी 'आग ही आग' या चित्रपटाद्वारे चंकी पांडेला चित्रपटसृष्टीत पहिली मोठी संधी दिली. यामुळे चंकी पांडेला एक यशस्वी कारकीर्द मिळाली. यानंतर, १९९३ मध्ये, त्यांनी गोविंदा आणि चंकी पांडे अभिनीत 'आँखें' हा सुपरहिट चित्रपट बनवला, जो त्या वर्षातील सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरला. पहलाज निहलानी यांनी २०१५ ते २०१७ या काळात सीबीएफसीचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले. या काळात त्यांच्या निर्णयांवरून त्यांच्यावर मोठ्या प्रमाणावर टीका झाली. त्यांनी चित्रपटांमधील शिवीगाळ, धूम्रपानाची दृश्ये, अश्लीलता आणि राजकीयदृष्ट्या संवेदनशील संवादांवर कठोर कारवाई करण्यास सुरुवात केली. त्यांनी शाहिद कपूर आणि आलिया भट्ट यांच्या गाजलेल्या 'उडता पंजाब' या चित्रपटातील अनेक दृश्ये वगळण्याचे आदेश दिले. तसेच, 'लिपस्टिक अंडर माय बुरखा'वर बंदी घालणे आणि चित्रपटांमधील चुंबन दृश्यांवर निर्बंध घालणे यांसारखे महत्त्वपूर्ण निर्णयही त्यांनी घेतले.



# वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेट 30 जुन पुर्वी बसविणे बंधनकारक

**मुंबई/प्रतिनिधी :**केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ५० नुसार राज्यातील सर्व शासकीय आणि खाजगी वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट बसवणे अनिवार्य करण्यात आले आहे. या संदर्भात प्रशासनाकडून अत्यंत महत्त्वाची माहिती समोर आली असून, १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांना दि. ३० जून २०२६ पर्यंत ही नंबर प्लेट बसवणे बंधनकारक आहे. अशी माहिती उपप्रादेशिक परिवहन अधिकारी बालाजी धनवे यांनी दिली. केंद्रीय रस्ते व महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या ६ डिसेंबर २०१८ रोजीच्या राजपत्रानुसार, १ एप्रिल २०१९ पासून उत्पादित होणा-या सर्व नवीन वाहनांना हाय सिक्युरिटी नंबर प्लेट इन-बिल्ट म्हणजेच कंपनीकडूनच बसवून देणे अनिवार्य करण्यात आले होते. मात्र, आता १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व खाजगी तसेच शासकीय वाहनांनाही ही नंबर प्लेट बसवण्यासाठी दि. ३० जून २०२६ ही अंतिम मुदत देण्यात आली आहे. या नियमाच्या पार्श्वभूमीवर, सर्व शासकीय कार्यालय प्रमुखांना विशेष पत्रान्वये सूचित करण्यात आले आहे. आपल्या कार्यालयाच्या अभिलेखावर नोंद असलेल्या आणि १ एप्रिल २०१९ पूर्वी खरेदी केलेल्या सर्व शासकीय वाहनांना विहित मुदतीत म्हणजेच दि. ३० जून २०२६ पूर्वी उच्च श्रेणी नोंदणी पाटी बसवून घ्यावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. मुदतीपूर्वी हे काम पूर्ण झाल्यास या संदर्भातील अहवाल वरिष्ठ कार्यालयाला सादर करणे सोयीचे होईल, असेही उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, बीड यांनी कळविले आहे.

# ही घरकोंबड्यांची नव्हे तर कार्यकर्त्यांची निवडणूक-बन

**मुंबई/प्रतिनिधी :** विधान परिषदेची निवडणूक कार्यकर्त्यांची राहिलेली नाही, असे म्हणणा-या संजय राउत यांनी हे लक्षात घ्यावे की उबाठा गटाकडे कार्यकर्तेच शिल्लक राहिले नसतील तर ती कार्यकर्त्यांची निवडणूक कशी राहील? महापालिका आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुकीच्यावेळी तुम्ही घरात बसला होतात. तुम्ही कार्यकर्त्यांना वा-यावर सोडले. कोणतीही निवडणूक कार्यकर्त्यांच्या जीवावर लढता येते आणि जिंकता येते. भाजपा-महायुतीने कार्यकर्त्यांना मोठे केले, त्यांना संधी दिली. त्यामुळे ही घरकोंबड्यांची नव्हे तर कार्यकर्त्यांची निवडणूक आहे, असा घणाघात भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्तेनवनाथ बन यांनी गुरुवारी केला. भाजपा कार्यालयातील पत्रकार परिषदेत ते बोलत होते.संकटमोचक काय करणार आहेत, हे विधान परिषदेच्या निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर संजय राउतांना समजेल. संपलेल्या पक्षाला ना संकटाची भीती असते, ना संकटमोचकाची. उबाठा गट पूर्ण अस्तित्वहीन झालेला असल्याने त्यांना ना संकटाची भीती आहे, ना संकटमोचकाची. तुमची मशाल कुठेकुठे विझली आहे ते पहा. आपल्या उबाठाची कचराकुंडी झालेली आहे, त्याकडे राउतांनी पहावे. महाराष्ट्राचा इतिहास पाहिला तर सर्वात जास्त उद्योगपतींना तिकीट देण्याचे काम उद्धव ठाकरे आणि संजय राउत यांनी केले. विधान परिषदेची आणि राज्यसभेची यादी वाचून दाखवली तर तुम्ही कुठल्याकुठल्या उद्योगपतींना कसे कसे तिकीट दिले होते, हे महाराष्ट्राने पाहिले असल्याचे बन यांनी सुनावले.



श्री. बन पुढे म्हणाले, २०२९ ची लोकसभा निवडणुकही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली होईल आणि ते पुन्हा एकदा पंतप्रधान होतील. पुढच्या दीड वर्षांत संजय राउत हे उबाठा गट सोडून राज्यसभेसाठी राहुल गांधींच्या पाया पडून काँग्रेसमध्ये पक्षप्रवेश करतील. उद्धव आणि आदित्य ठाकरे हे संजय राउतांना राज्यसभेची संधी देणार नसल्याने संजय राउत यांच्यासमोर काँग्रेसमध्ये प्रवेश केल्याशिवाय पर्याय उरणार नाही.

बारामतीत सुरु असलेले युगेंद्र पवार यांचे आंदोलन सरकारच्या विरोधात नाही तर हा युगेंद्र पवार विरुद्ध रोहित पवार असा हा सामना आहे. दोन-चार दिवसांपासून रोहित पवार महागाईच्या मुद्द्यावर आंदोलन करत आहेत. मग रोहित पवारांचा गट पुढे चालला आहे म्हणून आज युगेंद्र पवार आपली वेगळी चूल मांडत आंदोलनाचा प्रयत्न करत आहेत. हा लढा महागाईच्या विरोधात नाही, तर शरद पवार यांचे वारसदार रोहित पवार आहेत की युगेंद्र पवार यासाठी सुरू आहे, असे बन म्हणाले.

ममता बॅनर्जीचा पक्ष भाजपाने फोडला नाही तर ममता बॅनर्जी, अभिजीत बॅनर्जीची दादागिरी झुगारून तिथल्या आमदारांनी स्वतःला स्वतंत्र करून घेतले असल्याचे सांगून बन म्हणाले, आता पश्चिम बंगाल दहशतमुक्त राज्य झाले आहे. या आमदारांनी त्यांचा स्वतंत्र गट केलेला आहे. आता ना ममतादीदींची दहशत राहिली, ना त्यांच्या भाच्याची. ममता बॅनर्जीचा बालेकिल्ला, त्यांच्या अहंकाराचा गड हा पश्चिम बंगालच्या जनतेने उध्वस्त केला आहे. त्यामुळे आजपर्यंत दहशतीत राहणा-या आमदारांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे आणि ते स्वतंत्रपणे आपले धोरण आणि विचार पुढे नेण्याचे काम करत आहेत.

# दिव्यांग संस्थांना मोठा दिलासा; 58 संस्थांना त्रुटी पूर्ततेची संधी

## 74 उपक्रमांना 100 टक्के वेतन अनुदानासाठी अंतिम मुदत

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कार्यरत विशेष शाळा आणि पुनर्वसन संस्थांना शासनाने मोठा दिलासा दिला असून विविध अनुदान योजनांअंतर्गत अपात्र ठरलेल्या संस्थांना त्रुटी पूर्ततेची अंतिम संधी देण्यात आली आहे. दिव्यांग सक्षमीकरण विभागाने यासंदर्भात स्वतंत्र आदेश जारी करून संबंधित संस्थांकडून आवश्यक कागदपत्रे निश्चित मुदतीत सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. शासन निर्णय १६ जुलै २०२४ अन्वये अनुदान तत्त्वावर मान्यता मिळविण्यासाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची राज्यस्तरीय तपासणी समितीने छाननी केली होती. त्यामध्ये निर्धारित मुदतीत प्राप्त ५२ प्रस्ताव आणि मुदतीनंतर प्राप्त ६ प्रस्ताव अशा एकूण ५८ उपक्रमांचे प्रस्ताव अपात्र ठरविण्यात आले होते. मात्र, दिव्यांग सक्षमीकरण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत संबंधित संस्थांना त्रुटी दूर करण्याची संधी देण्याचा निर्णय घेण्यात आला. संबंधित संस्थांना पत्र प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आवश्यक कागदपत्रे आणि माहिती ई-मेलद्वारे शासनाकडे सादर करावी लागणार आहे. या यादीमध्ये मतिमंद, मूकबधिर, अंध, बहुविकलांग विद्यार्थ्यांसाठी कार्यरत निवासी व विशेष शाळांचा समावेश असून काही अनुदानित संस्थांमधील वाढीव विद्यार्थी संख्येला मान्यता देण्यासंबंधीचे प्रस्तावही आहेत. राज्यातील १२१ विशेष उपक्रमांना ५० टक्क्यांवरून १०० टक्के वेतन अनुदान देण्याच्या प्रक्रियेलाही वेग देण्यात आला आहे. ६ नोव्हेंबर २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार ५० टक्के वेतन अनुदानावर मान्यता प्राप्त झालेल्या १२१ विशेष उपक्रमांपैकी अनेक संस्थांनी १०० टक्के वेतन अनुदानासाठी प्रस्ताव सादर केले आहेत. आतापर्यंत ७४ उपक्रमांचे प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाले असून त्यामधील त्रुटी दूर करण्यासाठी संबंधित संस्थांना अंतिम संधी देण्यात आली आहे. विभागाने स्पष्ट केले आहे की, राज्यस्तरीय छाननी समितीने अपात्र ठरविलेल्या ६८ उपक्रमांसह मुदतीनंतर प्रस्ताव सादर केलेल्या ६ उपक्रमांचा समावेश असलेल्या एकूण ७४ संस्थांनी आवश्यक पूर्तता करावी. या संस्थांना १५ दिवसांच्या आत आवश्यक माहिती आणि कागदपत्रे शासनाकडे सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# तुकाराम मुंढेंचा कारवायांचा धडाका; मुदतबाह्य लस्सी नष्ट तर सोयाबीन तेलाचा साठा जप्त

**बीड-** सर्वसामान्यांच्या आरोग्याशी खेळणा-या भेसळखोराविरोधात अन्न व औषध प्रशासन विभागाने बीड जिल्ह्यात मोठी मोहीम राबवून धाडसत्र सुरू केले आहे. एफडीएचे नवनियुक्त आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या आदेशानुसार अन्न सुरक्षा अधिका-यांच्या पथकाने बीड शहरातील विविध लस्सी केंद्रे आणि रिफाइंड सोयाबीन तेलाच्या गोदामांवर अचानक छापे टाकले. या धडक कारवाईत लस्सी तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे मुदतबाह्य (एक्सपायरी डेट संपलेले) घातक पदार्थ मोठ्या प्रमाणावर जप्त करण्यात आले असून दूषित लस्सीचा साठा तातडीने ओतून नष्ट करण्यात आला आहे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होउ नये म्हणून ही तातडीची कारवाई करण्यात आली. तपासणी दरम्यान नियमांचे उल्लंघन करणा-या एका गोदामातून संशयास्पद रिफाइंड सोयाबीन तेलाचा साठाही अधिका-यांनी जप्त केला असून त्याचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले आहेत.

# महाराष्ट्र लोकभवन येथे तेलंगणा राज्य स्थापना दिन साजरा

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी ३ जून रोजी महाराष्ट्र लोकभवन येथे तेलंगणा राज्याचा स्थापना दिवस सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. 'लोकभवन' मुंबई येथे 'वर्मा फाउंडेशन' आणि 'फेडरेशन ऑफ तेलगू असोसिएशन ऑफ महाराष्ट्र' यांच्या सहकार्याने आयोजित केला होता. या संस्थेच्या कलाकारांनी तेलंगणा राज्याची लोकगीते व लोकनृत्ये सादर केली. तेलंगणा राज्याचे पारंपरिक गीत 'जय जय हे तेलंगणा', 'आंदे श्री' तसेच 'वंदे शिवम शंकरम' ही गीते देखील सादर करण्यात आली. तेलंगणाचे राज्यपाल शिव प्रताप शुक्ला यांचा व्हिडिओ संदेश देखील यावेळी दाखविण्यात आला. कलाकारांनी रंगीबेरंगी 'बथुकम्मा', 'बोनालू' आणि इतर पारंपरिक नृत्यप्रकारांनी तेलंगणाच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे सुंदर दर्शन घडविले. नाट्य शिरोमणी शेख नादिया यांचे सादरीकरण विशेष उल्लेखनीय होते. त्यांच्या कलात्मकतेने आणि भावपूर्ण अभिनयाने उपस्थित प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले अशा शब्दांत राज्यपालांनी कौतुक केले. भारत सरकारच्या 'एक भारत श्रेष्ठ भारत' उपक्रमाचा भाग म्हणून तेलंगणा राज्य स्थापना दिवस लोकभवन येथे आयोजित करण्यात आला होता.

भारतातील प्रत्येक राज्याची वेशभूषा, भाषा, नृत्य व खाद्य संस्कृती वेगळी आहे. संपूर्ण देश फुलांच्या हाराप्रमाणे एका सांस्कृतिक धाग्याने बांधला गेला आहे. 'एक भारत श्रेष्ठ भारत' या उपक्रमामुळे प्रत्येक राज्याला इतर राज्यांची संस्कृती समजण्यास मदत होते, असे राज्यपालांनी यावेळी सांगितले.

विकसित भारत म्हणजे केवळ आर्थिक दृष्टीने समृद्ध भारत नसून 'सर्वे भवन्तु सुखिन?' या संकल्पनेमागील विचार असल्याचे राज्यपालांनी सांगितले. शासन आणि समाजाने खांद्याला खांदा लावून काम केल्यास विकसित भारत निश्चितपणे साकार होईल, असा विश्वास राज्यपालांनी यावेळी व्यक्त केला.

या कार्यक्रमाला राष्ट्रीय कंपनी कायदा लवादाचे (एनसीएलटी) माजी न्यायिक सदस्य न्यायमूर्ती (निवृत्त) मदन गोसावी, सुप्रसिद्ध चित्रपट निर्माते दिग्दर्शक राम गोपाल वर्मा, वर्मा फाउंडेशनचे अध्यक्ष पी. यू. एन. वर्मा, 'मराठी-तेलगू मंच'चे संस्थापक आणि 'फेडरेशन ऑफ तेलगू असोसिएशन ऑफ महाराष्ट्र'चे अध्यक्ष जगन बाबू गंजी, राज्यपालांचे सहसचिव एस. राममूर्ती, राज्यपालांचे परिवार प्रबंधक डा. निशिकांत देशपांडे, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशातील विविध संस्थांचे सदस्य उपस्थित होते.




# वहिनीचा अंघोळ करतानाचा व्हीडीओ काढून व्हायरल करण्याची धमकी देत बलात्कार

**खंडवा :** मध्य प्रदेशातील खंडवा जिल्ह्यातील खालवा पोलीस ठाणे हद्दीत नात्याला काळिमा फासणारी घटना घडली. एका ३० वर्षीय महिलेला ब्लॅकमेल करून तिच्यावर वारंवार अत्याचार केल्याप्रकरणी पीडिताने आपल्या दीराविरोधात खालवा पोलिस ठाण्यात तक्रारी दिली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून आरोपीविरुद्ध कठोर कारवाईची मागणी नागरिकांकडून केली जात आहे. याप्रकरणी खालवा पोलिसांनी पुढील तपासाला सुरुवात केली आहे.पीडित महिलेने पोलिसांना दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी हा तिचा लांबचा नातेवाईक आहे. काही दिवसांपूर्वी आरोपी दोन दिवसांसाठी पीडितेच्या घरी राहायला आला. त्याच काळात आरोपीने पीडितेचा आंघोळ करतानाचा व्हीडीओ काढला. त्यानंतर हा व्हीडीओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देत तिच्यावर वारंवार अत्याचार केला. बदनामीच्या भितीने पीडितेही ही बाब नातेवाईकांपासून लपवून ठेवली. मात्र आरोपीकडून होणार मानसिक आणि शारीरिक त्रास वाढत गेल्याने महिलेने खालवा पोलिस ठाणे गाठून तिच्यासोबत घडलेला सर्व प्रकार पोलिसांच्या कानावर घातला. महिलेच्या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी आरोपीविरुद्ध बलात्काराचा गुन्हा नोंदवला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, प्रकरण गांभीर्याने हाताळले जात असून फरार झालेल्या आरोपीचा शोध सुरू आहे. खालवा पोलिसांनी सांगितले की आरोपीला लवकरच अटक करून न्यायालयासमोर हजर केले जाईल. तसेच प्रकरणातील सर्व बाबींची सखोल आणि निष्पक्ष चौकशी करून दोषी आढळणा-याविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाईल.

देशाच्या शिक्षण क्षेत्रातील उणिवा सातत्याने समोर येऊ लागल्यामुळे पालक आणि विद्यार्थी वर्गामध्ये अस्वस्थता वाढू लागली आहे. 'नीट'च्या पेपरफुटी प्रकरणाचे धागेदोरे उलगडताना सीबीआयची दमछाक होत आहे. सर्वोच्च न्यायालयानेही 'एनटीए'ची कानउघाडणी करत विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी सुरू असलेल्या खेळाची पुनरुक्ती होणार नाही याबाबत खडे बोल सुनावले. दुसरीकडे सीबीएसई म्हणजेच केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या गैरकारभारामुळे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या क्षेत्रात हलकल्लोळ उडाला आहे.यंदा बारावीच्या निकालांमधील सावळागोंधळ आणि ऑन स्क्रीन मार्किंग प्रणालीमधील अक्षम्य चुकांमुळे सीबीएसई अडचणीत आलेली आहे. त्यातच मंडळाच्या पुनर्मूल्यांकन आणि गुण पडताळणी पोर्टलवर मोठा सायबर हल्ला झाला. देशात प्रत्येक क्षेत्राचे डिजिटायझेशन सुरू आहे. पण शिक्षणासारख्या संवेदनशील क्षेत्रात असे प्रयोग करताना जी पूर्वतयारी, तांत्रिक सज्जता आणि सुरक्षा आवश्यक असते, तिचा पूर्णपणे अभाव असल्याचे या प्रकरणाने सिद्ध केले. मूळ कागदी उत्तरपत्रिकांचे स्कॅनिंग करून शिक्षकांनी त्या संगणकाच्या पडद्यावर तपासण्याची पद्धत सीबीएसईने अंगिकारली. प्रत्यक्षात तिनेच महागोंधळ निर्माण केला. एका विद्यार्थ्याच्या आसन क्रमांकावर दुसऱ्याच विद्यार्थ्याची उत्तरपत्रिका अपलोड होणे, उत्तरपत्रिकेतील महत्त्वाची पाने गहाळ असणे, स्कॅन प्रती वाचता येऊ नयेत इतक्या अस्पष्ट असणे, हे प्रकार लाखो विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आयुष्याचा खेळखंडोबा करणारे ठरले. वेदांत श्रीवास्तव याला बारावीच्या भौतिकशास्त्र विषयात कमी गुण मिळाले. त्याने उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत मागवली. पण त्यातील हस्ताक्षर वेदांतचे नव्हतेच. उत्तरलेखनाची पद्धत आणि अक्षर वेगळे होते. म्हणजेच दुसऱ्या विद्यार्थ्याची उत्तरपत्रिका वेदांतच्या आसन क्रमांकावर अपलोड करून त्याच आधारावर मूल्यमापन करून त्याला गुण दिले होते.त्याने समाजमाध्यमावर कैफियत मांडली, तेव्हा त्याला न्याय देण्याऐवजी संपूर्ण यंत्रणेने त्यालाच खोटे ठरवण्याचा प्रयत्न केला.अखेर उत्तरपत्रिकेवरील हस्ताक्षर त्याचे नसल्याचे उघड झाले, तेव्हा सीबीएसईला चूक कबूल करावी लागली.एका विद्यार्थिनीच्या रसायनशास्त्राच्या उत्तरपत्रिकेत असाच प्रकार घडला. एका विद्यार्थ्याच्या उत्तरपत्रिकेतून एक पूर्ण पानच गायब होते.या सर्व गोंधळाच्या मुळाशी सीबीएसईने याच वर्षी लागू केलेली

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## शिक्षण क्षेत्रातील गोंधळनाट्य

नवीन डिजिटल प्रणाली असल्याचे सांगितले जात असले तरी त्यात विद्यार्थ्यांचा काय दोष?प्रणालीअंतर्गत त्रुटींचा फटका विद्यार्थ्यांनी का सोसायचा?ऑनलाईन स्क्रिप्ट मॉनिटरिंग सिस्टीम प्रणाली आणताना ती वेगवान, अधिक कार्यक्षम आणि मानवी चुका कमी करणारी पारदर्शक पद्धत म्हणून गवगवा केला गेला. मात्र, प्रत्यक्षात अनेक विद्यार्थ्यांना मिळालेल्या स्कॅन प्रती अस्पष्ट आणि वाचता न येणाऱ्या होत्या, काही वेळा तपासणीचे पोर्टलच ठप्प व्हायचे.झारखंडमधील बारावीची परीक्षा दिलेला विद्यार्थी सार्थक सिद्धांत याने सात पानी अहवाल संसदीय समितीसमोर सादर केला. यंदा सीबीएसईचा बारावीचा निकाल ८५.२० टक्के लागला असून गतवर्षीच्या तुलनेत तो ३ टक्क्यांनी घसरला आहे. ही मोठी घसरण आहे. 'सीबीएसई' सर्वात मोठ्या शिक्षण मंडळांपैकी एक आहे. देशातील ३३,००० हून अधिक शाळा या बोर्डाशी जोडलेल्या आहेत. बारावीच्या परीक्षेसाठी १७.८ लाख विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. अशा मोठ्या प्रमाणावर चालणाऱ्या व्यवस्थेत तांत्रिक त्रुटींमुळे विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ होणे चिंताजनक आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने यात हस्तक्षेप करत अध्यक्ष राहुल सिंह व सचिव हिमांशू गुप्ता यांची उचलबांगडी करत 'नीट' प्रकरणातील कसर भरून काढली हे योग्यच झाले. नवे अध्यक्ष प्रशांत लोखंडे आणि सचिव वरुण भारद्वाज यांच्यापुढे या संपूर्ण प्रकरणाची गुंतागुंत सोडवण्याचे आव्हान आहे.वास्तविक, सीबीएसईच्या प्रशासकीय मंडळाने जून २०२५ मध्ये स्पष्ट शिफारस केली होती की, ही डिजिटल पद्धत थेट लागू न करता आधी प्रादेशिक कार्यालयांतर्गत प्रायोगिक तत्त्वावर राबवावी. पाच शाळांमध्ये चाचणी घेतली; पण त्या चाचणीत शिक्षकांनी सॉफ्टवेअर गोठणे, गुण जतन न होणे, उत्तरपत्रिकेतील गुणांची रचना आणि सॉफ्टवेअरमधील तफावत अशा ३६ गंभीर त्रुटी नोंदवल्या. तरीही बोर्डाने या इशाऱ्यांकडे दुर्लक्ष करून घाईघाईने ही पद्धत का लागू केली? या डिजिटल मूल्यमापनाचे कंत्राट हैदराबादस्थित कंपनीला दिले होते. या कंपनीचा पूर्वेतिहास वादग्रस्त असून, तेलंगणा बोर्ड परीक्षेतील गोंधळासाठी यापूर्वीही तिच्यावर आरोप झाले होते. कंपनीला सर्वात कमी बोली लावली म्हणून कंत्राट दिले. या कंपनीने हा डेटा सुरक्षित भारतीय सर्व्हरवर ठेवण्याऐवजी परदेशी क्लाऊड सेवांवर साठवला आणि तो स्वयंचलित स्क्रिप्टद्वारे हाताळला. यामुळे डेटा गोपनीयतेच्या नियमांचे उल्लंघन झाले. याची चौकशी करण्यासाठी केंद्र सरकारने एकसदस्यीय उच्चस्तरीय समिती नेमली. पण प्रत्येकवेळी समस्या उद्भवल्यानंतर मलमपट्टीची वेळ येता कामा नये.केंब्रिज आणि ऑक्सफर्डच्या परीक्षांमध्ये 'स्क्रीन बेस्ड मार्किंग' (संगणकीय मूल्यमापन) दोन दशकांपासून यशस्वीरीत्या वापरले जात आहे. तेथील 'ऑफक्वाल' सारख्या स्वतंत्र नियामक संस्था कंत्राटदार कंपन्यांच्या सॉफ्टवेअरची वर्षभर आधीच 'सॉफ्टवेअर स्ट्रेस टेस्टिंग' आणि 'अल्गोरिदम ऑडिट' करून घेतात.उत्तरपत्रिका स्कॅन करताना प्रत्येक पानाची डिजिटल स्पष्टता तपासण्यासाठी स्वयंचलित गुणवत्ता नियंत्रण प्रणाली असते.एखाद्या पानाचे स्कॅनिंग अंधुक असेल,तर सॉफ्टवेअर ते पान मूल्यमापनासाठी पुढे पाठवण्यास नकार देते. यामुळे तांत्रिक त्रुटींची शक्यता नगण्य होते. सिंगापूर आणि हाँगकाँग येथे मूल्यमापनात पारदर्शकता आणण्यासाठी मल्टिपल ब्लाईंड इव्हॅल्युएशन (बहुस्तरीय गोपनीय मूल्यमापन) पद्धत विकसित केली. यात एकाच उत्तरपत्रिकेचे दोन वेगवेगळ्या शिक्षकांकडून स्वतंत्रपणे डिजिटल मूल्यमापन केले जाते.दोन्ही शिक्षकांनी दिलेल्या गुणांमध्ये जर पाच टक्क्यांपेक्षा जास्त तफावत आढळली, तर सॉफ्टवेअर ती उत्तरपत्रिका स्वयंचलितपणे तिसऱ्या वरिष्ठ मुख्य परीक्षकाकडे वर्ग करते.याशिवाय पुनर्मूल्यांकन आणि फेरतपासणीसाठी या देशांमध्ये ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. यामुळे विद्यार्थ्यांचा डेटा पूर्ण सुरक्षित राहतो आणि सायबर हल्ल्यांचा धोका उद्भवत नाही. अशा प्रणाली भारतातही आता यायला हव्यात. तरच शिक्षण क्षेत्रात सध्या सुरू असलेल्या गोंधळनाट्यावर पडदा पडेल.

# ममतांचा खेळ खल्लास !

**विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसचा पराभव झाल्यानंतर एक महिन्याच्या आतच होत्याचे नव्हते झाले आहे.त्यातून ममता सावरतील का?**



१९९८ साली ममतांनी काँग्रेस पक्षाचा राजीनामा दिला आणि तृणमूल काँग्रेसची स्थापना केली.पक्ष सोडताना त्यांनी कारण असे सांगितले की काँग्रेसचे नेतृत्व,पश्चिम बंगाल मधील सत्ताधारी डाव्या आघाडीच्या विरोधात मवाळ भूमिका घेत होते.त्यानंतर ममता बॅनर्जी यांनी राज्यातील सत्ताधारी डाव्या आघाडीशी रस्त्यावर उतरून संघर्ष केला. संप,मोर्चे निदर्शने, धरणे आंदोलन अशी निरनिराळी अस्त्रे वापरून डाव्या आघाडीला सळो की पळो करुन सोडले.२००१ मध्ये झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसला म्हणावे तसे यश मिळाले नाही परंतु त्यामुळे ममता निराश झाल्या नाही. त्यांनी आपली आंदोलने सुरूच ठेवली. २००४ च्या लोकसभा निवडणुकीत तर तृणमूल काँग्रेसतर्फे ममता या एकट्याच पश्चिम बंगाल मधून लोकसभेत निवडून आल्या. पण, त्या डगमगल्या नाहीत.डाव्या आघाडी बरोबर त्वेषाने लढण्याची जिद्द त्यांच्या अंगात होती.अशा वेळी २००७ साली झालेल्या सिंगूर आणि नंदिग्राम येथील आंदोलनाने त्यांना कमालीची साथ दिली आणि २०११ मध्ये झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसने डाव्या आघाडीचा पराभव करून, डाव्या आघाडीची ३४ वर्षांची राजवट संपुष्टात आणली.जी गोष्ट अशक्य वाटत होती ती ममतांनी शक्य करून दाखवली.

सत्ता हातात आल्यानंतर ममतांनी आपल्या पक्षाची संघटना मजबूतपणे बांधली.महत्वाचे म्हणजे त्यांनी आपली मजबूत 'व्होट बँक' तयार केली आणि त्या व्होट बँकेच्या जोरावर त्यांनी १५ वर्षे पश्चिम बंगालवर बिनधोकपणे राज्य केले.त्यांच्या पाठिराख्यांनी दहशत निर्माण करून नंतर झालेल्या सर्व निवडणुका पक्षाला जिंकून दिल्या. पंचायत निवडणुकीत तर पक्षाचे एक तृतियांश उमेदवार बिनविरोध निवडून आले होते.सामान्य माणसाला लहान सहान कामासाठी तृणमूलला कमिशन (कटमनी) द्यावे लागत होते.हे सर्व ममतांना ज्ञात नव्हते, असे नाही.पण त्यांनी सोयिस्करपणे तिकडे दुर्लक्ष केले.काँग्रेस आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट या आपल्या विरोधकांना त्यांनी पूर्णपणे संपवले.२०२१ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट या अनुक्रमे २५ आणि ३४ वर्षे पश्चिम बंगालवर राज्य करणाऱ्या पक्षांना विधानसभेची एकही जागा जिंकता आली नाही.इतकी केविलवाणी अवस्था,ममतांनी त्या पक्षांची करून टाकली.

मात्र त्या दरम्यान ममतांनी एक मोठी चूक केली,त्याची किंमत आता त्यांना मोजावी लागत आहे.२०१४ मध्ये नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपा केंद्रात सत्तेवर आल्यानंतर भाजपाने हळूहळू आपले पाय पश्चिम बंगालमध्ये पसरायला सुरुवात केली.त्या अगोदर पश्चिम बंगालमध्ये भाजपाची ताकद नगण्य होती.२०१४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाने पश्चिम बंगाल मधील दार्जिलिंग आणि आसनसोल या लोकसभेच्या जागा जिंकल्या होत्या.त्यानंतर भाजपाने आपली संघटना राज्यात हळूहळू मजबूत केली.२०१६ मध्ये झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत, भाजपाला अपेक्षित यश मिळाले नाही.भाजपाचे फक्त तीन उमेदवार त्या निवडणुकीत विजयी झाले.मात्र त्या पराभवाने खचून न जाता भाजपाने आपली संघटना राज्यात दूरवर पोहोचवण्यासाठी परिश्रम घेतले.त्याचे फळ भाजपाला २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत मिळाले.त्या निवडणुकीत भाजपाने राज्यातील लोकसभेच्या एकूण ४२ जागांपैकी १९ जागा जिंकून सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला.मात्र तेंव्हाही ममतांनी भाजपाच्या वाढत्या ताकदीकडे लक्ष दिले नाही.

२०२१ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपाने चांगली हवा निर्माण केली होती.परंतु त्या निवडणुकी मध्ये भाजपाची मजल ७७ जागांपर्यंतच पोहोचली.अर्थात २०१६ साली तीन जागा जिंकणाऱ्या भाजपाची ही प्रगती कुणाच्याही नजरेत भरणारी होती.मात्र ममतांनी ही धोक्याची घंटा समजून आपल्या कार्यपध्दतीत कुठलीही सुधारणा केली नाही.त्यांना सतत असे वाटत राहिले की भाजप हा बाहेरचा पक्ष असल्याने पश्चिम बंगाल मधील जनता त्याला मर्यादेबाहेर स्विकारणार नाही.भाजपला बंगाली अस्मितेशी काहीही देणेघेणे नाही.बंगालमधील धर्म निरपेक्ष जनता जातियवादी भाजपाला कधीच स्विकारणार नाही,असे आरोप त्या सतत करत राहिल्या,मात्र पक्ष कार्यकर्त्यांच्या आणि विशेषतः त्यांचे भाचे अभिषेक बॅनर्जी यांच्या हडेलहप्पी धोरणामुळे आपला पक्ष राज्यात वेगाने लोकप्रियता गमावत आहे,ही वस्तुस्थिती ममतांच्या लक्षातच आली नाही.४ मे २०२६ रोजी निवडणुकीचा निकाल लागेपर्यंत त्या याच समजुतीत राहील्या की आपला पराभव अशक्य आहे.

४ मे रोजी जेंव्हा तृणमूल काँग्रेसचा दणदणीत पराभव झाला तेंव्हा ममतांना कदाचित आपली चूक लक्षात आली असावी, परंतु तोंव्हा वेळ निघून गेली होती.पक्षाचा तर दारुण पराभव झालाच शिवाय ममताही भवानीपूर मतदारसंघात पराभूत झाल्या.त्यांच्यासाठी हा दुहेरी धक्का होता.ममतांच्या पक्षाचा पराभव झाल्यानंतर, त्यांचा पक्ष पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे कोसळला.भाजपाचे नव निर्वाचित मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी सत्तेची सूत्रे हाती घेतल्यानंतर ताबडतोब तृणमूलचे नेते आणि कार्यकर्ते यांच्या विरोधात निरनिराळ्या चौकशांचा ससेमिरा लावला, त्यामुळे ते सैरभैर झाले.राज्यातील निरनिराळ्या नगरपालिकांमधील तृणमूल काँग्रेसच्या नगरसेवकांनी राजीनामा सत्र सुरू केले.पक्षाचे काही नेते उघडपणे पक्ष नेतृत्वाच्या विरोधात बोलू लागले.त्यांची टिका प्रामुख्याने अभिषेक बॅनर्जी यांच्या विरोधात असल्याचे लवकरच स्पष्ट झाले ममतांनी जेव्हा पक्षाच्या नवनिर्वाचित आमदारांची बैठक घरी आयोजित केली तेव्हा त्या बैठकीला, तृणमूल काँग्रेसच्या निवडून आलेल्या ८० आमदारांपैकी फक्त २० आमदारांनी हजेरी लावली, तेंव्हाच सर्व गोष्टी स्पष्ट झाल्या होत्या.त्यानंतर ममतांनी धरणे धरण्याचा कार्यक्रम आयोजित केला. त्या कार्यक्रमात पक्षाचे फक्त आठ आमदार आणि सहा खासदार सहभागी झाले, तेंव्हाच पक्षाचे भवितव्य पुरेसे स्पष्ट झाले होते.

पक्षाने, दोन बंडखोर आमदार,ऋतव्रत बॅनर्जी आणि संदिपान साहा यांची पक्ष विरोधी कारवायांबद्दल पक्षातून हकालपट्टी केल्यानंतर घटना वेगाने घडत गेल्या.पक्षाच्या ५८ आमदारांनी आपल्या सह्यांचे एक पत्र, विधानसभा अध्यक्षांना सादर केले आणि विधान सभेतील विरोधी पक्ष नेतेपदी ऋतव्रत बॅनर्जी यांची नियुक्ती करण्यात यावी अशी शिफारस केली.विधानसभा अध्यक्षांनी ताबडतोब त्याला मान्यता दिली.आता ऋतव्रत बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील गट हा 'रियल तृणमूल काँग्रेस' म्हणून ओळखला जाईल.ममता बॅनर्जी याच आमच्या नेत्या आहेत,असे जाहीर करून ऋतव्रत यांनी ममतांना पेचात टाकले आहे.ममतांनी आमच्या मुख्य सल्लागार या नात्याने आम्हाला मार्गदर्शन करावे असे सांगून, ऋतव्रत यांनी अप्रत्यक्षपणे ममतांना मार्गदर्शक मंडळात नेऊन बसवले.अशा प्रकारे ममतांनी १९९८ साली स्थापन केलेला पक्ष २८ वर्षांनी त्यांच्या हातातून निसटला.केंद्रात सत्तेवर असलेल्या भाजपला सत्तेतून खाली उतरवण्याची स्वप्ने पाहणाऱ्या, ममतांना आपला पक्ष वाचवता आला नाही.ऋतव्रत बॅनर्जी हे केवळ निमित्त ठरले.२०१८ साली ते मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षातून तृणमूल मध्ये आले.ते काही मासबेस असलेले नेते नाहीत.त्यांचा कामगार संघटनेतील पुर्वानुभव लक्षात घेऊन, ममतांनी त्यांच्याकडे तृणमूलच्या कामगार संघटनेची जबाबदारी सोपवली होती. ममतांनी त्यांची पक्षातून हकालपट्टी केल्यानंतर ते एकदम प्रकाशात आले.आता ममतांसोबत राहिलेले आमदार किती दिवस त्यांची पाठराखण करतील ते पहावे लागेल. विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसचा पराभव झाल्यानंतर एक महिन्याच्या आतच होत्याचे नव्हते झाले आहे.त्यातून ममता सावरतील का, या प्रश्नाचे उत्तर मिळण्यासाठी थोडी वाट पहावी लागेल.

**अभय गोखले**

# 'का रे' म्हणण्याची हिम्मत दाखवावीच!

दिल्लीत सुरू असलेल्या भारत अमेरिका व्यापार करार वाटाघाटीतील 'चोक पॉइंट'! 'हां, चल बसून बोलूया' म्हणत आपल्यापेक्षा कमकुवत माणसाला, टेबलवर रिव्हॉल्वर ठेवून, समोरच्या खुर्चीत बसायला लावणारा दादा म्हणजे अमेरिका.मागच्या वर्षी एप्रिलमध्ये डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतासकट अनेक राष्ट्रांकडून अमेरिकेत येणाऱ्या आयातीवर अव्वाच्या सव्वा आयात कर लावले.भारतावर चीन खालोखाल सर्वात जास्त. त्यावेळी देखील सर्व राष्ट्रांना हे कळत होते की निर्यात करणाऱ्या देशांना गुडघे टेकायला लावण्यासाठी हे अवाजवी कर हत्यार आहेत.

मग मागच्या जानेवारीत अमेरिकतील सुप्रीम कोर्टाने निर्णय दिला की आयात कर लावण्याचा अधिकार अमेरिकन काँग्रेसला आहे, म्हणून ट्रम्प यांनी स्वतःच्या अधिकारात लावलेले आयातकर घटनाबाह्य आहेत.

त्यानंतर अमेरिकेने भारताबरोबर ( आणि ईतर देशांबरोबर) द्विपक्षीय व्यापार करार करण्याच्या दिशेने पाऊले उचलली.

रेसिप्रोकल टेरिफचे अस्त्र सुप्रीम कोर्टाने म्यान करायला लावल्यानंतर आता अमेरिकेने USA Trade Act अंतर्गत एम्नूदह ३०१ ची तलवार काढली आहे. या कलमानंतर्गत जर कोणतेही राष्ट्र अमेरिकेला निर्यात करतांना अयोग्य मार्ग अवलंबत आहे असे आढळले (Unfair Trade Practices) तर अमेरिकन प्रशासन त्याची औपचारिक चौकशी करून अशा मालावर अतिरिक्त आयात कर लावू शकते..

'अयोग्य मार्ग' म्हणजे काय ते अमेरिका ठरवणार!उदा अमेरिकेला निर्यात केलेला माल उत्पादन करतांना वेठबिगार/ forced labour किंवा तत्सम मानवी श्रम वापरले गेले असा आढळले तर त्या मालावर अतिरिक्त आयात कर लावला जाणार.



भारताकडून अमेरिकेला निर्यात होणाऱ्या वास्तुमालात तयार कपडे,हिरे, दागिने अशा श्रम प्रधान वस्तू आहेत. त्यामध्ये कामगारांना कमी वेतनावर,अनिल तास,कामाच्या ठिकाणी फारसा सुविधा नसताना काम करून घेतले जाते हे उघड गुपित आहे. त्याचा वापर अमेरिका करू शकते अशी चिन्हे आहेत.

काय दिवस आलेत! अमेरिका गरीब देशामधील गरीब कामगारांचा कैवारी!काय योग्य / काय अयोग्य सगळा इंग्रजी भाषेचा खेळ असतो.एन्ट्री नाकारण्यासाठी एक फिल्टर. अमेरिकेला भारत किंवा इतर देशातील कामगार शोषणाबद्दल काहीही पडलेली नाही.

या दिवसात दिल्लीमध्ये अमेरिका आणि भारताच्या प्रतिनिधींमध्ये व्यापार कराराची अंतिम फेरी चर्चिली जात आहे. त्याचवेळी अमेरिकेच्या USTR ऑफिसने एम्नूदह ३०१ ची तलवार उपसली आहे. १२.५ टक्के अतिरिक्त आयात कर जाहीर सुद्धा केला आहे.

खरी गोष्ट अशी आहे की अमेरिकेसारख्या देशाबरोबर शुद्ध व्यापार करार असा काही नसतो. भारत चीन/रशिया यांच्या उभरत्या गटाबरोबर भारत सख्य ठेवणार की अमेरिकेच्या गटात येणार, भारत अमेरिकेकडून संरक्षण सामुग्री विकत घेणार की रशियाकडून, भारतात अमेरिकेन भांडवल किती येणार,अमेरिका भारतीय प्रोफेशनल्सना किती आणि कोणत्या प्रकारचे व्हिसा देणार, अंतरराष्ट्रीय संस्था नाणेनिधी/जागतिक बँक/पत मानांकन संस्था भारताला अकोमोडेट करणार की नियमावर बोट ठेवणार..असे सारे काही एकत्रित बघितले जात असते.

२०२५ सालात भारताची अमेरिकेला निर्यत १०० बिलियन डॉलर्स तर अमेरिकेडून भारताने केलेली आयात ४५ बिलियन डॉलर्स आहे.अमेरिकेला ही तफावत काहीही करून कमी करायची आहे. ती करताना अमेरिकन सोयाबीन, मका,दुग्धजन्य पदार्थ यांची भारताने मोठ्याप्रमाणावर आयात करावी यासाठी अमेरिका दडपण आणत आहे. भारताच्या कोट्यवधी शेती/जमिनीशी निगडित उपजीविका करणाऱ्यांसाठी ही मृत्युघंटा सिद्ध होऊ शकते.

वाटाघाटीना तांत्रिकदृष्ट्या म्हणायचे 'द्विपक्षीय' एवढेच. एकूणच अमेरिका,विशेषतः ट्रम्प राजवट, दादागिरी करून आपल्याला हवे ते पदरात पाडून घेण्यावर अधिक विश्वास ठेवते. त्यासाठी निरनिराळी जुनी अस्त्रे भात्यातून काढली जातात किंवा नवीन पाजळली जातात. पण समोरच्याने 'अरे'ला कारे म्हटले की ट्रम्प महाशय कन्फ्युज होतात. त्यांना नक्की काय करायचे ते कळत नाही. हे चीन आणि इराणने दाखवून दिले आहे.

अजूनही वेळ गेलेली नाही. भारताने ट्रम्प प्रशासनाला एकदा तरी 'का रे' म्हणण्याची हिम्मत दाखवावीच!

**-संजीव चांदोरकर**

## आयुष्य जगायचे, तर पर्यावरणाला जपा

आपल्या अवतीभोवतीची सजीव-सृष्टी, हवा, पाणी, जमीन, झाडे, प्राणी, डोंगर, नद्या या सर्वांचे मिळून पर्यावरण बनते. हे एकमेकांवर अवलंबून असलेले जाळे आहे. झाड नसेल तर ऑक्सिजन नाही. पाणी नसेल तर शेती नाही. माती खराब झाली तर अन्न नाही. म्हणजेच पर्यावरण वाचले तरच आपण वाचू. विज्ञानाच्या या आधुनिक जगात माणसाच्या प्रगतीचा आलेख पाहता एकीकडे विकास आणि दुसरीकडे विनाश अशी जीवनाची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळेच विविध प्रकारचे प्रदूषणरूपी राक्षस विविध आजार व मृत्यूच्या रूपाने उभे आहे. हवा प्रदूषणामुळे मानव जातीला भयंकर आजारांनी घेरले आहे. वाहनांचा धूर, कारखान्यातील वायू यामुळे शहरांमधील हवा श्वास घेण्यासही लायक राहिली नाही. फुफ्फुसाचे आजार वाढले आहेत. ज्यामुळे माणसाचे आयुष्य कमी झाले. पाणी हे जीवन आहे परंतु जल प्रदूषणाचा विचार केला तर नद्यांमध्ये सांडपाणी, प्लास्टिक, रसायने मिसळली जात आहेत. त्यामुळे चांगले पाणी सुद्धा दूषित होऊन मृत्यूचे कारण ठरत आहे. सध्याच्या काळात पिण्यायोग्य पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. तर दुसरीकडे शुद्ध पाणी प्रदूषित केले जात आहे. भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन पाण्याची बचत व संवर्धन करणे महत्त्वाचे आहे. संत गाडगे महाराज म्हणत, 'गाव स्वच्छ तर मन स्वच्छ'. तसेच पर्यावरण शुद्ध तर जीवन शुद्ध.म्हणूनच वेळीच लक्षात घेणे आवश्यक आहे की, आयुष्य जगायचे तर पर्यावरणाला जपा. एक लावलेले झाड, एक वाचलेला पाण्याचा थेंब, हा आपला छोटासा प्रयत्न वाचवू शकतो उद्याचे जग. या पर्यावरण दिनी आपण सर्वजण संकल्प करूया की, निसर्ग वाचवू, जीवन वाचवू.

**डॉ. निलेशकुमार इंगोले**
शिरजगाव कसबा, जि. अमरावती
मो.९३७११४५१९५

## निसर्गाशी नाते घट्ट करण्याची संधी

पर्यावरण म्हणजे केवळ झाडे किंवा प्राणी नव्हे, तर आपल्या सभोवतालची हवा, पाणी, जमीन, सूर्यप्रकाश आणि सर्व सजीव सृष्टी यांचा एकत्रित समूह आहे. मानवाच्या अस्तित्वासाठी पर्यावरण अत्यंत आवश्यक आहे. श्वास घेण्यासाठी लागणारा ऑक्सिजन, पिण्यासाठी पाणी आणि अन्नासाठी आपण पूर्णपणे निसर्गावर अवलंबून आहोत. मात्र, विकासाच्या हव्यासामुळे आपण निसर्गाचा समतोल बिघडवला आहे. जागतिक पर्यावरण दिन केवळ एक औपचारिक दिवस न राहता, तो आपल्या जीवनशैलीत बदल करण्याची एक संधी ठरायला हवा.केवळ झाडे लावणे नव्हे, तर ती जगवणे हे आपले कर्तव्य आहे. पातळ पॉलिथीन च्या पिशव्यांचा वापर कमी करून कापडी पिशव्यांचा वापर सुरू करूया.पाण्याची नासाडी न करता,पावसाच्या पाण्याचे नियोजन करू या.विनाकारण दिवे आणि पंखे चालू ठेवू नये. शक्य असेल तिथे सौर ऊर्जेचा वापर वाढवूया.ओला आणि सुका कचरा वेगवेगळा करून त्याचे योग्य विघटन करूया.पृथ्वी हे आपल्या सर्वांचे घर आहे. जर आपण आज निसर्गाचे रक्षण केले, तरच निसर्ग उद्या आपले रक्षण करेल. येणाऱ्या पिढ्यांना एक स्वच्छ, सुंदर आणि प्रदूषणमुक्त पृथ्वी देणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.

**वर्षा आवदे**
नागपूर

## 'या' गाड्यांचा वेग मेमू गाड्यांसारखा का आहे?

२२१३८-अहमदाबाद नागपूर प्रेरणा एक्सप्रेस ही गाडी अकोला येथून सकाळी ६ वाजता सुटते आणि बड़नेरा येथे सकाळी ७:३७ वाजता पोहोचते. ही गाडी अकोला ते बड़नेरा हा प्रवास १ तास ३७ मिनिटांत पूर्ण करते.१२८०९ मुंबई-हावडा मेल अकोला येथून सकाळी ६:२५ वाजता सुटते आणि बड़नेरा येथे सकाळी ८:१० वाजता पोहोचते. ही गाडी अकोला ते बड़नेरा हा प्रवास १ तास ४५ मिनिटांत पूर्ण करते. त्याचप्रमाणे ११२१ भुसावळ बड़नेरा मेमू ट्रेन अकोला येथून सायंकाळी ५:३५ वाजता सुटते आणि बड़नेरा येथे सायंकाळी ७:१० वाजता पोहोचते. ही गाडी अकोला ते बड़नेरा हा प्रवास १ तास ३५ मिनिटांत पूर्ण करते. आता विचार करण्यासारखी गोष्ट ही आहे की सुपरफास्ट ट्रेन ही मेमू ट्रेन आहे की मेमू ट्रेन सुपरफास्ट आहे. आम्ही रेल्वे विभागाला विनंती करतो की त्यांनी सुपरफास्ट गाड्यांचा वेग थोडा वाढवावा. आम्हाला आशा आहे की रेल्वे विभाग याकडे लक्ष देईल.

**राजेश पी. कारिया**
राधे नगर,अकोला (महा)

शुक्रवार, दि. ५ जून २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# जुन्या वैमनस्याची रक्तरंजित परिणीती..!! युवकावर कोयत्याने जीवघेणा हल्ला

## दिग्रसमध्ये खळबळ, आरोपी पोलिसांच्या ताब्यात, दोघांवरही उपचार सुरू

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**दिग्रस, दि. ४ :** दिग्रस शहरातील मोतीनगर बायपास रोडवरील स्मशानभूमीजवळ बुधवारी (दि. ३ जून) सायंकाळी झालेल्या कोयता हल्ल्याच्या घटनेने शहरात एकच खळबळ उडाली. जुन्या वैमनस्यातून झालेल्या या हल्ल्यात एक युवक गंभीर जखमी झाला असून पोलिसांनी तत्परता दाखवत आरोपीला ताब्यात घेतले आहे.

माहिती नुसार, कळसा येथील सुनिल सुभाष यवले (३०) याच्यावर वाल्मिकनगर, दिग्रस येथील विक्की प्रवीण इंगोले (२८) याने धारदार कोयत्याने हल्ला केल्याची घटना सायंकाळी सुमारे ७ वाजताच्या सुमारास घडली. या हल्ल्यात सुनिल यवले याच्या पोटावर गंभीर वार



झाल्याने तो गंभीर जखमी झाला. घटनेची माहिती मिळताच दिग्रस पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत जखमीला उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक वैजनाथ मुंडे यांनी स्वतः घटनास्थळी भेट देत कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी

> क्षणात रक्तरंजित संघर्ष मोतीनगर बायपास रोडवरील स्मशानभूमीजवळ झालेल्या या घटनेत जुन्या वादाचे रूपांतर थेट जीवघेण्या हल्ल्यात झाले. पोलिसांच्या तातडीच्या हस्तक्षेपामुळे परिस्थिती नियंत्रणात आली असली तरी या घटनेने शहरातील कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नावर पुन्हा चर्चा सुरू झाली आहे.

आवश्यक उपाययोजना केल्या. पोलिसांनी जलद हालचाली करत आरोपी विक्की इंगोले याला ताब्यात घेतले असून त्याची चौकशी सुरू आहे. दरम्यान, या घटनेत आरोपीलाही छाती, कंबर व शरीराच्या इतर भागांवर दुखापती झाल्याची माहिती असून त्याच्यावरही दिग्रस ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. प्राथमिक तपासात हल्ल्यामागे जुने वाद आणि वैमनस्य कारणीभूत असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यापूर्वी सुनिल यवले याच्याविरोधात एका अल्पवयीन मुलीला धमकावणे, लग्नासाठी दबाव आणणे व बदनामी केल्याप्रकरणी अदखलपात्र तक्रार नोंद झाल्याची माहिती समोर आली आहे. त्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेला तणाव या हल्ल्याचे कारण असू शकतो, असा प्राथमिक अंदाज पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत आहे. गंभीर जखमी झालेल्या सुनिल यवले याच्या पोटावर खोल घाव लागल्याने त्याला प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी यवतमाळ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात हलविण्यात आले आहे. त्याच्यावर तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू असून प्रकृतीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे. या प्रकरणात हल्ल्याचा नेमका घटनाक्रम, वापरण्यात आलेले शस्त्र आणि वादाचे मूळ कारण शोधण्यासाठी दिग्रस पोलीस सखोल तपास करत आहेत. दरम्यान, या घटनेमुळे दिग्रस शहरासह कळसा परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवता शांतता राखण्याचे आवाहन केले आहे.

# विधान परिषदेत 'संजय राठोड पॅटर्न'ची चर्चा..!

## राजकीय समन्वयातून दुष्यंत चतुर्वेदींचा बिनविरोध विजय निश्चित

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ४ :** यवतमाळ स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीत अखेर महायुतीचे उमेदवार दुष्यंत चतुर्वेदी यांचा बिनविरोध विजय निश्चित झाला असून या संपूर्ण प्रक्रियेमागे पालकमंत्री संजय राठोड यांची राजकीय रणनीती आणि समन्वय कौशल्य निर्णायक ठरल्याची चर्चा जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात रंगली आहे.

४४६ मतदार असलेल्या या मतदारसंघात सुरुवातीला चुरशीच्या लढतीची शक्यता वर्तविली जात होती. महाविकास आघाडीने उमेदवार मैदानात उतरविला होता, तर महायुतीतूनही काही प्रमाणात अंतर्गत हालचाली सुरू होत्या. मात्र निवडणूक संघर्षाऐवजी संवादातून सोडविण्याची भूमिका मंत्री संजय राठोड यांनी सुरुवातीपासून घेतल्याचे दिसून आले. राज्यातील वरिष्ठ नेतृत्वाशी सातत्याने



संपर्क ठेवत त्यांनी मित्रपक्ष, विरोधक आणि अपक्ष उमेदवारांशी संवादाची सूत्रे हलविली. त्यातून महाविकास आघाडीचे उमेदवार साहेबराव कांबळे यांनी माघार घेतली. त्यानंतर भाजपचे जिल्हा समन्वयक नितीन भुतडा, अपक्ष सय्यद फारुख आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे साजिद बेग यांनीही अर्ज मागे घेतल्याने बिनविरोध निवडीचा मार्ग पूर्णपणे मोकळा झाला. राजकीय मतभेद कायम ठेवत जिल्ह्याच्या हितासाठी एकत्र येण्याची यवतमाळची परंपरा या निमित्ताने पुन्हा अधोरेखित झाली. निवडणूक झाली असती तरी महायुतीचा विजय निश्चित असल्याचा दावा राजकीय निरीक्षक करीत असले तरी संघर्ष टाळून सर्वसंमतीचा मार्ग स्वीकारण्यात संजय राठोड यांना यश आल्याचे मानले जात आहे.दुष्यंत चतुर्वेदी यांच्या बिनविरोध निवडीमुळे केवळ एक जागा जिंकली गेली नाही, तर संवाद, समन्वय आणि राजकीय मुत्सद्दीपणाचा नवा आदर्श निर्माण झाला आहे. त्यामुळे यवतमाळच्या राजकारणात आता 'संजय राठोड पॅटर्न' ही नवी राजकीय संज्ञा चर्चेचा विषय ठरत आहे.

# मुकुटबनचा आठवडी बाजार की अपघाताचा सापळा?

## रस्त्यावरच बाजार, प्रशासन मात्र बघ्याच्या भूमिकेत

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**झरी, दि. ४ :** झरी तालुक्यातील सर्वात मोठी बाजारपेठ म्हणून ओळख असलेल्या मुकुटबन येथील आठवडी बाजाराची व्यवस्था सध्या गंभीर प्रश्न निर्माण करीत आहे. दर सोमवारी भरणारा हा बाजार थेट मुकुटबन–पाटण राज्य मार्गावरच भरत असल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. वणी–मुकुटबनमार्गे आदिलाबादकडे जाणाऱ्या या महत्त्वाच्या मार्गावर दिवस-रात्र जड वाहतूक सुरू असते. अशा परिस्थितीत बाजाराच्या गर्दीतूनच ट्रक, डंपर व इतर मोठी वाहने मार्गक्रमण करीत असल्याने मोठ्या अपघाताची भीती व्यक्त केली जात आहे. या बाजारात परिसरातील ३० ते ४० गावांतील नागरिक मोठ्या संख्येने खरेदीसाठी येतात. मात्र दुकानदारांसाठी



स्वतंत्र व सुरक्षित जागेची व्यवस्था नसल्याने अनेकांना मुख्य रस्त्यावरच दुकाने थाटावी लागत आहेत. बाजारातून महसूल वसूल करणारा कंत्राटदार वसुलीपुरतीच जबाबदारी पार पाडत असल्याचा आरोप होत असून सुरक्षित नियोजनाकडे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा आहे.ग्रामपंचायत कडूनही बाजार व्यवस्थापनासाठी ठोस उपाययोजना करण्यात आलेल्या नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. बाजार सुरू असताना जड वाहतुकीला पर्यायी मार्ग देणे किंवा वाहतूक नियंत्रणासाठी पोलिसांचा बंदोबस्त ठेवणे अपेक्षित असताना त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. दरम्यान, मोबाइल चोरी, पाकीटमारीसारख्या घटनांचाही धोका वाढत असताना पोलिसांची प्रभावी उपस्थिती नसल्याची तक्रार व्यापारी व नागरिक करीत आहेत. एखादी मोठी दुर्घटना घडल्यावरच प्रशासन जागे होणार का, असा संतप्त सवाल ग्रामस्थ उपस्थित करीत असून बाजारासाठी कायमस्वरूपी सुरक्षित जागा व प्रभावी वाहतूक व्यवस्थापनाची मागणी जोर धरत आहे.

# भरधाव ट्रकने सायकलस्वाराला चिरडले..!

## वकिलाच्या भावाचा जागीच मृत्यू

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ४ :** शहरातील महानायक चौक परिसरात भरधाव ट्रकच्या निष्काळजीपणामुळे एका सायकल स्वाराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या भीषण अपघातात अतुलकुमार विजयसिंह खतवार (५७), रा. सिद्धेश्वर नगर, चौसाळा रोड, यवतमाळ यांचा जागीच मृत्यू झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३ जून रोजी रात्री सुमारे १०.१५ वाजता अतुलकुमार खतवार हे एलआयसी चौक ते शासकीय रुग्णालय मार्गावर सायकलने जात होते. त्यावेळी ट्रक क्रमांक एमएच-२९-८५६१ च्या चालकाने वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवून त्यांना जोरदार धडक दिली. धडकेनंतर ट्रकची मागील दोन्ही डावी चाके त्यांच्या अंगावरून गेल्याने पोट, छाती, डोके तसेच हात-पायांचा अक्षरशः चुराडा झाला आणि त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. मृतकाचे भाऊ तथा वकील अप्रेश विजयसिंह खतवार यांनी दिलेल्या तक्रारीवरून ट्रक चालक शेरखान समशेरखान पठाण (४३), रा. सुंदर नगर, भोसा रोड, यवतमाळ याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.यवतमाळ शहर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (BNS) कलम २८१ व १०६(१) अंतर्गत गुन्हा नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे. या अपघातामुळे शहरात हळहळ व्यक्त होत असून भरधाव वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# देवसरी येथे लोखंडी रॉडने प्राणघातक हल्ला

**उमरखेड, दि. ४ :** देवसरी गावातील समाज मंदिरासमोर विनाकारण एका इसमावर लोखंडी रॉडने हल्ला करून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी दोन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी साहेबराव गोविंद सावते (वय ३५, रा. देवसरी) हे २ जून २०२६ रोजी सकाळी १०:४० वाजता समाज मंदिरासमोरून जात असताना, आरोपी समाधान भावराव सावते (वय २५) आणि सविधान भावराव सावते (वय २३) यांनी संगनमताने पाठीमागून येऊन लोखंडी रॉडने त्यांच्या डाव्या डोळ्यावर मारून जखमी केले व शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. उमरखेड पोलिसांनी बी.एन.एस. कलम ११८(१), ११५(२), ३५१(२)(३), ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

## थोडक्यात

### युवकावर जीवघेणा चाकू हल्ला..! दोघे भाऊ गजाआड

**यवतमाळ :** एका विवाहित महिलेच्या मोबाईलवर फोन केल्याच्या संशयातून



युवकाचे अपहरण करून निर्जनस्थळी नेण्यात आले आणि त्याच्यावर जीवघेणा चाकू हल्ला करण्यात आल्याची धक्कादायक घटना गुरुवारी सकाळी आर्णी रोड परिसरात उघडकीस आली. या प्रकरणात अवधूतवाडी पोलिसांनी तातडीने कारवाई करत दोन्ही आरोपी भावांना अटक केली असून पुढील तपास सुरू आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कार्तीक भैय्याजी जिवणे (वय २६, रा. मोठे वडगाव रोड, यवतमाळ) हा गुरुवारी सकाळी बजरंग चौक परिसरात मित्रासोबत उभा असताना आरोपी विकी उर्फ रत्नदीप लक्ष्मणराव गजघाटे (रा. जनकनगरी, फुकटनगर) व त्याचा भाऊ छोटू उर्फ सुमेद लक्ष्मणराव गजघाटे (रा. प्रेरणा नगर, उमरसरा) हे मोटारसायकलवर तेथे आले. "बोलायचे आहे" असे सांगून त्यांनी कार्तीकला सोबत घेत सहकार सांस्कृतिक भवनाजवळील परिसरात नेले. तेथे दिव्या गजघाटे हिला फोन का केला, यावरून आरोपींनी कार्तीकशी वाद घालत त्याला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. याचदरम्यान छोटू उर्फ सुमेद याने चाकू काढून कार्तीकवर सपासप वार करण्यास सुरुवात केली. जीव वाचविण्यासाठी झुंज देताना कार्तीकच्या डाव्या हातावर व कमरेजवळ गंभीर दुखापत झाली. प्रसंगावधान राखत त्याने आरोपींच्या तावडीतून सुटका करून घेत घटनास्थळावरून पळ काढला. जखमी अवस्थेत घरी पोहोचल्यानंतर त्याला तातडीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान दिलेल्या जबाबावरून अवधूतवाडी पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (BNS) कलम १०९(१), ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी वेगाने तपासाची सूत्रे हलवत दोन्ही आरोपी भावांना गजाआड करण्यात यश मिळविले. संशयातून झालेल्या या हल्ल्यामुळे शहरात खळबळ उडाली असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

### आदिवासी योजनांतील कथित अनियमिततेची चौकशी करा..!

**पुसद :** आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता राखावी, लाभार्थ्यांना योजनांची संपूर्ण माहिती उपलब्ध करून द्यावी तसेच कथित गैरव्यवहारांची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, या मागण्यांसाठी अखिल भारतीय आदिवासी विकास विद्यार्थी परिषदेच्या वतीने बुधवारी (दि. ४) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, पुसद येथे निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात विभागाच्या विविध योजनांबाबत लाभार्थ्यांकडून प्राप्त होत असलेल्या तक्रारींची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली. लाभार्थ्यांची फसवणूक व आर्थिक अनियमिततेच्या कथित प्रकरणांबाबत स्वतंत्र तपास करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी भूमिका परिषदेकडून मांडण्यात आली. तसेच आदिवासी विकास विभागाच्या सर्व योजना, अनुदाने व प्रकल्पांची माहिती प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत पोहोचावी यासाठी ग्रामसभा, सूचना फलक, सामाजिक माध्यमे आणि प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती मोहीम राबविण्याची मागणी करण्यात आली.

मागील चार वर्षांतील योजना-निहाय लाभार्थी याद्या, मंजूर अनुदान, निधी वितरणाचा तपशील तसेच प्राप्त तक्रारी व त्यावरील कार्यवाहीची माहिती सार्वजनिक करण्याची प्रमुख मागणी निवेदनात करण्यात आली. यावेळी अविनाश पंधरे, राजूभाऊ तरटे, ओमप्रकाश किरोळे, संदीप आढाव, प्रकाश मोरे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी आणि शासकीय योजनांतील पारदर्शकतेसाठी लढा अधिक तीव्र करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# पालकमंत्री यांच्या निधीतून साईनाथ नगरातील नाली बांधकामाला प्रारंभ..!

## पावसाळ्यापूर्वी नागरिकांना दिलासा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी





**दिग्रस, दि. ४ :** प्रभाग क्रमांक ८ मधील साईनाथ नगर परिसरात पालकमंत्री संजय राठोड यांच्या निधीतून मंजूर झालेल्या नाली बांधकामाच्या कामाला अखेर सुरुवात झाली आहे. पावसाळ्यापूर्वी परिसरातील पाणी साचण्याची समस्या दूर व्हावी आणि नागरिकांना दिलासा मिळावा, अशी येथील रहिवाशांची अनेक दिवसांपासून मागणी होती.

स्थानिक नागरिकांच्या या मागणीची दखल घेत नगरसेवक किशोर कोहचडे, शिवसेना उपशहर प्रमुख संदीप रत्नपारखी, बंडू चव्हाण व यश खामकर यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे नाली बांधकामाच्या कामाला गती मिळाली असून परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. सदर काम ठेकेदार अरविंद मिश्रा यांच्या माध्यमातून करण्यात येत असून, नालीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर पावसाळ्यात रस्ते व घरांसमोर साचणाऱ्या पाण्याच्या समस्येवर मोठ्या प्रमाणात उपाय होणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. साईनाथ नगरातील नागरिकांनी आपल्या दीर्घकालीन मागणीची पूर्तता झाल्याबद्दल पालकमंत्री संजय राठोड यांचे आभार मानले आहेत. तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचेही कौतुक केले आहे. परिसरातील मूलभूत सुविधांच्या विकासासाठी भविष्यातही अशाच प्रकारे विकासकामांना प्राधान्य देण्यात यावे, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली.

# 'पळपुटे' साहेबराव कांबळे विरोधात महाविकास कडून निदर्शने

## लोकशाहीची हत्या केल्याचा महाविकास आघाडीचा आरोप

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ , दि. ४ :** यवतमाळ स्थानिक प्राधिकरण निवडणुकीत महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार साहेबराव कांबळे यांनी अचानक उमेदवारी मागे घेतल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. कोणत्याही घटक पक्षाला विश्वासात न घेता तसेच विरोधी पक्षातील काही नेत्यांच्या उपस्थितीत त्यांनी माघार घेतल्यामुळे या निर्णयामागे नेमके काय कारण आहे, याबाबत संशय निर्माण झाला आहे. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी या घडामोडीवर तीव्र नाराजी व्यक्त करत, हा निर्णय स्वेच्छेने नसून आर्थिक प्रलोभन आणि सत्तेच्या दबावातून घेतला गेल्याचा गंभीर आरोप केला आहे. महायुती सरकारने लोकशाही प्रक्रियेला बाधा पोहोचवत





निवडणूक बिनविरोध करण्यासाठी दबावतंत्राचा वापर केल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. या निषेधार्थ गुरुवारी यवतमाळ शहरातील दत्त चौकात महाविकास आघाडीच्या वतीने जोरदार निदर्शने करण्यात आली. यावेळी उपस्थित पदाधिकारी, नगरसेवक, गटनेते आणि कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत लोकशाहीच्या कथित हत्येविरोधात संताप व्यक्त केला. निदर्शनात काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड. सचिन नाईक, शिवसेना जिल्हाप्रमुख राजेंद्र गायकवाड, संपर्कप्रमुख किशोर इंगळे, संजय ठाकरे, जितेंद्र मोघे, राहुल ठाकरे, आरिज बेग, संजय वानखेडे, बबलू देशमुख, वैशाली सवई, कुणाल जानकर, शशांक केंढे, सय्यद रियाझ, कुशाल ठाकरे, रहमान शाह, शिवरामवर,जयराम मुनेश्वर,संजय महल्ले यांच्यासह महाविकास आघाडीचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी वक्त्यांनी साहेबराव कांबळे यांनी मतदार आणि महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांचा विश्वासघात केल्याचा आरोप करत त्यांच्या भूमिकेवर कठोर शब्दांत टीका केली. तसेच या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून सत्य जनतेसमोर आणण्याची मागणी करण्यात आली.

# पुसद दुय्यम निबंधक कार्यालयात मारामारी..!

## महिलांसमोर अश्लील शिवीगाळ, कार्यालय प्रशासनाच्या निष्क्रियतेवर संतप्त नागरिकांचा सवाल

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. ४ :** पुसद येथील सह दुय्यम निबंधक कार्यालयात दस्तलेखकांच्या हस्तकांमध्ये झालेल्या मारामारी आणि महिलांसमोर झालेल्या अश्लील शिवीगाळीच्या प्रकारामुळे कार्यालयातील शिस्त व प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दि. २ जून रोजी खरेदी-विक्री व्यवहारासाठी आलेल्या नागरिकांसमोर घडलेल्या या प्रकारामुळे मोठी खळबळ उडाली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, व्यवहारांच्या क्रमांकावरून दोन दस्तलेखकांच्या हस्तकांमध्ये सुरुवातीला शाब्दिक वाद झाला.





काही वेळातच या वादाचे रूपांतर मारामारीत झाले. यावेळी महिलांसमोर अश्लील भाषेचा वापर करण्यात आल्याने उपस्थितांमध्ये संतापाची लाट उसळली. एका व्यक्तीने व्यवहाराशी संबंधित कागदपत्रांची फेकाफेक करून कार्यालयीन कामकाजात अडथळा निर्माण केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या संपूर्ण घटनेचे चित्रीकरण माहिती अधिकार कार्यकर्ते तथा सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता सुधाकर चापके यांनी मोबाईलमध्ये केल्याचे सांगितले जाते. घटनेनंतर उपस्थित महिलांनी सह दुय्यम निबंधक विद्या तळेगावकर यांच्याकडे नाराजी व्यक्त केली. मात्र प्रशासनाकडून तत्काळ कारवाई न झाल्याने नागरिकांमध्ये असंतोष वाढला आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, कार्यालयात काही मोजक्या दस्तलेखक व हस्तकांची अरेरावी वाढली असून क्रमांक लावणे, कागदपत्रे स्वीकारणे यावरून वाद होणे नित्याचे झाले आहे. त्यामुळे कार्यालयातील शिस्तीचा पूर्णपणे बोजवारा उडाल्याची भावना व्यक्त होत आहे. नागरिकांनी सीसीटीव्ही फुटेजची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची तसेच शासकीय कामात अडथळा आणणाऱ्यांविरुद्ध गुन्हे दाखल करण्याची मागणी जिल्हा प्रशासनाकडे केली आहे.

### पूर्वीपासून गैरकारभाराच्या तक्रारी

**सह दुय्यम निबंधक कार्यालयातील कथित दलालशाही, मालमत्ता व्यवहारांतील अनियमितता आणि भूखंड विभाजन नियमांचे उल्लंघन याबाबत यापूर्वीही अनेक तक्रारी झाल्या आहेत. या प्रकरणांच्या निषेधार्थ १२ मे २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणदेखील करण्यात आले होते. त्या तक्रारींची चौकशी सुरू असतानाच कार्यालयात घडलेल्या मारामारीच्या घटनेमुळे प्रशासनाच्या कारभारावर पुन्हा प्रश्न उपस्थित होत असून संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी जोर धरत आहे.**

# बेलोरा वन वर्तुळात रेती तस्करीचा सुळसुळाट..!

## सागवान कूप कटाईतील गैरप्रकारांवरही संशय

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ४ :** सावळी सदोबा,आर्णी दक्षिण वनपरिक्षेत्रांतर्गत येणारे बेलोरा वन वर्तुळ सध्या कथित गैरप्रकारांमुळे चर्चेचा विषय ठरत आहे. या परिसरात वन विभागामार्फत सागवान कूप कटाईची कामे सुरू असून, या कामांच्या अंमलबजावणीत अनियमितता होत असल्याची चर्चा स्थानिक स्तरावर रंगू लागली आहे.

कूप कटाईदरम्यान नियमांचे पालन होत आहे का, तसेच लाकूड मोजणी व वाहतुकीच्या प्रक्रियेत पारदर्शकता आहे का, याबाबत नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.दरम्यान, बेलोरा वन वर्तुळातील दुर्गम भागातून रेतीची अवैध वाहतूक होत असल्याचे आरोपही समोर येत आहेत. रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत छुप्या मार्गाने रेतीची वाहने बाहेर काढली जात असल्याची माहिती स्थानिकांकडून दिली जात आहे. या कथित प्रकाराकडे संबंधित यंत्रणेचे दुर्लक्ष होत असल्याने रेती माफियांचे मनोबल वाढल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. स्थानिकांच्या मते, वनक्षेत्रातील काही भागांमधून नियमितपणे



रेतीची अवैध वाहतूक होत असून, त्यामुळे शासनाच्या महसुलाचे नुकसान तर होतच आहे, शिवाय पर्यावरणालाही धोका निर्माण होत आहे. सागवान कूप कटाई आणि रेती तस्करी या दोन्ही प्रकरणांमुळे वन विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या सर्व आरोपांची सखोल चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी तसेच दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी परिसरातील नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांकडून होत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# संक्षिप्त

## 'सोलीना' पुस्तकाचे प्रकाशन



**अमरावती-** शिक्षणतज्ज्ञ, लेखिका तथा पत्रकार डॉ. शुभांगी अरुण जोशी लिखित 'सोलीना' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा रंगोली लॉन येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. रंगोली समूहाचे संस्थापक नितीन देशमुख आणि सौ. कल्पना नितीन देशमुख यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी जोशी परिवारातील ज्येष्ठ सदस्या विमल जोशी यांच्या सहस्त्र चंद्रदर्शन सोहळ्याचे औचित्यही साधण्यात आले. 'सोलीना' हे पुस्तक डॉ. जोशी यांच्या स्वर्गीय मातोश्री विभावरी हिवरखेडकर यांच्या जीवनावर आधारित असून, एका सामान्य स्त्रीच्या असामान्य जीवनसंघर्षाची हृदयस्पर्शी कहाणी यातून उलगडली आहे. संघर्ष, त्याग, जिद्द, कुटुंबासाठीचे समर्पण आणि जीवनमूल्यांची जपणूक यांचा प्रभावी संगम या पुस्तकात अनुभवायला मिळतो. आपल्या आईच्या स्मृतींना शब्दबद्ध करताना लेखिकेने भावनिकता आणि वास्तव यांचा सुंदर समतोल साधल्याचे मत नितीन देशमुख यांनी यावेळी व्यक्त केले.डॉ. शुभांगी जोशी या गेल्या पंधरा वर्षांहून अधिक काळ त्या इंग्रजी विषयाच्या प्राध्यापिका म्हणून कार्यरत आहेत. स्त्रीजीवन, सामाजिक परिवर्तन आणि साहित्य अभ्यास या विषयांवरील त्यांचे संशोधन विशेष उल्लेखनीय मानले जाते. सुधा मूर्ती यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री पात्रांच्या परिवर्तनाचा अभ्यास या विषयावर त्यांनी पीएच.डी. प्राप्त केली आहे.प्रकाशन सोहळ्यात उपस्थित मान्यवरांनी 'सोलीना' या पुस्तकाचे कौतुक करत स्वर्गीय विभावरी हिवरखेडकर यांच्या प्रेरणादायी जीवनाला शब्दरूप देण्याच्या लेखिकेच्या प्रयत्नांचे अभिनंदन केले. यावेळी मंचावर अरुण जोशी, डॉ. शुभांगी जोशी, विमल जोशी तसेच संदीप हिवरखेडकर यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमास साहित्य, शिक्षण, पत्रकारिता, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर, वाचक, नातेवाईक व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## कराओके गीतांचा समाजसेवी कार्यक्रम रविवारी

**अमरावती-** कराओके गीतगायनाच्या कार्यक्रमांद्वारे अमरावती शहरात सांगीतिक वातावरण अधिक समृद्ध करण्याबरोबरच समाजात आनंद, सकारात्मकता आणि निरोगी मनोरंजनाची संस्कृती रुजविण्याचे कार्य अनिल सरदार सातत्याने करीत आहेत.यापूर्वी आयोजित करण्यात आलेल्या त्यांच्या एका समाजसेवी गायन कार्यक्रमातून प्राप्त झालेले मानधन त्यांनी बडनेरा येथील 'आधार निवारा केंद्र' या संस्थेला देऊन सामाजिक बांधिलकी जपली होती. त्याच परंपरेचा वारसा पुढे नेत अनिल सरदार यांचा 'पैसा वापस... टॅक्स फ्री... अबके सावन में...' हा विशेष समाजसेवी कराओके गीतांचा कार्यक्रम रविवार, दिनांक ७ जून २०२६ रोजी सायंकाळी ६.०० ते रात्री १०.३० वाजेदरम्यान शहरातील जोशी सभागृह श्याम चौक अमरावती येथे आयोजित करण्यात आला आहे.कार्यक्रमात शहरातील सुमारे ६० गायक-गायिका सहभागी होणार असून ३० युगल गीते सादर करण्यात येणार आहेत. कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी प्रत्येक गायकाकडून केवळ १०१ रुपये नाममात्र शुल्क आकारण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रसिद्ध निवेदिका सुचिता खुळे या करणार आहेत.

## आगारांमध्ये ७८ वा वर्धापन दिन साजरा

**चांदूर रेल्वे-** आगारांमध्ये महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचा ७८ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमानिमित्त सर्वप्रथम बसचे पूजन करून उपस्थित विना अपघात चालक यांना प्रोत्साहन पर बक्षीस देऊन सत्कार करण्यात. यावेळी बसस्थानकाला छान



रंगरंगोटी उत्तम सजावट करण्यात आली होती .सर्व प्रवाशांना पेढे वाटप करत स्वागत करण्यात आले.कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून सक्षम बहुउद्देशीय संस्थाचे ,अध्यक्ष राजीव शिवणकर (पत्रकार),आगार व्यवस्थापक जयंत झाडे, वैशाली डोळस,निलेश भगत,प्रविण घाटे,विजेद्र बनसोड,योगेश ठाकरे,प्रमोद खवड,पवण खेडकर,अरूण रामटेके,राजु बान्ते,सतिश काळे तसेच प्रशासकीय कर्मचारी तथा चालक वाहक व तेथील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कावली येथे सीड बॉल निर्मिती उपक्रम

**धामणगाव रेल्वे-** पर्यावरण संवर्धन आणि वृक्षलागवडीला चालना देण्यासाठी श्रीसंत शंकर महाराज कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सीड बॉल निर्मिती हा उपक्रम कावली येथे राबविला. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी ३० सीड बॉल तयार केले. सीड बॉलमध्ये स्थानिक वृक्षांच्या बियाण्यांचा वापर करण्यात आला असून त्यासाठी चिकणमाती, शेणखत आणि बियाणे यांचे मिश्रण करण्यात आले. पावसाळ्याच्या सुरुवातीला हे सीड बॉल डोंगराळ, पडीत व वनक्षेत्रात टाकण्यात येणार आहेत. यामध्ये अनिकेत बाभूळकर, अमित लांजे, कार्तिक तोटावर, प्रज्वल भुजाडे, हरीओम लांभाडे, महेश राठोड यांनी सहभाग घेतला होता.

## नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये

**अंजनगाव बारी -** जिल्ह्यासह ग्रामीण भागात सुरू असलेल्या शेती कामांच्या पार्श्वभूमीवर पेट्रोल व डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असून नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हा प्रशासन व पेट्रोल पंप चालकांकडून करण्यात आले आहे. काही ठिकाणी अफवांमुळे नागरिकांनी अतिरिक्त इंधन खरेदीसाठी गर्दी केल्याचे दिसून आले. मात्र जिल्ह्यात इंधन तुटवडा निर्माण होण्याची कोणतीही शक्यता नसल्याचे संबंधित यंत्रणांनी स्पष्ट केले आहे.नागरिकांनी अनावश्यक साठेबाजी टाळून गरजेनुसारच इंधन खरेदी करावे. यामुळे पेट्रोल पंपांवरील गर्दी कमी होऊन सर्वांना सुरळीत सेवा मिळण्यास मदत होईल. प्रशासनाकडून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत असून इंधन पुरवठा नियमित सुरू असल्याने घाबरण्याचे कोणतेही कारण नसल्याचे सांगण्यात आले आहे.

# शाळा वाचवण्यासाठी ग्रामस्थांची धडपड

**अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर**

ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळा पटसंख्येअभावी बंद पडण्याच्या मार्गावर असताना तालुक्यातील कसबेगव्हाण येथील सामाजिक कार्यकर्ते आणि शिक्षकांनी केलेल्या प्रयत्नांमुळे शाळेचे रूप पालटले आहे.मात्र, ज्या शिक्षकांच्या मेहनतीमुळे शाळेची पटसंख्या १० पटीने वाढला. त्यांच्याच बदलीचे आदेश आल्याने आता पालकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या शिक्षकांची बदली त्वरित रद्द करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी शिक्षण विभागाकडे केली आहे.

आजकाल पालकांचा कल खाजगी इंग्रजी शाळांकडे वाढत आहे. खाजगी शाळांची भरमसाठ फी आणि अवाढव्य खर्च परवडत नसतानाही, मुलांच्या भविष्यासाठी सामान्य नागरिक कर्ज काढून पाल्यांना शहरांतील शाळांमध्ये पाठवतात. याचा

### रंगरंगोटी अन् दुरुस्तीनंतर शिक्षकांच्या बदल्यांमुळे नियोजनावर 'पाणी'

परिणाम ग्रामीण भागातील सरकारी शाळांच्या पटसंख्येवर होत आहे. हीच परिस्थिती ओळखून कजबेगव्हाण येथील काही तरुण सामाजिक कार्यकर्ते आणि शाळेतील शिक्षकांनी कंबर कसली. शाळेतील शिक्षकांनी आणि कार्यकर्त्यांनी घरोघरी जाऊन पालकांचे समुपदेशन केले.

'आमच्या शाळेतही खाजगी शाळांसारखेच उत्तम शिक्षण दिले जाते. आजवर अनेक मोठे अधिकारी जिल्हा परिषद शाळेतूनच शिकून पुढे गेले आहेत,' असा विश्वास त्यांनी पालकांना दिला. शिक्षकांच्या या तळमळीमुळे पालकांनी खाजगी शाळांचा मोह सोडला आणि आपल्या पाल्यांचे प्रवेश

### लोकवर्गणीतून शाळा चकाकली पण शिकवायला गुरुजीच नाहीत



कसबेगव्हाणच्या जिल्हा परिषद शाळेत निश्चित केले.

परिणामी, गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा पटसंख्या तब्बल दहा पटीने वाढली आहे. एकिकडे शाळा कात टाकत असतानाच, ज्या शिक्षकांच्या विश्वासावर पालकांनी आपली मुले शाळेत घातली, त्याच क्रियाशील शिक्षकांची अचानक बदली झाली आहे. शाळा सुरू होण्याच्या काही

### बदली रद्द करण्याची गावकऱ्यांची मागणी

दिवस आधीच हे आदेश आल्याने पालकांमध्ये नाराजी पसरली आहे. 'जर चांगले शिकवणारे शिक्षकच राहणार नसतील, तर आम्ही आमच्या मुलांचे भविष्य कोणाच्या हाती सोपवायचे?' असा सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

शाळेत शिक्षकांची संख्या अपुरी असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत होते. त्यावर उपाय म्हणून ग्रामस्थांनी केवळ शाळेची इमारतच सुधारली नाही, तर शिकवण्यासाठी शिक्षक कमी पडू नये म्हणून लोकवर्गणीतून रोजंदारीवर खासगी शिक्षक नियुक्त करण्याची तयारीही दर्शवली होती. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी ग्रामस्थ आर्थिक भार सोसण्यासही तयार झाले होते.

कसबेगव्हाण येथील सामाजिक कार्यकर्ते प्रविण टाले अमोल दामले,प्रा. संजय लव्हाळे, प्रशांत दामले, मंगेश बाभुळकर प्रभाकर मातकर, रुपराव दामले, विजय दामले,आणि पालकांनी एकत्रितपणे जिल्हा परिषद शिक्षण विभागाला निवेदन दिले आहे. बालपांडे, आणि हंबर्डे या दोन्ही शिक्षकांची बदली त्वरित रद्द करून त्यांना याच शाळेत कायम ठेवावे, अशी मागणी केली आहे. शिक्षण विभागाने लोकभावनेचा विचार केला नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.आता या प्रकरणावर जिल्हा परिषद प्रशासन काय निर्णय घेते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

**लोकसहभागातून शाळेचा कायापालट**

गावातील जिल्हा परिषद शाळेची इमारत जुनी झाली होती, काही ठिकाणचे पत्रे गळत होते तर भिंतींचे रंग उडाले होते. शासनाच्या निधीची वाट न पाहता गावातील सामाजिक कार्यकर्त्यांनी एकत्र येत 'लोकवर्गणी' गोळा केली. या जमा झालेल्या निधीतून शाळेची रंगरंगोटी करून तिला अतिशय बोलके आणि आकर्षक करण्यात आले.पावसाळ्यात मुलांचे हाल होऊ नये म्हणून जुने टिन पत्रे बदलून त्याठिकाणी नवीन पत्रे बसवण्यात आले. आज ही शाळा एखाद्या खासगी शाळेला टक्कर देईल इतकी सुंदर दिसत आहे.

# मनपा आयुक्तांनी केली आरोग्य केंद्र व शाळांची पडताळणी

### सुविधा सुधारण्यासाठी दिले निर्देश

**अमरावती/ का.प्र.**

मनपा आयुक्त वर्षा लड्डा यांनी शहरातील विविध आरोग्य केंद्रे आणि शाळांची प्रत्यक्ष पाहणी करून नागरिकांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या सेवा-सुविधांचा आढावा घेतला. शहरातील आरोग्य व शिक्षण व्यवस्थेची गुणवत्ता अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने करण्यात आलेल्या या पाहणी दौऱ्यात त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सुधारणा तातडीने करण्याचे निर्देश दिले.

आयुक्त वर्षा लड्डा यांनी भाजीबाजार दवाखाना, झोन क्र. ५ येथील मनपा शाळा, पठाण चौक येथील दवाखाना, हैदरपुरा येथील दवाखाना, भाजीबाजार येथील शाळा क्र. ६ तसेच तारखेडा येथील दवाखाना या ठिकाणी भेट देऊन तेथील कामकाजाची प्रत्यक्ष माहिती घेतली. प्रत्येक ठिकाणी त्यांनी सुविधा, स्वच्छता, कर्मचारी उपस्थिती, नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवा आणि उपलब्ध संसाधनांचा बारकाईने आढावा घेतला.

दवाखान्यांमधील स्वच्छता व्यवस्थेवर विशेष भर देत परिसर नियमित स्वच्छ ठेवण्याचे निर्देशही त्यांनी दिले. रुग्णांसाठी प्रतीक्षालय, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, शौचालयांची स्वच्छता तसेच आवश्यक वैद्यकीय साहित्य वेळेवर उपलब्ध राहील याची दक्षता घेण्यास सांगितले. नागरिकांना जलद आणि पारदर्शक सेवा मिळण्यासाठी मनपा प्रशासनाने अधिक संवेदनशीलतेने काम करण्याची गरज असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.



त्यानंतर आयुक्त वर्षा लड्डा यांनी झोन क्र. ५ येथील महानगरपालिका शाळा आणि भाजीबाजार येथील शाळा क्र. ६ ला भेट देऊन शैक्षणिक वातावरणाचा आढावा घेतला. शाळेतील वर्गखोल्या, स्वच्छता व्यवस्था, विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध मूलभूत सुविधा, पिण्याचे पाणी, शौचालये, खेळाचे साहित्य तसेच शालेय परिसराची पाहणी करण्यात आली. विद्यार्थ्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि सकारात्मक वातावरणात शिक्षण मिळणे आवश्यक असल्याचे सांगत त्यांनी शाळा महानगरपालिका प्रशासनाला आवश्यक त्या सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या.

आयुक्तांनी दिलेल्या सूचनांनुसार आवश्यक सुधारणा तातडीने करण्यात येणार असल्याचे संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितले. पाहणीमुळे शहरातील आरोग्य सेवा आणि शैक्षणिक सुविधांचा प्रत्यक्ष आढावा घेऊन महानगरपालिका प्रशासनाला सुधारणा करण्यासाठी दिशा मिळणार असून नागरिकांना अधिक दर्जेदार आणि परिणामकारक सेवा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. महानगरपालिका प्रशासनाकडून अशा प्रकारच्या नियमित पाहण्या सुरू राहणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

पाहणीदरम्यान अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.विशाल काळे, शिक्षणाधिकारी डॉ.प्रकाश मेश्राम, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, मालमत्ता अधिकारी सचिन मांडवे, उपअभियंता शरद तिनखेडे, लक्ष्मण पावडे, वैद्यकीय अधिकारी डॉ.सिमा नैताम, डॉ.स्वाती कोवे, डॉ.फिरोज खान, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक राजेश राठोड, वैद्यकीय अधिकारी, शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक वर्ग तसेच संबंधित कर्मचारी उपस्थित होते.

### मोसीकॉलची जागा खाजगी विक्रीस काढण्याऐवजी

# सार्वजनिक आरक्षणाच्या पर्यायांबाबत सविस्तर आढावा

**अमरावती/ का.प्र.**

अमरावती येथील 'मॉसिकॉल' कारखान्याची मौल्य वान २५ एकर जमीन खाजगी विक्रीस काढण्याऐवजी सार्वज निक आरक्षणासाठी राखून ठेवण्याबाबत आ. सुलभा खोडके यांनी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना पत्र दिले होते. त्या अनुषंगाने मुंबई येथे झालेल्या बैठकीमध्ये मॉसिकॉलची जमीन शासनाकडे हस्तांतरित करण्याबाबत बावनकुळे यांनी आदेश दिले. तसेच सदर जमीन खाजगी विक्रीस न काढता सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आरक्षित ठेवण्याबाबत विविध पर्यायांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

अमरावती विधानसभा मतदरसंघातील, अमरावती येथील कापूस पणन महासंघाच्या अखत्यारीत असलेल्या महाराष्ट्र राज्य तेलबियाणे वाणिज्य आणि औद्योगिक महामंडळ मर्यादित



### आ. सुलभा खोडके यांनी सुचविलेल्या पर्यायांवर महसूल मंत्रालयात खल

(मॉसिकॉल) या कारखान्याची सुमारे २५ एकर मोकळी जमीन ही शहराच्या मध्यवर्ती व मोक्याच्या ठिकाणी उपलब्ध आहे.शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता सार्वजनिक वापरासाठी अथवा शासकीय कारणास्तव उपयोगात आणण्यासाठी शहराच्या मध्यभागात कुठेही जागा उपलब्ध नाही. म्हणून मॉसिकॉलची जागा एक चांगला पर्याय असून शहराच्या दीर्घकालीन विकासाला चालना मिळेल आणि नागरिकांच्या हिताचे रक्षण होईल, या दृष्टीने अमरावतीच्या आ.सुलभा खोडके यांनी मॉसि कॉल च्या जागेवर सार्वजनिक आरक्षण वापरा संदर्भात अनेक पर्याय सुचविले आहेत.


जिल्हा स्तरावरील विविध शासकीय-प्रशासकीय इमारती, नवीन न्यायालयीन संकुल किंवा अन्य सार्वजनिक सुविधांसाठी अशा मोठ्या भूखंडाची अत्यंत आवश्यकता आहे. ही शासकीय मालकीची जागा खाजगी व्यक्तींना देण्यापेक्षा ती भविष्यातील गरजेसाठी आरक्षित ठेवावी, अशी आग्रही मागणी आ.खोडके यांनी लावून धरली आहे. बैठकीला विधान परिषद आमदार संजय खोडके तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## अमृता अमझरेला सुवर्ण तर कुणाल अठोरला रौप्यपदक

**अमरावती/ का.प्र.**

ओडिशा राज्यातील भुवनेश्वर येथे आयोजित ३१ व्या सब-ज्युनियर राष्ट्रीय बेसबॉल स्पर्धेत अमरावती जिल्ह्यातील खेळाडूंनी उल्लेखनीय यश संपादन केले. महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, भातकुलीची विद्यार्थिनी अमृता अमझरे हिने महाराष्ट्र मुलींच्या संघाकडून खेळताना सुवर्णपदक पटकावले, तर चंद्रभानजी विद्यालय, कुंड सर्जापूरचा विद्यार्थी कुणाल अठोर याने महाराष्ट्र मुलांच्या संघाचे प्रतिनिधित्व करत रौप्यपदक मिळविले आहे.

मुलींच्या गटातील अंतिम सामन्यात महाराष्ट्र संघाने छत्तीसगड संघावर शानदार विजय मिळवत सुवर्णपदक पटकावीले. तर मुलांच्या गटातील अंतिम सामन्यात



महाराष्ट्राचा सामना छत्तीसगड संघाशी झाला. अतिशय चुरशीच्या झालेल्या या सामन्यात महाराष्ट्र संघाला पराभव स्विकारावा लागला आणि रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.स्पर्धेत दोन्ही खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून अमरावती जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल केले. विशेष म्हणजे हे दोन्ही विद्यार्थी ग्रामीण भागातील आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.या यशाबद्दल महाराष्ट्र बेसबॉल असोसिएशनचे सचिव राजेंद्र इखनकर, महाराष्ट्र बेसबॉल असोसिएशनचे उपाध्यक्ष इंद्रजीत नितनवार, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक डॉ. प्रल्हाद राऊत, चंद्रभानजी विद्यालय कुंड सर्जापूरचे क्रीडा शिक्षक डॉ.शरद गढीकर आणि बेसबॉल प्रशिक्षक अकलिम शहा, साक्षात ढेंगेकर आणि विकी सैरिसे यांनी दोन्ही खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यास शुभेच्छा दिल्या.

# अप्पर वर्धा धरणाच्या पाणथळी भागात संशोधकांनी केली

### दुर्मिळ अशा 'हनुमान चिखल्या' पक्षी प्रजातीच्या प्रजननाची नोंद

**अमरावती/ का.प्र.**

जागतिक स्तरावर दुर्मिळ अशा चिखल पक्षी या वर्गामध्ये मोडणारा 'हनुमान फ्लोअर' म्हणजेच हनुमान चिखल्या पक्षी याच्या प्रजननाची नोंद अमरावती जिल्ह्यातील अप्पर वर्धा धरणाच्या पाणथळी भागामध्ये शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती येथील प्राध्यापक व वरिष्ठ पक्षी संशोधक डॉ. गजानन वाघ व त्यांचे सोबत संशोधन करणारे प्रा. अश्विन लुंगे,आर. आर.लाहोटी महाविद्यालय, मोर्शी यांनी मोर्शी जवळील अप्पर वर्धा जलाशयावरील उन्हाळ्यातील पक्षी प्रजातींच्या स्थलांतराचा अभ्यासा दरम्यान या पक्षाच्या प्रजननाची शास्त्रीय दृष्ट्या महत्वाची नोंद घेतलेली आहे.

पक्षी विश्वात चिखल पक्षी वर्गात मोडणाऱ्या या छोट्या पक्षी प्रजातीला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. शास्त्रीय भाषे म्हणून ओळखला जाणाऱ्या या चिखल पक्षाला २०२३ मध्ये एक स्वतंत्र पक्षी प्रजाती म्हणून जागतिक स्तरावर अधिकृत मान्यता मिळालेली आहे. यापूर्वी याला कॅन्टीश फ्लोअर या पक्षाची उपप्रजाती असे मानले जात होते.या पक्षाचे हनुमान हे नाव हिंदू महाकाव्य रामायणातील ऐतिहासिक रामसेतू च्या संदर्भावरून घेतलेले आहे. भारत आणि श्रीलंका यांच्या मधील पौराणिक रामसेतू जवळील दोन्ही देशाच्या समुद्र किनारपट्टीवर या पक्षाचे प्रामुख्याने वास्तव्य आढळून येते.

ही पक्षी प्रजाती छोटा कंठेरी चिखल्या, केंठीश चिखल्या,



छोटा आर्ली, प्राच्य आर्ली या पक्षी प्रजातीच्या समूहात दिसतो.या पक्षाचे प्रजनन हे उन्हाळ्यातील एप्रिल व मे महिन्याच्या दरम्यान अप्पर वर्धा धरणाच्या उघड्या पडलेल्या भूभागावर आढळून आलेले आहे हा पक्षी मुख्तः जलाशयाचे पाणी कमी झाल्यानंतर उघडी पडलेली जमीन, तेथील सुकलेली पाणवनस्पती व छोटे-मोठे खडक अशा ठिकाणी तो त्याच्या घरट्याची जागा निच्छित करतो. जमिनीवरील उघड्या घरट्यामध्ये दोन ते तीन अंडी देतो की जे अंडी संपूर्णपणे तेथील माती व गोट्यांच्या रंगाशी समरूप झालेले असतात आणि नंतर अंड्यातून बाहेर पडलेल्या त्यांच्या पिल्लांचा रंग सुद्धा तसाच माती व तेथील असलेल्या गोट्यांसारखाच असतो त्यामुळे हा पक्षी आपल्या पिल्लांचे उत्तमपणे त्यांच्या शत्रूपासून संरक्षण करतो हे विशेष.

गेल्या काही वर्ष्यात या जलाशयावर संशोधकांनी जवळपास १३ पक्षी प्रजातीच्या प्रजननासंबधी नोंदी घेतलेल्या आहे.विशेष म्हणजे प्राच्य आर्ली हा पक्षी ऑस्ट्रेलियातून स्थलांतर करून या पाणथळी भागामध्ये प्रजनन करतो.यापूर्वी, महाराष्ट्रातील वरिष्ठ पक्षी अभ्यासक डॉ. राजू कसंबे,मुंबई यांनी या पक्षाच्या प्रजननाची नोंद १७ वर्ष अगोदर अमरावती जिल्ह्यात, तसेच यावर्षी यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा तालुक्यात नुकतीच घेतलेली आहे. त्याचबरोबर दक्षिण भारतातील कर्नाटक, तामिळ नाडू, आंध्र प्रदेश या राज्यातील काही पाणथळी भागात या पक्षाच्या प्रजननासंबंधी नोंदी संदर्भात माहिती आढळून आली परंतु पश्चिम विदर्भातील सर्वात मोठ्या अशा अपर वर्धा जलाशयाच्या पाणथळी भागात या पक्षाच्या प्रजननासंबंधी ही नोंद पहिलीच आहे असे मत संशोधकांनी व्यक्त केले आहे. डॉ. राजू कसंबे यांनी सुद्धा अपर वर्धा जलाशया वरील या 'हनुमान चिखल्या' पक्षी प्रजातीच्या प्रजननासंबंधी नोंदीला दुजोरा दिलेला आहे.जिल्ह्यातील अप्पर वर्धा जलाशय व तेथील पाणथळी भाग हा स्थानिक तसेच स्थलांतरित पक्ष्यांच्या दृष्टीने महत्वाचा अधिवास आहे हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

# वाढत्या तापमानामुळे जीवसृष्टी अलर्ट मोड़ वर

**युनायटेड किंगडम-स्थित 'युटिलिटी बिडर' या वेबसाइटच्या अहवालानुसार, या काळात सरासरी ६,६८,४०० हेक्टर जंगल गमावलेल्या ब्राझीलनंतर भारत दुसऱ्या क्रमांकावर आहे. या अहवालात पुढे असे म्हटले आहे की, २०१५ ते २०२० या काळात ब्राझीलने २५,५९,१०० हेक्टर आणि इंडोनेशियाने १८,७६,००० हेक्टर जंगल गमावले असताना, भारताच्या आकडेवारीत लक्षणीय वाढ झाली आहे.**



निसर्गाचा साधा नियम आहे की झाडे आपले रक्षण करतात आणि आपणही त्यांचे रक्षण केले पाहिजे. जर आपण निसर्गाच्या संरक्षणासाठी १ टक्का जरी योगदान दिले, तरी निसर्ग आपल्याला १०० टक्के समृद्धी परत देतो. कोरोना काळात आपण सर्वांनी पाहिले की, जेव्हा निसर्गात मानवी हस्तक्षेप थांबला, तेव्हा निसर्ग स्वतःला झपाट्याने समृद्ध करत होता. आज ही एक विडंबनाच आहे की, ते निस्वार्थ, समृद्ध झाड, ज्याने अनेक दशके आईप्रमाणे आपल्या कुशीत सावली देऊन उन्हापासून आपले रक्षण केले, आपल्याला फळे आणि फुले दिली, पक्ष्यांना आश्रय दिला, पावसाळ्यात जमिनीची धूप रोखली, मानवांसाठी विषारी असलेला कार्बन डायऑक्साइड शोषून आपल्याला जीवनदायी ऑक्सिजन दिला. वातावरणातील आर्द्रता आणि तापमान नियंत्रित करून नैसर्गिक संसाधने समृद्ध करण्यात त्याने महत्त्वाची भूमिका बजावली. आज, तेच झाड तोडताना लोकांना कोणताही पश्चात्ताप वाटत नाही, जेव्हाकि त्याचे आपल्या संपूर्ण जीवनावर आणि आरोग्यावर गंभीर परिणाम होतात. आपण इतके नीच, स्वार्थी लोक आहोत का, की जो आपल्याला जीवन देतो त्याचाच जीव आपण घेऊ?

आज आपण सर्वजण बदलत्या नैसर्गिक पर्यावरणाचे परिणाम भोगत आहोत. स्वार्थी लोकांच्या चुकीच्या धोरणांनी संपूर्ण पर्यावरणाला विषारी बनवले आहे. नैसर्गिक संसाधनांचे अतिशोषण आणि जंगलतोडीमुळे पृथ्वीचे तापमान वाढले आहे, ज्यामुळे नैसर्गिक आपत्ती आणि रोगांमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. प्रदूषण सतत वाढत आहे, सिमेंट रस्ते भट्ट्यांसारखे तापतात आणि भूजल पातळी झपाट्याने कमी होत आहे. अन्नधान्यामधील हानिकारक रसायनांचे सतत वाढणारे प्रमाण लोकांना मृत्यूच्या दारात ढकलत आहे. दहा-पंधरा वर्षांपूर्वीपर्यंत, जेव्हा मुले उन्हात फिरायची आणि खेळायची, तेव्हा फक्त उष्णता जाणवायची. खेळताना झाडाच्या सावलीत बसले की थंड वाटायचे. पण आता, हा सूर्यप्रकाश विषारी वाटू लागला आहे; तो केवळ शरीर तापवत नाही, तर उकळी आणून माणसाला आजारीही पाडतो. शहरांच्या काँक्रीटच्या जंगलात, दाट सावली देणारी झाडे पाहणे दुर्मिळ होत चालले आहे.

उष्णतेच्या लाटांमुळे होणाऱ्या मृत्यूंची संख्या वर्षानुवर्षे वाढत आहे, आणि याचा सर्वाधिक फटका गरीब, वृद्ध, मुले आणि असंघटित कामगारांना बसतो, कारण त्यांचा ह्या उन्हात उदरनिर्वाहाचा संघर्ष विशेषतः वेदनादायी असतो. सीईईडब्ल्यूनुसार, बांधकाम कामगार, गिग वर्कर्स आणि झोपडपट्टीत राहणारे लोक यांसारखे असुरक्षित गट उष्णतेच्या ताणास सर्वाधिक बळी पडतात. या उष्णतेत त्यांचे उत्पन्न आणि उत्पादकता दोन्ही घटतात. उष्णतेच्या लाटांमुळे २०३० पर्यंत जीडीपीमध्ये ४.५ टक्क्यांपर्यंत संभाव्य घट होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे पिकांचे नुकसान आणि अन्नसुरक्षा धोक्यात येईल. 'द लॅन्सेट' मध्ये प्रकाशित झालेल्या २०२४ च्या एका अभ्यासानुसार, उष्णतेच्या लाटांदरम्यान कार्यक्षमता कमी झाल्यामुळे दरवर्षी अंदाजे १९४ अब्ज डॉलर्सच्या उत्पन्नाचे नुकसान होते. या शतकाच्या अखेरीस संपूर्ण भारतातील उन्हाळ्यातील उष्णतेच्या लाटांमध्ये ३०० ते ४०० टक्क्यांनी वाढ होऊ शकते.

उन्हाळ्यात भूजल पातळीत सतत घट होत असल्यामुळे, अनेक गावकऱ्यांना आणि दुर्गम भागातील रहिवाशांना पाण्यासाठी लांबचा प्रवास करावा लागतो. या समस्येशी संबंधित व्हिडिओ सोशल मीडियावर वारंवार व्हायरल होतात, ज्यात लहान मुलांपासून ते वृद्ध महिलांपर्यंत सर्वजण थोड्याशा पाण्यासाठी दररोज अनेक किलोमीटर चालताना दिसतात. आपला जीव धोक्यात घालून, ते घागरींमध्ये दूषित पाणी गोळा करण्यासाठी ५०-६० फूट खोल खड्ड्यांमध्ये उतरतात. पाण्यासाठीचा हा संघर्ष आणि असहाय्यता पाहून मन हेलावून जाते. निसर्गाने सर्वांना स्वच्छ पाणी, हवा आणि पौष्टिक अन्न मिळवण्याचा समान हक्क दिले आहे, परंतु स्वार्थी मानवाने निसर्गाचा समतोल बिघडवून सर्व जीवांना धोका निर्माण केला आहे. जर लोकांची ही अवस्था आहे, तर या वाढत्या तापमानात जंगलातील मुक्या वन्य प्राण्यांची अवस्था किती बिकट असेल.

भौगोलिकदृष्ट्या, आपला देश उष्णकटिबंधीय प्रदेश मानला जातो. वाढत्या हरितगृह वायू उत्सर्जनामुळे वातावरणातील उष्णता वाढली आहे, ज्यामुळे तापमानात सातत्याने वाढ होत आहे. नैसर्गिक हिरवळ आणि नैसर्गिक शीतकरण संसाधने झपाट्याने कमी होत आहेत. वेगाने विस्तारणाऱ्या शहरांनी नैसर्गिक भूदृश्यांची जागा काँक्रीट आणि काचेच्या इमारतींनी घेतली आहे. या इमारती दिवसा उष्णता शोषून घेतात आणि रात्री हळूहळू बाहेर सोडतात, ज्यामुळे सूर्यास्तानंतरही शहराचे तापमान कमी होत नाही. विकासासाठी, शहरांच्या आसपासच्या गावांमध्ये सुपीक जमिनीवर,शेतजमिनीवर इमारती बांधल्या जात आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटनेनुसार, जगभरात दरवर्षी अंदाजे १ कोटी हेक्टर जंगल नष्ट होते, जे दर १२ महिन्यांत आइसलँड किंवा पोर्तुगालच्या क्षेत्राएवढे जंगल तोडण्यासारखे आहे. 'ग्लोबल फॉरेस्ट वॉच'नुसार, भारतात शेती,जंगलतोड आणि पायाभूत सुविधांच्या विकासामुळे दरवर्षी १,००,००० हेक्टरपेक्षा जास्त नैसर्गिक जंगल आणि वृक्षाच्छादन नष्ट होते. पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या मते, विकास प्रकल्पांसाठी सरकारी परवानगीने दरवर्षी सुमारे २० ते ३० लाख झाडे तोडली जातात.

भारताने १९९० ते २००० या काळात ३,८४,००० हेक्टर जंगल गमावले, परंतु २०१५ ते २०२० या काळात हा आकडा वाढून ६,६८,४०० हेक्टर झाला. ऊर्जा आणि उपयुक्तता खर्चाची तुलना करणाऱ्या युनायटेड किंगडम-स्थित 'युटिलिटी बिडर' या वेबसाइटच्या अहवालानुसार, या काळात सरासरी ६,६८,४०० हेक्टर जंगल गमावलेल्या ब्राझीलनंतर भारत दुसऱ्या क्रमांकावर आहे. या अहवालात पुढे असे म्हटले आहे की, २०१५ ते २०२० या काळात ब्राझीलने २५,५९,१०० हेक्टर आणि इंडोनेशियाने १८,७६,००० हेक्टर जंगल गमावले असताना, भारताच्या आकडेवारीत लक्षणीय वाढ झाली आहे.'डाऊन टू अर्थ'नेही हे वृत्त दिले आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मुंबई आणि अभिमत विद्यापीठ सस्त्रा च्या संशोधकांनी केलेल्या एका नवीन अभ्यासात असे समोर आले आहे की, २०१५ ते २०१९ या काळात भारताच्या वनक्षेत्रात लक्षणीय घट झाली आहे. या वर्षांमध्ये भारताने १८ चौरस किलोमीटर वनक्षेत्र गमावले, तर केवळ १ चौरस किलोमीटरची वाढ झाली. हे प्रमाण अत्यंत चिंताजनक असून, ते भारतातील वन परिसंस्थेतील तीव्र विखंडनाचे संकट दर्शवते. जेव्हा की, भारत सरकारची मुख्य नोडल एजन्सी असलेल्या प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरोच्या मते, निव्वळ वार्षिक वनक्षेत्र वाढीच्या बाबतीत भारत जागतिक स्तरावर तिसऱ्या क्रमांकावर कायम आहे. वनक्षेत्राच्या वार्षिक ऱ्हासाचा दर १०.७ दशलक्ष हेक्टर (१९९०-२०००) वरून ४.१२ दशलक्ष हेक्टर (२०१५-२०२५) पर्यंत घसरला आहे.

कितीही वृक्षरोपणाच्या गोष्टी केल्या तरीही शेकडो, हजारो वर्ष जूनी घनदाट जंगले कापल्यावर ती त्याच तुलनेत पुन्हा मिळवणे सहज शक्य आहे? वन्य प्राणी आपल्यापेक्षा श्रेष्ठ आहेत, ते त्यांच्या नैसर्गिक अधिवासांचे जतन आणि संवर्धन करून निसर्गाचे खऱ्या अर्थाने रक्षण करतात.

**डॉ. प्रितम भि. गेडाम**
मो-०८२३७४ १७०४१




अलीकडे सर्वत्र सिमेंटच्या रस्त्यासाठी व इतर कारणांसाठी झाडांची कत्तल करून पर्यावरणाचा सतत -हास सुरु आहे. त्याचे परिणाम उन्हाळ्यात ४७ अंशावर उष्णतामान आपण भोगत आहोत. ते आता दरवर्षी वाढणारच. वृक्षवल्ली आपले सोयरे असून सजीवसृष्टीचा श्वास आहे. श्वास म्हणजे जीवन. सुंदर जीवन जगायचे असेल तर आपल्यासाठी व पुढील पिढ्यांसाठी येत्या मृग नक्षत्रात प्रत्येकाने किमान एका झाडाचे रोपटे लावा. त्याचे पाच वर्षे तरी संरक्षण व संवर्धन करा. प्रत्येकाने गांभीर्याने आपापल्या घरापासून हा प्रयोग सुरू केल्यास पर्यावरणाचे संतुलन साधण्यासाठी मोलाची मदत होईल. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त हिच विनंती.

**प्र.सु.हिरुरकर**

# विकासाच्या धुंदीत हरवलेले पर्यावरण

'विकास' हा शब्द ऐकताच डोळ्यांसमोर उभे राहतात ते उंच इमारती, रुंद रस्ते, वेगवान तंत्रज्ञान आणि आधुनिक जीवनशैली. परंपरेने आपण विकासाचा अर्थ प्रगती, उन्नती आणि समृद्धी असाच घेत आलो आहोत. मात्र आज जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने स्वतःलाच एक प्रश्न विचारण्याची गरज आहे.हा विकास नेमका कोणासाठी आणि कोणाच्या किंमतीवर होत आहे?जंगलांच्या जागी काँक्रीटची जंगले उभी राहत आहेत, नद्या प्रदूषणाने गुदमरू लागल्या आहेत, डोंगरांचे अस्तित्व धोक्यात आले आहे आणि ऋतूचक्रही विस्कळीत होत चालले आहे. त्यामुळे विकासाचा अर्थ प्रगती नसून अधोगती तर ठरत नाही ना, अशी शंका मनात निर्माण होते. निसर्गाच्या विनाशावर उभारलेली समृद्धी ही खऱ्या अर्थाने प्रगती म्हणता येईल का, याचा विचार करण्याची वेळ आता आली आहे.

मानव आणि निसर्ग यांचे नाते हे जन्मोजन्मीचे आहे. निसर्गाच्या कुशीत वाढलेल्या मानवाने निसर्गाकडून हवा, अन्न, पाणी आणि निवारा ह्या मूलभूत गरजांची पूर्तता करून घेतली. म्हणून जर पृथ्वीवरील हवा श्वास घेण्यायोग्य राहिली नाही, पाण्याचे स्त्रोत आटले आणि हिरवीगार जंगले नामशेष झाली तर मानवाचे अस्तित्वही नामशेष होईल. मानवाचे जीवन पर्यावरणावरच अवलंबून आहे त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन ही आजच्या काळातील मानवाची सर्वात महत्त्वाची जबाबदारी बनली आहे.

पर्यावरणाबाबत मानवी हस्तक्षेप हेच मुळी पर्यावरण ऱ्हासाचे मूलभूत कारण म्हणावे लागेल. मानवाने अमाप प्रमाणात केलेली जंगलतोड हे त्यापैकीच एक कारण म्हणावे लागेल. रस्ते, धरणे, उद्योग, खाणकाम, गृहनिर्माण प्रकल्प ,शैक्षणिक संस्था त्याचप्रमाणे सामाजिक किंवा सार्वजनिक कार्यक्रमांच्या तयारी दरम्यान करण्यात आलेली वृक्षतोड ही पर्यावरणीय परिणामांची जाणीव करून देते. ज्याप्रमाणे नाशिक येथे होणाऱ्या कुंभमेळ्याच्या अनुषंगाने पायाभूत सुविधांच्या विस्तारासाठी झालेली वृक्षतोड. तसेच तेलंगणातील कांचा गाचीबोवली परिसरात आयटी हब उभारण्यासाठी करण्यात आलेली मोठ्या प्रमाणावरील वृक्षतोड ही विकासाच्या नावाखाली निसर्गावर चाललेल्या आक्रमणाचे ज्वलंत उदाहरण ठरली; परंतु विद्यार्थी, पर्यावरणप्रेमी ,आणि न्यायव्यवस्थेच्या हस्तक्षेपामुळे हा प्रश्न राष्ट्रीय चर्चेचा विषय बनला. या घटनेने विकास आणि पर्यावरण यांच्यातील समतोल राखण्याची गरज अधोरेखित केली. अमाप जंगलतोड ही विविध दुष्परिणामांना घेऊन येते. ज्यामध्ये जैवविविधता नष्ट होते,पावसाचे प्रमाण बदलते, मृदारक्षण होऊन भूस्खलनाच्या घटना घडतात. तसेच शहरीकरण हे सुद्धा पर्यावरण ऱ्हासाचे दुसरे कारण सांगता येईल. शहरांचा विस्तार करण्यासाठी नैसर्गिक जलस्त्रोत शेती आणि मोकळ्या जागा नष्ट केल्या जातात. ज्याचा परिणाम म्हणून आपल्यासमोर नद्यांचे पूर, उष्णतेत वाढ, भूजल पातळी घटने ,आदी समस्या आव्हानात्मक स्वरूपात उभे राहतात.

औद्योगीकरण पर्यावरण ऱ्हासाला कारणीभूत ठरलेले आहे. कारखान्यांमधून निघणारे धूर, रासायनिक सांडपाणी आणि घातक वायू जे जलप्रदूषण, वायूप्रदूषण, मृदाप्रदूषण घडवून आणते आणि मानवी आरोग्यावर दुष्परिणाम करते. खाणकाम, रासायनिक शेती ,नदीपात्रातील वाळू उपसा, प्लास्टिकचा वाढता वापर आणि वन्यजीवांच्या अधिवासांवर अतिक्रमण अशी कारणे जी पर्यावरणात जमिनीची सुपीकता कमी होणे ,नदीकाठची धूप, डोंगरांची स्थिरता कमी होऊन भूस्खलन होणे, कचऱ्याच्या मोठ्या प्रमाणात होणाऱ्या निर्मितीतून जलप्रदूषण, सागरी जीवांना धोका, मातीची गुणवत्ता खालावणे यासारख्या दुष्परिणामांची निर्मिती करते.

निसर्गावर विजय मिळविल्याचा मानवी अहंकारच आज पर्यावरणीय संकटाचे मूळ कारण ठरला आहे. विकासाच्या नावाखाली आपण निसर्गाची जी लूट केली त्याचे मोल आता पूर, दुष्काळ, भूस्खलन,उष्णतेच्या लाटा आणि जैवविविधतेच्या ऱ्हासाच्या रूपाने चुकवत आहोत.प्रश्न विकासाचा किंवा धार्मिक श्रद्धेचा नाही; प्रश्न आहे तो पर्यावरणीय समतोलाचा. एका झाडाला वाढवण्यासाठी अनेक वर्ष लागतात परंतु ते तोडण्यासाठी काही मिनिटे पुरेशी असतात.आज आपण निसर्गाचे संरक्षण केले तरच उद्याच्या पिढ्यांना सुरक्षित आणि समृद्ध भविष्य देऊ शकू.'झाडे ही केवळ पृथ्वीची शोभा नसून मानवाच्या अस्तित्वाची शाश्वत हमी आहेत म्हणूनच पर्यावरण संरक्षण हा पर्याय नसून आपल्या अस्तित्वाचा पाया आहे.'

**उज्वला शिंदे**

# आमिरची तिसऱ्यांदा चढण्याची तयारी..




लोकांचा ईजा, बीजा, तीजा होत असतो. पण बुटका बदमाश आमिर खानच्या आयुष्यात रीना, किरण, गौरी होणार आहे.

हो. अनेक तरुण पोरं इथे लग्न न होऊन झुरत राहतात आणि तिथे बायांच्या बाबतीत नावासारखाच आमिर असणारा खान फक्त ६१व्या वर्षी तिसऱ्यांदा चढण्याची तयारी करतोय! बोहल्यावर चढण्याची तयारी करतोय अस म्हणायचं आहे मला, you dirty minds!

आधीच रीना पासून दोन मुले, किरण पासून एक मुलगा असताना आणि आता गौरी आण्टी पण आणखी दोन तीन सहज जन्माला घालेल इतका सुपीक आमिर बाबा तिसऱ्यांदा लग्न करतोय! कदाचित इरा आणि गौरी एकत्रच आई होतील आणि आमिर एकाच वेळी आजोबा आणि बाप होईल! टीकाकार आणि गल्ला दोन्हीमध्ये एकाच वेळी यश मिळवण्याची कला अवगत असलेला आमिर इथेही डबल धमाका करेल ह्याची आम्हा फॅन्सना खात्री आहे!

आता आमिरला नवीन पाखरू सापडेपर्यंत तरी हे लग्न टिकेल अशी आशा करू. पण तोवर आम्हा फॅन्सची मात्र पंचाईत होणार आहे. काल पर्यंत गौरी खान म्हटले की मन्नत नामक जन्नत मधे राहणारी शाहरुख खानची बायको आठवत असे. आता ह्यांच्या लग्नानंतर गौरी खान म्हटले की सोनाली कुलकर्णी सारखं 'जुनी की नवी?' असे विचारावे लागणार! असो. लग्न ५ जुलैवर येऊन ठेपले आहे.

**पत्रिका साधारण अशी असेल का?**

आमचे येथे पाणी फाउंडेश कृपेकरून आम्ही स्वतःच म्हणजे आमिर खान ह्यांचा तिसरा निकाह आमची नवीन मैत्रीण चि. सौ. कां. गौरी हिच्याशी ५ जुलै २०२६ रोजी करण्याचे योजले आहे. कार्य सिद्धीस नेण्यास अनुभवसंपन्न मिस्टर परफेक्शनिस्ट स्वतःच समर्थ आहेत. तरी ह्या सोहळ्यास आपण अगत्याने त्या दिवशी टीव्हीवरील बातम्यांच्या माध्यमातून उपस्थित रहावे ही विनंती.

आमच्या नवीन अम्मीला आणि जुन्या अब्बुला दुवा (jnu सुंदरीची मुलगी नाही. इथे दुवा म्हणजे आशीर्वाद) द्याव्या ही विनंती. आपले जुनैद, इरा, आझाद खान.

इश्य बाई! वरील विनंतीला मान देऊन आमच्या माजी ह्यांच्या आजी निकाहला शुभेच्छा नक्की द्यायच्या गडे! आपल्या रीना आणि किरण.

आमच्या सासरे बुवांच्या निकाहसाठी बघाईया नक्की द्या. आपला नुपूर.

**-मंदार जोग**

# आकड्यातील न्यायव्यवस्था



'न्यायालयातील प्रत्येक आकडा हा केवळ संख्या नसून, तो न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या एका नागरिकाची कहाणी आहे.' भारतातील न्यायव्यवस्था ही जगातील सर्वात मोठ्या आणि गुंतागुंतीच्या न्यायव्यवस्थांपैकी एक आहे.देशभरातील लाखो नागरिक न्याय मिळविण्यासाठी न्यायालयांचे दरवाजे ठोठावत असतात. वाढती लोकसंख्या, वाढते व्यवहार, सामाजिक व आर्थिक बदल आणि कायद्यांचे वाढते क्षेत्र यामुळे न्यायालयांवरील कामाचा ताण सातत्याने वाढत आहे. अशा परिस्थितीत न्यायालयीन व्यवस्थेतील पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी राष्ट्रीय न्यायिक डेटा ग्रिड (NJDG) हे अत्यंत महत्त्वपूर्ण डिजिटल व्यासपीठ म्हणून उदयास आले आहे.

ई-कोर्ट्स प्रकल्पांतर्गत विकसित करण्यात आलेले NJDG हे देशातील जिल्हा न्यायालये, अधीनस्थ न्यायालये, उच्च न्यायालये आणि सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणांची माहिती एका क्लिकवर उपलब्ध करून देते. या प्रणालीद्वारे प्रकरणांची संख्या, प्रलंबितता, निकाल, प्रकरणांचे वय, महिला व ज्येष्ठ नागरिकांनी दाखल केलेली प्रकरणे तसेच विविध न्यायालयांची कामगिरी याबाबतची माहिती सार्वजनिकरित्या उपलब्ध होते.

सध्या उपलब्ध आकडेवारीनुसार देशातील जिल्हा व अधीनस्थ न्यायालयांमध्ये सुमारे ४.९२ कोटी प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यामध्ये सुमारे १.१२ कोटी दिवाणी प्रकरणे आणि ३.८० कोटी फौजदारी प्रकरणांचा समावेश आहे. ही आकडेवारी भारतीय न्यायव्यवस्थेपुढील आव्हानांचे गंभीर स्वरूप दर्शविते. प्रलंबित प्रकरणांमध्ये फौजदारी प्रकरणांचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते, ज्यामुळे न्यायालयीन व्यवस्थेवर अतिरिक्त ताण निर्माण होतो.

न्यायालयीन प्रकरणांच्या वयानुसार केलेले वर्गीकरण अधिक चिंताजनक चित्र दाखवते. सुमारे ३३ टक्के प्रकरणे एक वर्षापेक्षा कमी कालावधीची असली तरी मोठ्या प्रमाणावर प्रकरणे अनेक वर्षे प्रलंबित आहेत. जवळपास १० टक्के प्रकरणे दहा वर्षांहून अधिक काळ न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. न्याय मिळण्यात होणारा विलंब हा केवळ न्यायालयीन प्रश्न नसून तो सामाजिक आणि आर्थिक विकासालाही प्रभावित करणारा मुद्दा आहे. 'विलंबित न्याय म्हणजे नाकारलेला न्याय' हे तत्त्व आजही भारतीय न्यायव्यवस्थेसमोर उभ्या असलेल्या वास्तवाचे वर्णन करते.

तथापि, न्यायालयीन कामकाजातील काही सकारात्मक बाबी देखील दिसून येतात. मागील महिन्यात देशभरात सुमारे २३ लाख नवीन प्रकरणे दाखल झाली, तर २४ लाखांहून अधिक प्रकरणांचा निकाल लागला. म्हणजेच अनेक न्यायालये दाखल होणाऱ्या प्रकरणांपेक्षा अधिक प्रकरणे निकाली काढण्याचा प्रयत्न करत आहेत. ही बाब न्यायव्यवस्थेच्या कार्यक्षमतेच्या दृष्टीने आशादायक मानली जाते.

NJDG चे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे पारदर्शकता. पूर्वी न्यायालयीन आकडेवारी सहज उपलब्ध होत नव्हती. आज कोणताही नागरिक, वकील, संशोधक किंवा पत्रकार राज्यनिहाय, जिल्हानिहाय आणि न्यायालयनिहाय माहिती पाहू शकतो. यामुळे न्यायालयीन व्यवस्थेवर लोकांचा विश्वास वाढण्यास मदत झाली आहे. तसेच धोरणकर्त्यांना कोणत्या भागात अधिक न्यायाधीश, अधिक न्यायालये किंवा अधिक पायाभूत सुविधा आवश्यक आहेत याचे विश्लेषण करणे सुलभ झाले आहे.

सामाजिक न्यायाच्या दृष्टीनेही NJDG अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार सुमारे ३९ लाखांहून अधिक प्रकरणे महिलांनी दाखल केलेली आहेत, तर ३२ लाखांहून अधिक प्रकरणे ज्येष्ठ नागरिकांशी संबंधित आहेत. म्हणजेच महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनी दाखल केलेल्या प्रकरणांची एकूण संख्या ७१.८१ लाखांपेक्षा अधिक आहे. ही संख्या केवळ न्यायालयीन नोंद नसून समाजातील वाढते कौटुंबिक वाद, मालमत्ता विवाद, आर्थिक मतभेद, फसवणूक, कौटुंबिक हिंसा आणि नातेसंबंधांमधील तणाव यांचे वास्तव चित्र दर्शवते. समाजात वाढत चाललेले संघर्ष आणि न्यायासाठीची धडपड या आकडेवारीतून स्पष्टपणे दिसून येते.

याशिवाय NJDG मध्ये ५२ लाखांहून अधिक अत्यंत जुनी प्रकरणे स्वतंत्रपणे दर्शविली जातात. ही आकडेवारी न्यायव्यवस्थेतील बॅकलॉगचे वास्तव दाखवते.या समस्येवर मात करण्यासाठी लोकअदालती,मध्यस्थी, समेट प्रक्रिया, ऑनलाईन सुनावणी, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे आवश्यक आहे.

आजच्या डिजिटल युगात NJDG हे केवळ आकडेवारीचे पोर्टल नसून न्यायव्यवस्थेच्या सुधारणांचे प्रभावी साधन बनले आहे. मात्र, केवळ तंत्रज्ञान पुरेसे नाही. न्यायाधीशांची रिक्त पदे तातडीने भरणे, नवीन न्यायालये स्थापन करणे, आधुनिक पायाभूत सुविधा उभारणे आणि पर्यायी वाद निराकरण यंत्रणांना प्रोत्साहन देणे हे तितकेच आवश्यक आहे. तेव्हाच न्यायव्यवस्थेतील प्रलंबितता कमी होऊन सर्वसामान्य नागरिकांना वेळेत न्याय मिळू शकेल.

एकूणच, राष्ट्रीय न्यायिक डेटा ग्रिड (NJDG) हे भारतीय न्यायव्यवस्थेचे वास्तव प्रतिबिंब दाखवणारे, पारदर्शकता वाढविणारे आणि न्यायिक सुधारणांना दिशा देणारे क्रांतिकारी व्यासपीठ आहे. आकडे केवळ संख्या सांगत नाहीत; ते समाजातील वाद, संघर्ष, अपेक्षा आणि न्यायासाठीची झुंज यांची कहाणी सांगतात. त्यामुळे या आकड्यांकडे केवळ सांख्यिकी म्हणून नव्हे, तर न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या कोट्यवधी भारतीयांच्या आशा-अपेक्षांच्या नजरेतून पाहण्याची गरज आहे.

**– ॲड. धनंजय देशमुख**
मो. ९२८४३८२१०२

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवच
अकोला
जिल्हा विशेष

# भोकर-काळेगाव रस्ता प्रकरणात 'फाईल मॅनेजमेंट'चा संशय!

## ई-निविदेतील मूळ अंदाजपत्रक लपविण्याचा प्रयत्न? दुसरे अंदाजपत्रक नेमके कुणाच्या आशीर्वादाने?

■ प्रतिनिधी | अकोला ■

भोकर-काळेगाव रस्ता आणि लहान पूल बांधकाम प्रकरण दिवसेंदिवस अधिकच गूढ बनत चालले आहे. आधी ई-निविदेतील मूळ अंदाजपत्रक आणि नंतर माहिती मागणाऱ्यांना दाखविले जाणारे दुसरे अंदाजपत्रक यामुळे संशयाचे वातावरण निर्माण झाले होते. आता या प्रकरणात फाईल मॅनेजमेंट, वरिष्ठ कार्यालयातील वाढलेल्या हालचाली आणि कागदपत्रांवर पडदा टाकण्याच्या कथित प्रयत्नांची चर्चा सुरू झाल्याने प्रकरण आणखी गंभीर बनले आहे.



विश्वसनीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ऑनलाइन ई-निविदा प्रक्रियेत अपलोड करण्यात आलेले अंदाजपत्रक हेच मूळ आणि अधिकृत दस्तावेज आहे. याच अंदाजपत्रकाच्या आधारे निविदा प्रक्रिया पूर्ण झाली, कंत्राट मंजूर झाले आणि कामाला प्रशासकीय मान्यता मिळाली. मात्र जेव्हा या कामाबाबत नागरिकांनी आणि तक्रारदारांनी माहिती मागण्यास सुरुवात केली, तेव्हा प्रत्यक्ष करण्यात आलेल्या खडीकरणाशी जुळवून तयार करण्यात आलेले दुसरे अंदाजपत्रक दाखविले जाऊ लागल्याची धक्कादायक बाब समोर येत आहे.

जर हे अंदाजपत्रक अधिकृत असेल, तर त्याला मंजुरी देणारा आदेश कुठे आहे? आणि जर मंजुरीच नसेल, तर नागरिकांना कोणत्या अधिकाराने ते दाखविले जात आहे? हा प्रश्न आता थेट बांधकाम विभागाच्या गळ्यात अडकला आहे. विशेष म्हणजे, या प्रकरणाची चर्चा वाढल्यानंतर विभागातील एका अधिकाऱ्याच्या हालचाली अचानक वाढल्याची माहिती मिळत आहे. संबंधित अधिकारी गेल्या काही दिवसांपासून अधीक्षक अभियंता कार्यालयात सातत्याने फेऱ्या मारत असल्याचे बोलले जात आहे. या भेटी नियमित शासकीय कामाचा भाग आहेत की प्रकरणातील वाढती धग शांत करण्यासाठी सुरू असलेले प्रयत्न आहेत, याबाबत आता शंका व्यक्त केली जात आहे.

याहूनही धक्कादायक बाब म्हणजे या कामाची मूळ फाईल एका वरिष्ठ अधिकाऱ्याने स्वतःच्या ताब्यात ठेवल्याची चर्चा विभागात सुरू आहे. एखाद्या वादग्रस्त प्रकरणातील महत्त्वाची फाईल नियमित कार्यालयीन प्रक्रियेऐवजी वैयक्तिक नियंत्रणाखाली ठेवली जात असेल, तर त्यामागचे कारण काय? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

स्थानिक स्तरावर अशीही चर्चा आहे की, ज्या पद्धतीने निविदा प्रक्रियेत हॉटमिक्स प्लांट, डांबरीकरण आणि इतर तांत्रिक अटींचा आधार घेऊन कामाचे स्वरूप दाखविण्यात आले, त्याच पद्धतीने आता संपूर्ण प्रकरणाची फाईलही 'मॅनेज' करण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यामुळे या फाईलची तत्काळ जप्ती करून स्वतंत्र चौकशी समितीकडे सुपूर्द करण्याची मागणी जोर धरत आहे. दरम्यान, रस्त्याच्या प्रत्यक्ष कामाबाबतही नवीन प्रश्न निर्माण झाले आहेत. कागदोपत्री सुमारे तीन किलोमीटर काम मंजूर असताना प्रत्यक्षात तेवढेच काम झाले आहे की कमी अंतरावरच काम उरकून संपूर्ण निधी खर्च झाल्याचे दाखविण्यात आले आहे, याची मोजणी करण्याची मागणी होत आहे. कारण या प्रकरणातील प्रत्येक नवीन माहिती नवा संशय निर्माण करत आहे.

प्रयोगशाळा चाचणीच्या मुद्द्यावरही अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत. कार्यारंभ आदेशात प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या अधिकृत प्रयोगशाळेतून चाचणी अहवाल घेणे बंधनकारक असल्याचे नमूद असताना प्रत्यक्षात एका खाजगी प्रयोगशाळेचा अहवाल जोडण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. जर अधिकृत प्रयोगशाळा उपलब्ध होती, तर खाजगी प्रयोगशाळेची गरज का भासली? आणि त्या अहवालाला मान्यता देण्यामागे कोणाचा हस्तक्षेप होता? याची उत्तरे अद्याप मिळालेली नाहीत.

एकीकडे दोन अंदाजपत्रके, दुसरीकडे संशयास्पद फाईल हालचाली, प्रयोगशाळा चाचणीतील कथित विसंगती आणि कामाच्या लांबीबाबतचे प्रश्न या सर्व बाबी एकत्रितपणे पाहिल्यास भोकर-काळेगाव रस्ता प्रकरण हे केवळ निकृष्ट दर्जाच्या कामापुरते मर्यादित नसून त्यामागे मोठ्या प्रमाणावर कागदोपत्री खेळ झाल्याचा संशय अधिक गडद होत आहे.

### प्रश्नांची मालिका वाढतेय...

- ई-निविदेतील मूळ अंदाजपत्रक असताना दुसरे अंदाजपत्रक कोणी तयार केले?
- त्या अंदाजपत्रकाला वरिष्ठ कार्यालयाची लेखी मंजुरी आहे का?
- तीन किलोमीटरचे काम प्रत्यक्षात पूर्ण झाले का?
- पीएमजीएसवाय प्रयोगशाळेऐवजी खाजगी लॅबचा अहवाल का वापरण्यात आला?
- कामाची मूळ फाईल नेमकी कुणाच्या ताब्यात आहे?

*या प्रश्नांची उत्तरे मिळेपर्यंत भोकर-काळेगाव रस्ता प्रकरणातील संशय अधिकच वाढत राहणार, हे निश्चित.*

### "सीईओंनी फाईल ताब्यात घ्यावी!

संपूर्ण प्रकरणातील वाढती गंभीरता लक्षात घेता जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी संबंधित कामाची मूळ फाईल तत्काळ आपल्या ताब्यात घेऊन सुरक्षित ठेवावी, अशी मागणी होत आहे. अन्यथा महत्त्वाचे पुरावे आणि कागदपत्रे बदलली जाण्याची भीती तक्रारदार व्यक्त करीत आहेत.

---

## थोडक्यात

### पीएम किसान योजनेची ई-केवायसी पूर्ण करा

**अकोला :** प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम किसान) योजनेचा लाभ घेणाऱ्या सर्व पात्र शेतकऱ्यांना पुढील हप्ता अखंडित सुरू ठेवण्यासाठी ३० जूनपूर्वी आपली वार्षिक ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. मुदतीत ही प्रक्रिया पूर्ण न केल्यास संबंधित शेतकरी लाभापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. योजनेमध्ये पारदर्शकता आणणे, गळती रोखणे आणि केवळ खऱ्या व जिवंत लाभार्थीपर्यंतच शासनाचे अर्थसाहाय्य पोहचवणे हा या मोहिमेमागचा मुख्य उद्देश आहे.

### जिल्ह्यातील शोध व बचाव पथकांचे प्रशिक्षण



**अकोला :** जिल्हा आपत्ती व्यवस्थापन शोध व बचाव पथकाचे प्रशिक्षण काटेपूर्णा प्रकल्प येथे आज झाले. आगामी मान्सूनकाळ लक्षात घेता पथकांचे प्रशिक्षण व साधनसामग्री तत्काळ उपलब्ध करून निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिले होते. त्यानुसार तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या उपस्थितीत प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. बार्शीटाकळीचे तहसीलदार रवींद्र कापशीकर, गटविकास अधिकारी श्री. मोरे उपस्थित होते. नागपूर येथील राज्य आपत्ती प्रतिसाद पथकाचे डी. जे, दाते, ए. ए. सिकंदर , डी.व्ही. काळे यांचे जिल्हा पथकाला मार्गदर्शन केले.

अकोला, मूर्तिजापूर, बार्शीटाकळी, पातुर, बाळापूर तालुक्यातील पोलीस, होमगार्ड, अग्निशमन विभाग कर्मचारी, तलाठी, ग्रामसेवक, स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी, आपदा मित्र यांनी प्रशिक्षणात सहभाग घेतला. पूरस्थिती निवारण शोध व बचाव प्रथमोपचार, आधुनिक बचाव साहित्य ,बोट प्रशिक्षण व प्रात्यक्षिक आदींची माहिती प्रशिक्षणात देण्यात आली. पुढील मान्सुन कालावधीच्या अनुषंगाने विविध स्तरावरील घटक प्रशिक्षित असावेत यासाठी हे प्रशिक्षण महत्वाचे ठरले.

**Change In Name**

I Have Change My Name From
BHARTI ASHOKLAL KATARIYA
-TO-
GAURI TEJURAM MANGHWANI
DOB - 10/07/1982 My Residential Address is - Sindhi Camp Akot Akola Maharashtra 444101.

**तहसिलदार यांचे न्यायालय, अकोला**

रामाक्र.एम.आर.सी-८१/अकोला/ /२०२५-२६

**जाहीरनामा**

याव्दारे सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार जन्म - मृत्यु नोंदणी करीता अर्जदार विवेक रमेश गोतमारे, रा. गोडबोले प्लॉट, जूने शहर, अकोला, ता. अकोला यांच्या मुलाचा जन्म अकोला येथे दिनांक १९.११.२०२३ रोजी झाला असुन त्याच्या जन्माची नोंद अकोला महानगरपालिका अकोला येथे नजर चुकीने करण्यात आली नाही, करिता अर्जदार यांनी त्याच्या जन्माची नोंद घेण्याकरीता आदेश होणेबाबत निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी विभाग, अकोला महानगरपालिका, अकोला येथे विनंती अर्ज सादर केला आहे.

यानुसार, विवेक रमेश गोतमारे, रा. गोडबोले प्लॉट, जूने शहर, अकोला, ता. अकोला यांचा मुलगा हृदांत विवेक गोतमारे याच्या जन्माची नोंद घेण्याकरिता कोणाला काही आक्षेप / हितसंबंध असतील त्यांनी आपले आक्षेप / हरकत अर्ज हया कार्यालयात जाहिरनामा प्रसिध्दी पासुन सुट्टीचे दिवस वगळुन पंधरा दिवसांचे आत कार्यालयीन वेळेत या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावे, विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले आक्षेप / हरकती विचारात घेतल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.

स्थळ : अकोला
दिनांक : ०२.०६.२०२६

(शिक्का)

तहसिलदार,
अकोला

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १७९
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

---

## लग्नाच्या वाढदिवसानिमित्त गरजू मुलांना कपड्यांचे वाटप

### माजी जि.प. सदस्य शंकरराव इंगळे यांचा समाजाभिमुख उपक्रम

■ प्रतिनिधी | अकोला ■



वैयक्तिक आनंदाचे क्षण समाजोपयोगी कार्यातून साजरे करण्याचा आदर्शवत उपक्रम माजी जिल्हा परिषद सदस्य शंकरराव इंगळे यांनी राबविला. आपल्या लग्नाच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी सपत्निक अकोला येथील राष्ट्रसंत भय्यूजी महाराज प्रणित सुर्योदय बालगृहातील गरजू मुलांना नवीन कपड्यांचे वाटप करून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविला.

सामाजिक बांधिलकी जपत समाजातील वंचित व गरजू घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी बालगृहातील मुलांना नवीन कपड्यांचे वितरण करण्यात आले. नवीन कपडे मिळाल्याने मुलांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंदाचे भाव दिसून येत होते.

याप्रसंगी बोलताना शंकरराव इंगळे यांनी वैयक्तिक आनंद साजरा करण्याबरोबरच समाजातील गरजू व्यक्तींना मदत करण्याची भावना प्रत्येकाने जोपासली पाहिजे, असे मत व्यक्त केले. अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक संदेश जात असून सामाजिक जाणीव अधिक दृढ होत असल्याचे त्यांनी सांगितले. या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस यांसारखे वैयक्तिक आनंदाचे क्षण सामाजिक कार्यातून साजरे करण्याची प्रेरणा या उपक्रमातून मिळत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. या उपक्रमामुळे मानवता, सामाजिक उत्तरदायित्व आणि सेवाभावाचा संदेश समाजात पोहोचला.

---

## माहिती आयोगाच्या आदेशानंतरही माहिती रखडली

### तेल्हारा कृषी अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस

- दोन वर्षांपासून माहिती न मिळाल्याने प्रश्नचिन्ह
- जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांची कारवाई

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

माहिती अधिकार कायद्यांतर्गत मागविण्यात आलेली माहिती राज्य माहिती आयोगाच्या आदेशानंतरही उपलब्ध करून देण्यात आली नसल्याच्या प्रकरणात तेल्हारा तालुका कृषी अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, अकोला यांनी सात दिवसांत खुलासा सादर करण्याचे निर्देश दिल्याने कृषी विभागात या प्रकरणाची चर्चा सुरू झाली आहे.

तक्रारदार सागर विनायकराव देशमुख यांनी तूर व हरभरा पिकांसाठी करण्यात आलेल्या कीटकनाशके व औषध वाटपाबाबतची माहिती, लाभार्थ्यांची यादी तसेच संबंधित कृषी सहाय्यकांचे अहवाल मागितले होते. या संदर्भात राज्य माहिती आयोगाच्या अमरावती खंडपीठाने १८ ऑक्टोबर २०२४ रोजी आदेश देत मागितलेली माहिती विनामूल्य उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले होते.

विशेष म्हणजे आयोगाने या प्रकरणात सार्वजनिक अंकेक्षण (पब्लिक ऑडिट) करण्याची नोंदही आदेशात केली होती. मात्र त्यानंतरही माहिती अर्जदाराला प्राप्त झाली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

माहिती आयोगाच्या आदेशानंतरही दीर्घकाळ माहिती उपलब्ध न झाल्यामुळे आदेशाची अंमलबजावणी का झाली नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाने याची दखल घेत तालुका कृषी अधिकाऱ्यांकडून स्पष्टीकरण मागविले आहे.

नोटीसमध्ये आयोगाच्या आदेशाचे पालन करण्यात विलंब का झाला आणि अर्जदाराला मागितलेली माहिती अद्याप का देण्यात आली नाही, याबाबत खुलासा करण्यास सांगण्यात आले आहे.

#### माहिती न देण्यामागे नेमके कारण काय?

*माहिती अधिकार कायद्याचा उद्देश प्रशासनातील पारदर्शकता वाढविणे हा आहे. अशा परिस्थितीत आयोगाच्या आदेशानंतरही माहिती उपलब्ध न झाल्याने विविध स्तरांवर चर्चा सुरू झाली आहे. लाभार्थी निवड प्रक्रिया, औषध वाटप किंवा योजनांच्या अंमलबजावणीसंदर्भातील बाबींची माहिती देण्यात विलंब का झाला, याबाबतही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. तथापि, यासंदर्भात कोणतीही अधिकृत अनियमितता अद्याप सिद्ध झालेली नाही. संबंधित अधिकाऱ्यांच्या खुलाशानंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होण्याची शक्यता आहे.*

#### पारदर्शकतेची गरज

*माहिती अधिकार कायद्याअंतर्गत माहिती वेळेत उपलब्ध करून देणे ही संबंधित कार्यालयाची जबाबदारी मानली जाते. त्यामुळे या प्रकरणात नेमका विलंब का झाला, याबाबत स्पष्टता येणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.षजिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाकडून मागविण्यात आलेल्या खुलाशानंतर पुढील प्रशासकीय निर्णय होण्याची शक्यता असून, या प्रकरणाकडे आता तालुक्यासह जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.*

---

## गॅसच्या ऐवजी सिलेंडरमध्ये पाणी!

### पातूरमध्ये ग्राहकाची फसवणूक उघड

■ प्रतिनिधी | पातूर ■




पातूर शहरात घरगुती गॅस ग्राहकाची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.पातुर येथील घटना आहे. इंडियन गॅस एजन्सी दुकानदाराकडुन इंडियन गॅस कंपनीचा सिलेंडर घेतल्यानंतर काही वेळातच गॅस संपल्याचे लक्षात आल्याने ग्राहकाने सिलेंडरची तपासणी केली असता त्यामध्ये गॅसच्या ऐवजी पाणी भरलेले असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून ग्राहकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.मिळालेल्या माहितीनुसार,पातूर येथील एका ग्राहकाने नियमितप्रमाणे घरगुती वापरासाठी इंडियन गॅसचा सिलेंडर घेतला होता. सिलेंडर जोडून वापर सुरू केल्यानंतर अत्यल्प वेळात गॅस संपल्यासारखी स्थिती निर्माण झाली.त्यामुळे संशय आल्याने ग्राहकाने सिलेंडरची तपासणी केली असता त्यामध्ये मोठ्या प्रमाणात पाणी असल्याचा दावा करण्यात आला.यानंतर संबंधित ग्राहकाने गॅस वितरकाकडे तक्रार नोंदवून घटनेची चौकशी करण्याची मागणी केली आहे.या प्रकारामुळे ग्राहकांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण झाला आहे.गॅस सिलेंडरमध्ये कोणत्याही प्रकारची छेडछाड झाल्यास गंभीर दुर्घटना घडू शकते.त्यामुळे संबंधित यंत्रणांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी,अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.दरम्यान,या प्रकरणात नेमके पाणी कसे आले,ते भरण्याची चूक कुठे झाली किंवा सिलेंडरमध्ये छेडछाड झाली का,याबाबत अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही.मात्र,संबंधित अधिकाऱ्यांनी या घटनेकडे गांभीर्याने लक्ष देऊन सत्य परिस्थिती जनतेसमोर आणावी,अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

---

## डॉ. आनंदीबाई जोशी मुलींचे आयटीआय येथे प्रवेश सुरू

■ प्रतिनिधी | अकोला ■

महिलांना कौशल्याधारित व रोजगाराभिमुख प्रशिक्षण देणा-या अकोल्यातील डॉ. आनंदीबाई जोशी मुलींचे आयटीआय येथे प्रवेशप्रक्रिया सुरू झाली आहे.

केवळ महिलांसाठी असलेल्या या संस्थेत महिला सक्षमीकरणासाठी अनेकविध प्रशिक्षण कार्यक्रम राबवले जात आहेत. अभ्यासक्रमाबरोबरच निवासासाठी स्वतंत्र वसतिगृह, ग्रंथालय, दरमहा ५०० रुपये विद्यार्थीवेतन व इतर सोयी-सुविधा दिल्या जात आहेत. येथेवयोमर्यादेचे कोणतेही बंधन नसल्यामुळे सर्व वयोगटातील महिलांना कौशल्याधारित शिक्षण घेण्याची सुवर्णसंधी उपलब्ध आहे. कॉम्प्युटर ऑपरेटर, कॉस्मेटॉलॉजी, ड्रेस मेकिंग, फॅशन डिझाईन, बेकर अँड कन्फेक्शनर, फ्रूट्स अँड व्हेजिटेबल प्रोसेसिंग, सेक्रेटरिअल प्रॅक्टिस आणि



इंजिनिअरिंग अंतर्गत आयसीटीएसएम, आयडीडी व इलेक्ट्रिकल मेकॅनिक या ट्रेड्सचे प्रशिक्षण दिले जाते. या अभ्यासक्रमांमुळे महिलांना रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या अनेक उत्तम संधी उपलब्ध होणार आहेत. इच्छुक उमेदवारांनी मनकर्णा प्लॉट, श्री शिवाजी महाविद्यालय मार्ग, अकोला येथील संस्थेशी थेट संपर्क साधून आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी या विनामूल्य प्रवेश प्रक्रियेचा लाभ घ्यावा.

---

## 8 जून रोजी कृषी विद्यापीठ मैदानात साजरा होणार महायोगोत्सव

### शंभर दिवसीय राष्ट्रीय योग महोत्सवाचा तेरावा दिवस महानगराला अर्पण

■ प्रतिनिधी | अकोला ■

मानवी आरोग्याचे सूत्र योगात सामावले असून साऱ्या जगाने योगाचे महत्त्व ओळखून योगाला आत्मसात करने सुरू केले आहे.भारताची ही मोठी देन जागतिक स्तरावर प्रत्येक देशाने आत्मसात करणे सुरू केली असून संयुक्त राष्ट्र संघाने ही भारताच्या पुढाकाराने २१ जून हा दिन आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून सुरू केला आहे.त्या अनुषंगाने येणाऱ्या २१ जून रोजी बारावा आंतरराष्ट्रीय योग दिवस आपण साजरा करीत आहोत.

आयुष मंत्रालयाने राष्ट्रीय स्तरावर या बाराव्या आंतरराष्ट्रीय योग दिवसाची जोमाने तयारी सुरू केली असून हा शंभर दिवशीय योग महोत्सव राष्ट्रातील विविध जिल्ह्यात सुरू झाला आहे.या शंभर दिवसातील तेरावा दिवस हा महाराष्ट्र राज्यातील अकोला जिल्ह्याला बहुमानाच्या रूपाने मिळाला आहे. त्या अनुषंगाने मोरारजी देसाई नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ योगा, आयुष मंत्रालय भारत सरकार व योग फाउंडेशन संचालित महाराष्ट्र योग शिक्षक संघाच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ८ जून रोजी सकाळी ६ वाजता डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या दिक्षांत सभागृहात सर्व अकोलेकर नागरीकांसाठी मोफत भव्य योग महोत्सव आयोजित करण्यात आला असल्याची माहिती महाराष्ट्र योग शिक्षक संघाच्या वतीने गुरुवारी शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत महाराष्ट्र योग शिक्षक संघाचे जिल्हा अध्यक्ष डॉ. उल्हासराव मोकळकर यांनी दिली.यावेळी



योगशिक्षक संघाचे अमरावती विभाग प्रमुख डॉ चंद्रकांत अवचार, महासचिव श्रीधर मेतकर, कोषाध्यक्ष किशोर गावंडे उपस्थित होते. अनेक वर्षांपासून राज्यभर योग प्रशिक्षण देणाऱ्या महाराष्ट्र योग शिक्षक संघाच्या वतीने आयोजित हा योग महोत्सव कृषी विद्यापीठ मैदानात सकाळी ६ ते सकाळी ८ वाजेपर्यंत राहणार आहे. यामध्ये योग प्रांगणात उपस्थित साधकांची नाव नोंदणी करण्यात येणार आहे. महिला, पुरुष,युवक,युवती साधकांनी सोबत चटई अथवा मॅट घेऊन मैदानात उपस्थित रहावे.यावेळी ख्यातनाम योग तज्ञ प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनात योगातील अवघड आसनांचे प्रात्यक्षिक साधकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच या महोत्सवात जागतिक योग दिनाचा प्रोटोकॉल ही पाळण्यात येणार आहे.

## संक्षिप्त

### संत भीकाजी महाराजांच्या चरणी हजारो भाविक नतमस्तक

**आष्टा(पुलगाव)-** अधिकमासाच्या पावन पर्वात आष्टा येथील संत भीकाजी महाराजांच्या दर्शनासाठी गुरुवारी हजारो भाविकांनी



एकच गर्दी केली. श्रद्धा, भक्ती आणि अध्यात्माचा संगम अनुभवण्यासाठी विदर्भासह महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेल्या सुमारे सात ते आठ हजार भक्तांनी संतांच्या चरणी माथा टेकवत दर्शनाचा लाभ घेतला. हिंदू संस्कृतीत अधिकमासाला विशेष धार्मिक महत्त्व आहे. या काळात तीर्थस्नान, जप-तप आणि संतदर्शनाला विशेष पुण्यप्राप्ती मानली जाते. वर्धा नदीच्या पवित्र तीरावर वसलेले आष्टा येथील संत भीकाजी महाराजांचे तीर्थक्षेत्र हे भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र बनले आहे. अधिकमासातील पंचमीला आलेल्या गुरुवारामुळे यंदा येथे भक्तांचा अभूतपूर्व जनसागर लोटला.पहाटेपासूनच भाविकांनी वर्धा नदीच्या पवित्र जलात स्नान करून संत भीकाजी महाराजांचे दर्शन घेतले. फुलमाळा, शाल-श्रीफळ, प्रसाद अर्पण करून आपल्या मनोकामना व्यक्त केल्या. अनेक भक्तांनी महाराजांना साक्षात ईश्वराचे स्वरूप मानत त्यांच्या चरणी कृतज्ञतेची व भक्तीची भावना अर्पण केली.मंदिर समिती, सेवेकरी व स्वयंसेवकांनी उत्कृष्ट नियोजन करत दर्शन, प्रसाद व अन्य सुविधांची सुयोग्य व्यवस्था केली. नागपूर, अमरावती, वर्धा, गडचिरोलीसह विविध जिल्ह्यांतून आलेल्या भाविकांनी दर्शन घेतल्यानंतर समाधान व्यक्त केले.दररोजप्रमाणे पाच आरत्यांनंतर सर्व भक्तांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. भक्तिभावाने ओथंबलेल्या या वातावरणात संत भीकाजी महाराजांच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. अधिकमासातील हा सोहळा श्रद्धा, विश्वास आणि अध्यात्मिक ऊर्जेचा अविस्मरणीय उत्सव ठरला.

### सासू-सासरे राहायला आल्याने पत्नीला मारहाण

**समुद्रपूर-**कौटुंबिक वादातून पत्नीला कुऱ्हाडीच्या दांड्याने मारहाण केल्याची घटना शेंडगाव येथे घडली. या घटनेत आरती उईके (२८) या महिला जखमी झाल्या असून त्यांच्यावर उपचार करण्यात आले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,आरती उईके यांच्या आई-वडिलांचा मुक्काम त्यांच्या घरी असल्याने पती विनोद उईके याला त्याचा राग होता. याच कारणावरून दोघांमध्ये वाद निर्माण झाला. वादाचे रूपांतर हाणामारीत होत विनोद उईके याने कुऱ्हाडीच्या दांड्याने पत्नीला मारहाण केली. या मारहाणीत आरती उईके जखमी झाल्या. घटनेनंतर त्यांनी समुद्रपूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी पतीविरुद्ध गुन्हा नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

### प्रसूतीदरम्यान विवाहितेचा दुर्दैवी मृत्यू

**हिंगणघाट -** प्रसूतीसाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या विवाहितेचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना हिंगणघाट येथे घडली. करीश्मा नन्नावरे (२९, रा. माना, जि. चंद्रपूर) असे मृत महिलेचे नाव आहे. कुटुंबीयांनी प्रसूतीसाठी त्यांना हिंगणघाट येथील खासगी रुग्णालयात दाखल केले होते. डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू असताना प्रसूतीदरम्यान त्यांची प्रकृती अचानक खालावली. वैद्यकीय प्रयत्नांनंतरही त्यांना वाचविण्यात यश आले नाही. या घटनेमुळे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी रुग्णालयात भेट देऊन आवश्यक नोंदी केल्या. याप्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील चौकशी सुरू केली आहे.

### दोन दुचाकींच्या धडकेत वृद्धाचा मृत्यू

**आवी-**दोन दुचाकींच्या भीषण धडकेत एका वृद्धाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना मोहन गार्डन हॉटेलसमोर घडली. या अपघातात राजेश देशमुख (६३, रा. नांदपूर) यांचा जागीच मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, राजेश देशमुख हे नेहमीप्रमाणे दुचाकीने कामावर जात होते. त्यावेळी समोरून येणाऱ्या एमएच-३२ एआर-६८४१ क्रमांकाच्या दुचाकीने त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी होती की देशमुख गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने उपचारासाठी हलविण्यात आले; मात्र डॉक्टरांनी मृत घोषित केले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. पोलिसांनी अपघाताची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

# 'विकास'चा उड्डाणपूल की भ्रष्टाचाराचा खड्डा

## सहा वेळा भगदाडे पडूनही प्रशासन ढिम्म

## मृत्यूचे तांडव झाल्यावरच जाग येणार का-खा.अमर काळे

**हिंगणघाट/जनमाध्यम**

हिंगणघाटच्या नांदगाव चौकातील तब्बल १०० कोटी रुपयांचा उड्डाणपूल सध्या विकासापेक्षा भ्रष्टाचाराच्या चर्चेचा विषय ठरत आहे. शहराच्या सौंदर्यीकरणाचे स्वप्न दाखवणारा हा पूल आता जनतेच्या जीवाशी खेळणारा 'मृत्यूचा महामार्ग' बनल्याचा संताप व्यक्त होत आहे. अवघ्या काही वर्षांत या पुलावर तब्बल सहा वेळा मोठमोठी भगदाडे पडल्याने प्रशासनाच्या कारभारावर आणि लोकप्रतिनिधींच्या विकासाच्या दाव्यांवर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

खा.अमर काळे यांनी या संपूर्ण प्रकरणावर थेट हल्लाबोल करत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि संबंधित शासकीय यंत्रणेला जाब विचारला आहे. हा पूल आहे की जनतेसाठी उभारलेला मृत्यूचा सापळा असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.विशेष म्हणजे, पुलाचे काम पूर्ण होण्याआधीच वारंवार भगदाडे पडत असताना प्रशासनाने केवळ मलमपट्टी करण्याचे काम केले. जनतेच्या जीवित सुरक्षेचा प्रश्न



निर्माण झाला असताना दोषी कंत्राटदारांवर कारवाई करण्याऐवजी त्यांना अभय देण्यात आले का, अशी चर्चा आता शहरभर रंगली आहे.हिंगणघाटकरांच्या कराच्या पैशातून उभारलेला हा पूल जर दोन वर्षांतच ढासळत असेल, तर कामाच्या गुणवत्तेवर देखरेख करणारे अधिकारी नेमके कोणाच्या सेवेत होते? जनतेच्या की कंत्राटदारांच्या? असा बोचरा प्रश्न नागरिक विचारत आहेत.विकासाच्या नावाने मोठमोठे फलक झळकवणारे आणि उद्घाटनांचे नारळ फोडणारे नेते आता कुठे आहेत, पुलावर सहा वेळा भगदाडे पडली, वाहतूक वारंवार बंद झाली, नागरिकांनी तक्रारी केल्या; मात्र प्रशासनाने त्या केराच्या टोपलीत टाकल्या. यावरून जनतेच्या सुरक्षेपेक्षा ठेकेदारांच्या हिताचे राजकारण अधिक महत्त्वाचे असल्याचा आरोप होत आहे.रात्रीच्या अंधारात पुलावर लखलखणारे दिवे लावून विकासाचे चित्र रंगवता येईल; पण त्या प्रकाशात निकृष्ट कामे आणि भ्रष्टाचाराचे डाग लपवता येणार नाहीत. भगदाडांनी पुलाचेच नव्हे तर विकासाच्या घोषणांचेही वस्त्रहरण केले आहे.खा. अमर काळे यांनी या पुलाचे स्वतंत्र तांत्रिक ऑडिट करून तो वाहतुकीस सुरक्षित आहे की नाही याची खातरजमा करण्याची मागणी केली आहे. तोपर्यंत पुलावरील वाहतूक बंद ठेवावी, दोषी कंत्राटदारांना कायमस्वरूपी काळ्या यादीत टाकावे आणि कामावर देखरेख करणाऱ्या बेजबाबदार अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी जोरदार मागणी त्यांनी केली.

# रेल्वे स्टेशन पार्किंगमधून चोरलेली पल्सर जप्त

## रामनगर पोलिसांची धडाकेबाज कारवाई

**वर्धा/जनमाध्यम**

रेल्वे स्टेशनसमोरील पार्किंगमधून चोरीस गेलेली मोटारसायकल अवघ्या तपासाच्या जोरावर शोधून काढत रामनगर पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने एका सराईत चोरट्याला अटक केली आहे. या कारवाईमुळे शहरातील वाहनचोरीच्या घटनांवर अंकुश बसण्यास मदत होणार आहे.

फिर्यादी हर्षद लिलाधरराव बांगरे यांच्या मालकीची बजाज पल्सर (एमएच-३२ एडी-८९८२) ही दुचाकी रेल्वे स्टेशनसमोरील पार्किंगमधून चोरीस गेली होती. याप्रकरणी रामनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचा तपास सुरू असताना गुन्हे शोध पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे राहुल दशरथ जाधव (१९, रा. वडार झोपडपट्टी, आर्वी नाका, वर्धा) याला ताब्यात घेण्यात आले.सखोल चौकशीत आरोपीने रेल्वे स्टेशन परिसरातून दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी पंचांसमक्ष सुमारे २५ हजार रुपये किमतीची चोरीस गेलेली पल्सर मोटारसायकल जप्त करून गुन्ह्याचा उलगडा केला.ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक पौर्णिमा राखोंडे यांच्या निर्देशानुसार पो.हवा. गजानन इवनाथे, दीपक गेडे तसेच गुन्हे प्रगटीकरण पथकातील अजहर खान, सचिन पवार, राहुल भोयर आणि रुपेश उगेमुगे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली. वाहनचोराला जेरबंद केल्याबद्दल रामनगर पोलिसांचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

### वृद्धाची गळफास घेऊन आत्महत्या

**वर्धा -** जऊळगाव येथे एका वृद्धाने स्वतःच्या राहत्या घरी गळफास घेऊन जीवन संपवल्याची घटना समोर आली आहे. राजेंद्र निकुडे (६१) असे मृताचे नाव असून या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. कुटुंबीयांना घरात राजेंद्र निकुडे गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आले. त्यानंतर त्यांना खाली उतरविण्यात आले; मात्र तोपर्यंत त्यांचा मृत्यू झाला होता. घटनेची माहिती मिळताच सेवाग्राम पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. आत्महत्येमागील कारण स्पष्ट होऊ शकले नसून पोलिसांकडून विविध अंगांनी तपास केला जात आहे.

### हळद उकळण्याची ट्रॉली चोरी

**समुद्रपूर-**जाम-चंद्रपूर महामार्गावरील बंद असलेल्या ए.एस. अॅग्री अॅण्ड अवा एलएलपी कंपनीतून अज्ञात चोरट्यांनी हळद उकळण्याची ट्रॉली मशीन चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या चोरीमुळे परिसरात खळबळ उडाली असून कंपनीच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कंपनी २०२३ पासून बंद असल्याचा फायदा घेत चोरट्यांनी हा डाव साधल्याचे बोलले जात आहे. चोरट्यांनी सुमारे १ लाख ५० हजार रुपये किमतीची हळद उकळण्याची ट्रॉली मशीन लंपास केली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली.

# शिवपांधण रस्ता बंद; ३० शेतकरी अडचणीत

## जुनोना-बोडसूला मार्गावरील वहिवाट खुली करण्यासाठी तहसीलदारांकडे धाव

**चानकी कोपरा/जनमाध्यम**

जुनोना ते बोडसूला या शिवपांधण रस्त्याची वहिवाट पूर्णपणे बंद झाल्याने परिसरातील २५ ते ३० शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत. शेतीकडे जाणारा हा महत्त्वाचा मार्ग बंद झाल्यामुळे शेतकऱ्यांसमोर शेतीची कामे करण्याचे संकट उभे ठाकले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, रस्त्याच्या मधोमध मोठी झाडे उगवली असून अनेक ठिकाणी खोल खड्डे पडल्याने मार्गाची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. परिणामी रस्त्यावरून वाहतूक करणे अशक्य झाले आहे. आतापर्यंत शेतकरी शेजारील शेतातून तात्पुरती वहिवाट करून आपल्या शेतात ये-जा करत होते. मात्र, आता त्या शेतामध्ये पीक घेण्यात आल्याने पर्यायी मार्गही बंद झाला आहे.यामुळे जुनोना व बोडसूला येथील शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी कोणताही मार्ग उपलब्ध नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे. अनेकदा प्रशासनाकडे पाठपुरावा करूनही प्रश्न मार्गी लागला नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी शेतकऱ्यांनी सेलू तहसीलदारांना निवेदन सादर करून शिवपांधण रस्ता तातडीने मोकळा करून वहिवाट सुरू करण्याची मागणी केली. अन्यथा शेतीची कामे ठप्प होऊन आर्थिक नुकसान सहन करावे लागेल, असा इशाराही शेतकऱ्यांनी दिला.यावेळी शंकर कांबळे, शंकर गावंडे, विलास कांबळे, रमेश कुठे, मिलिंद बुटे, अंजना गावंडे, आनंद गावंडे, संगीता कांबळे, प्रदीप सुरवाडे, पुरुषोत्तम ढोटे यांच्यासह सुमारे २५ शेतकरी उपस्थित होते. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून शेतकऱ्यांच्या अडचणी दूर कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

# विषमुक्त शेतीचा संकल्प

## वाबगावात दशपर्णी अर्क प्रात्यक्षिकाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**विजयगोपाल/जनमाध्यम**

देवळी तालुक्यातील मौजा वाबगाव येथे कृषी विभाग, पाणी फाउंडेशन आणि उमेद जीवन ज्योती अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने फार्मर कप उपक्रमांतर्गत दशपर्णी अर्क प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले. आकाश महिला शेतकरी गटाच्या माध्यमातून दशपर्णी अर्क तयार करून शेतकऱ्यांनी विषमुक्त व सेंद्रिय शेतीचा संकल्प केला.



तालुका कृषी अधिकारी निलेश इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली गावात कृषी जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. यावेळी मंडळ कृषी अधिकारी कु. प्रतीक्षा मेंढे यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत सेंद्रिय शेतीचे महत्त्व आणि रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे होणारे दुष्परिणाम याविषयी मार्गदर्शन केले.उपकृषी अधिकारी प्रशांत भोयर यांनी पेरणीपूर्वी बियाण्याची उगवण क्षमता तपासणी करण्याचे महत्त्व पटवून दिले.

तसेच 'एल निनो'मुळे हवामानात होणारे बदल आणि त्याचा शेतीवर होणारा परिणाम याबाबत माहिती दिली. कृषी सेवक किरण धवणे यांनी उत्पादनवाढीसाठी बीबीएफ (ब्रॉड बेड फरो) पेरणी तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे फायदे शेतकऱ्यांना समजावून सांगितले.या उपक्रमात आकाश महिला शेतकरी गटाच्या सदस्या प्रमिला चोरे, प्रीती भोयर यांच्यासह परिसरातील महिला शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कृषी ताई मेघा घोडे यांनी केले. ग्रामीण भागात सेंद्रिय व शाश्वत शेतीचा संदेश देणारा हा उपक्रम ठरला.

### फोनवर बोलावून युवकावर कटरने हल्ला

**हिंगणघाट -** फोन करून नियोजित ठिकाणी बोलावलेल्या युवकावर कटरने वार करून जखमी केल्याची घटना नंदोरी चौकातील मिलिंद सोसायटी परिसरात घडली. या हल्ल्यात साहील शेंडे (२०, रा. संत तुकडोजी वॉर्ड) जखमी झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, निशांत रिठेकर याने साहीलला फोन करून भेटण्यासाठी बोलावले होते. साहील तेथे पोहोचल्यानंतर त्याला तन्मयला फोन करून बोलावण्यास सांगण्यात आले. मात्र साहीलने त्यास नकार दिल्याने दोघांमध्ये वाद झाला. संतापलेल्या निशांतने जवळील कटरने साहीलवर वार केल्याचा आरोप आहे. या हल्ल्यात साहील जखमी झाला. तक्रारीवरून हिंगणघाट पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# जातभेदाला छेद; म.अनिसच्या पुढाकाराने आंतरजातीय प्रेमीयुगुलाचा सत्यशोधकी विवाह



**वर्धा/जनमाध्यम**


समाजातील जात, धर्म आणि रूढीपरंपरांच्या भिंती ओलांडत प्रेमाला मानवतेची साथ देणारा एक प्रेरणादायी विवाह सोहळा वर्ध्यात पार पडला. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या (म.अनिस) जिल्हा व शहर शाखेच्या पुढाकाराने राम नारायणराव टेकाम आणि भावणा नामदेवराव राऊत (रा. परसोडी टेंभरी, ता. आर्वी) या आंतरजातीय प्रेमीयुगुलाचा ७८ वा सत्यशोधकी विवाह वर्धन हाट झुणका-भाकर केंद्राच्या सभागृहात कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून झाला.

एकाच गावात राहणाऱ्या राम आणि भावणा यांची ओळख मैत्रीतून प्रेमात बदलली. मात्र दोघेही वेगवेगळ्या आदिवासी समाजातील असल्याने विवाहाला मुलीच्या कुटुंबाकडून तीव्र विरोध झाला. समजावणी, दबाव आणि विविध प्रयत्नांनंतरही दोघांनी विवाहाचा निर्धार कायम ठेवला. अखेर कामगार नेते कॉ. यशवंत झाडे यांच्या माध्यमातून म.अनिसचे राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार यांच्याशी संपर्क साधण्यात आला. त्यांनी दोघांचे समुपदेशन करून विवाहास सहकार्य केले.

महात्मा ज्योतिबा फुले यांनी सुरू केलेल्या सत्यशोधक परंपरेनुसार कोणतेही धार्मिक कर्मकांड न करता हा विवाह लावून देण्यात आला. यावेळी गजेंद्र सुरकार,मोहन खैरकार,गुड्डू देशमुख,डॉ. मंजुषा देशमुख-वरफडे, कॉ. यशवंत झाडे, दुर्गा काकडे, भैय्याजी देशकर तसेच रामचे आई-वडील उपस्थित होते.विवाह विधी संजय भगत, प्रकाश कांबळे, वैशाली पांडे, अशोक हेडावू, नंदा नरांजे व रजनी सुरकार यांनी पार पाडले. प्रास्ताविक सुनील ढाले यांनी तर आभार प्रदर्शन प्रकाश कांबळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाहिद अली, कल्पना हेडावू, सी.झेड. घवघवे, सुनील घिमे,कांचन हिंगे, विवेक कामडे, निखिल जवादे, मोना गुळघाणे व दिलीप गुळघाणे यांनी परिश्रम घेतले.

# नवीन ठाणेदार रुजू होताच अवैध धंदेवाल्यांवर वज्रप्रहार

## देवळीत सहा दिवसांत २६ गुन्हे



**देवळी-** नवीन ठाणेदार संदीप कापडे यांनी पदभार स्वीकारताच देवळी परिसरातील अवैध धंदेवाल्यांवर कारवाईचा धडाका लावला आहे. अवघ्या सहा दिवसांत दारू माफिया, जुगार अड्डे चालक आणि गुंड प्रवृत्तीच्या इसमांविरुद्ध २६ गुन्हे दाखल करून २२ लाख रुपयांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याने अवैध धंदे करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

वायगाव, रोहणी, अंदोरी आणि देवळी परिसरात राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत गावठी मोहा दारू गाळणे, विक्री करणे तसेच देशी-विदेशी दारूचा अवैध व्यापार करणाऱ्यांविरोधात २३ गुन्हे दाखल करण्यात आले.

तर जुगार अड्ड्यांवर धाड टाकून तीन गुन्ह्यांची नोंद करण्यात आली.याशिवाय गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींविरोधात तडीपारीची कारवाईही वेगाने सुरू असून आणखी पाच प्रस्ताव तयार करण्यात येत आहेत. नवीन ठाणेदारांच्या या आक्रमक भूमिकेमुळे देवळीतील अवैध धंदेवाल्यांचे आर्थिक गणित कोलमडले असून कायद्याचा धाक पुन्हा निर्माण झाल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे.

# शाश्वत आणि समृद्ध भविष्याकडे महावितरणची दमदार वाटचाल

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त हरित महाराष्ट्र घडविण्याचा निर्धार

**वर्धा/जनमाध्यम**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून महावितरणने 'आपली जमीन, आपले भविष्य' हा संदेश देत पर्यावरण संवर्धन आणि हरित ऊर्जेच्या प्रसारासाठी आपल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला आहे. महाराष्ट्राच्या विकासाची ऊर्जा असलेल्या महावितरणने आता केवळ वीजपुरवठादार न राहता पर्यावरण रक्षणासाठीही आघाडीची भूमिका स्वीकारली आहे.




मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत राज्यातील सुमारे दोन हजार कृषी वाहिन्यांचे सौर ऊर्जीकरण पूर्ण झाले असून १० लाखांहून अधिक शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा उपलब्ध झाला आहे. या योजनेतून ६५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाली असून ग्रामीण भागात ७० हजारांपेक्षा अधिक रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत.'प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना' अंतर्गत राज्यातील ६ लाख १६ हजारांहून अधिक घरांवर छतावरील सौर प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. त्यामुळे अनेक कुटुंबांचे वीजबिल शून्यावर आले आहे. याशिवाय राज्यात १० लाखांहून अधिक सौर कृषीपंप कार्यान्वित करून महावितरणने देशात नवा विक्रम प्रस्थापित केला आहे.महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वाखाली २०३० पर्यंत ३८ हजार मेगावॅट हरित ऊर्जेसह एकूण ४५ हजार मेगावॅट विजेची भर घालण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यामुळे राज्यातील नवीकरणीय ऊर्जेचा वाटा १३ टक्क्यांवरून ५२ टक्क्यांपर्यंत वाढणार असून पुढील पाच वर्षांत वीज खरेदीत तब्बल ८२ हजार कोटी रुपयांची बचत होण्याची अपेक्षा आहे.पर्यावरण संरक्षणासाठी महावितरणने 'गो-ग्रीन' उपक्रमांतर्गत कागदविरहित बिलिंगला प्रोत्साहन दिले असून ५१ लाखांहून अधिक ग्राहकांनी याचा लाभ घेतला आहे. तसेच राज्यभर ११ हजारांपेक्षा अधिक ई-वाहन चार्जिंग स्टेशन कार्यरत आहेत. ऊर्जा बचत, एलईडीचा वापर आणि वृक्षारोपण यावरही विशेष भर दिला जात आहे. आज जागतिक पर्यावरण दिनानिमित्त नागरिकांनी सौर ऊर्जेचा स्वीकार करावा, वीज बचतीची सवय लावावी आणि किमान एक वृक्ष लावून त्याचे संवर्धन करावे, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे. 'हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र' हे स्वप्न साकार करण्यासाठी महावितरणची ही हरित वाटचाल भविष्यातील पिढ्यांसाठी प्रदूषणमुक्त आणि उज्ज्वल भविष्य घडविणारी ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १८८**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# मेळघाट व अचलपूर विधानसभा मतदारसंघातील पाणीटंचाईवर बच्चू कडूंचे ठिय्या आंदोलन

**अमरावती/प्रतिनिधी :-** अचलपूर विधानसभा मतदारसंघासह मेळघाटातील नागरिकांना प्रशासकीय दिरंगाई आणि यंत्रणेच्या निष्काळजीपणामुळे पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहण्याची वेळ येत असल्याचा आरोप करत आमदार बच्चू कडू यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि जलजीवन मिशन प्रशासनाला कडक इशारा दिला होता. मेळघाट संघर्ष यात्रेदरम्यान त्यांनी पाणीप्रश्नावर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला होता.

याच आंदोलनाच्या दुसऱ्या टप्प्यात गुरुवारी अमरावती येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्रादेशिक कार्यालयात बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. यावेळी मेळघाटातील विविध पाणीपुरवठा योजनांबाबतचे प्रश्न, रखडलेले प्रकल्प तसेच निधीअभावी थांबलेली कामे यावर अधिकाऱ्यांसोबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

'जोपर्यंत सुरू असलेले प्रकल्प तात्काळ पूर्ण होत नाहीत आणि मेळघाटातील जनतेला नियमित पिण्याचे पाणी उपलब्ध होत नाही, तसेच आवश्यक निधीची व्यवस्था केली जात नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही,' अशी भूमिका बच्चू कडू यांनी घेतली. त्यानंतर त्यांनी कार्यकर्ते व नागरिकांसह कार्यालयातच ठिय्या आंदोलन सुरू केले.



बच्चू कडू आंदोलनाला बसल्याची माहिती पसरताच प्रशासनात एकच खळबळ उडाली. विविध स्तरांवर हालचाली सुरू झाल्या आणि प्रश्न सोडविण्यासाठी तातडीने प्रयत्न करण्यात आले. दरम्यान, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सचिव रंगा नायक यांनी बच्चू कडू यांच्याशी संपर्क साधून सध्या अस्तित्वात असलेली पाणीपुरवठाची कामे ही उन्हाळ्यात तात्काळ पूर्ण झाली पाहिजे अन्यथा ती पावसाळ्यानंतर पूर्ण करावी लागेल यामध्ये वाढीव निधीची गरज पडणार आणि त्याला वेगळी मान्यता घेण्याची गरज पडणार ही प्रक्रिया अडचणीची होईल म्हणून सदर कामे ही पावसाळ्याचे पूर्वी वेळेत पूर्ण झाली पाहिजे त्यासाठी मेळघाटातील पाणीपुरवठा योजनांसाठी आवश्यक निधी तात्काळ उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.

प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसाद आणि निधी उपलब्धतेचे आश्वासन मिळाल्यानंतर बच्चू कडू यांनी आपले आंदोलन मागे घेतले. मात्र, आश्वासनांची अंमलबजावणी झाली नाही तर पुन्हा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

# महानगरपालिकेची थकबाकीदारांवर कारवाई; दोन मालमत्ता सील

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांच्या निर्देशानुसार शहरातील मालमत्ता कर थकबाकीदारांवर सुरू असलेल्या विशेष वसुली मोहिमेअंतर्गत गुरुवारी मध्य झोन क्र. २, राजापेठ विभागात मोठी कारवाई करण्यात आली. मालमत्ता कराचा भरणा करण्यासाठी वारंवार नोटिसा देऊनही प्रतिसाद न देणाऱ्या दोन थकबाकीदारांच्या मालमत्ता सील करण्यात आल्या. महानगरपालिकेने यापुढेही अशीच कठोर भूमिका कायम ठेवण्याचे संकेत दिले आहेत.




महानगरपालिकेकडून प्राप्त माहितीनुसार, वार्ड क्रमांक बी-६ अंतर्गत मालमत्ता क्रमांक ८०७ व ८०७-१ चे मालमत्ताधारक यांच्याकडे मालमत्ता कराची तब्बल ६ लाख १६ हजार १५ रुपये इतकी थकबाकी होती. संबंधित मालमत्ताधारकांना वेळोवेळी कर भरण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. तसेच थकबाकीची रक्कम जमा करण्यासाठी अनेकदा पाठपुरावा करण्यात आला होता. मात्र, आजपर्यंत कराचा भरणा न झाल्यामुळे अखेर महानगरपालिकेने संबंधित मालमत्ता सील करण्याची कारवाई केली.

याचप्रमाणे वार्ड क्रमांक बी-६ मधील मालमत्ता क्रमांक ३१-१० चे मालमत्ताधारक यांच्याकडे मालमत्ता कराची ३० लाख २९ हजार १२८ रुपये इतकी मोठी थकबाकी होती. संबंधित मालमत्ताधारकांनाही अनेकदा नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. तसेच थकबाकीचा भरणा करण्यासाठी मुदतही देण्यात आली होती. मात्र, कोणतीही दखल न घेतल्याने आणि आजपर्यंत कर न भरल्यामुळे या मालमत्तेवरही सीलिंगची कारवाई करण्यात आली.

या दोन्ही मालमत्तांवरील थकबाकीची एकूण रक्कम ३६ लाख ४५ हजार १४३ रुपये इतकी असून, महानगरपालिकेच्या वसुली मोहिमेतील ही महत्त्वपूर्ण कारवाई मानली जात आहे. शहरातील अनेक मोठे थकबाकीदार अद्यापही कराचा भरणा टाळत असल्याचे महानगरपालिका प्रशासनाच्या निदर्शनास आले असून, त्यांच्यावरही आगामी काळात कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले.

सदर कारवाई सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. कारवाईदरम्यान सहायक क्षेत्रीय अधिकारी नर्मदा चव्हाण, निरीक्षक फैयाज खान तसेच वसुली लिपिक सुरज चावरे, रोशन चव्हाण, धरम बिवाड आणि विशाल डीख्याव यांनी सहभाग घेतला. महसूल विभागाच्या पथकाने नियमानुसार संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करून मालमत्तांवर सील लावण्यात आले.

महानगरपालिकेने सर्व थकबाकीदारांना आवाहन केले आहे की, त्यांनी तातडीने आपली मालमत्ता कराची थकबाकी भरून महानगरपालिका प्रशासनास सहकार्य करावे. अन्यथा आगामी काळात शहरातील विविध भागांमध्ये अशाच प्रकारच्या धडक कारवाया सुरू राहणार असून, थकबाकीदारांवर कोणतीही दिरंगाई न करता कठोर पावले उचलली जातील.

# वाघाडी नाल्यावरील पूल बांधकामासाठी ग्रामस्थांचे आमरण उपोषण
## कळाशी-कुकसा मार्गावरील समस्येकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

**खल्लार/प्रतिनिधीः-** कळाशी ते कुकसा मार्गावरील वाघाडी नाल्यावरील पुलाचे बांधकाम तातडीने पूर्ण करण्यात यावे, या मागणीसाठी कळाशी येथील ग्रामस्थांनी दि. ५ जूनपासून दर्यापूर तहसिल कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण व ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून वाघाडी नाल्यावरील पुलाच्या उंचीवाढ व नव्याने बांधकामाची मागणी प्रशासनाकडे सातत्याने करण्यात येत आहे. मात्र, वारंवार निवेदने व पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

सध्या अस्तित्वात असलेल्या पुलाची उंची कमी असल्याने पावसाळ्यात नाल्याला पूर आल्यास वाहतूक पूर्णपणे ठप्प होते. त्यामुळे परिसरातील शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी तसेच सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. अनेकदा जिव धोक्यात घालून नागरिकांना प्रवास करावा लागत असल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे.

शासनाने कोणत्याही उपलब्ध निधीतून या पुलाचे बांधकाम तातडीने पूर्ण करून नागरिकांना दिलासा द्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# गोमातांसाठी नांदेड बु. येथे गोशाळा सुरु होणार

**खल्लार/प्रतिनिधीः-** रस्त्यांवर भटकणाऱ्या, अपघातग्रस्त, जखमी, निराधार आणि वृद्ध गोमातांच्या संरक्षणासाठी खल्लार नजिकच्या नांदेड बु येथे दिनांक ६ जून रोजी कामधेनू गोशाळा सुरु होणार आहे.

कै. सुधाकर बाबनजी भोंगळे शैक्षणिक व बहुउद्देशीय संस्था, नाशिक यांच्या पुढाकारातून हा समाजोपयोगी उपक्रम साकारला जाणार आहे. सध्या राज्यभरात भटक्या गोवंशाचा प्रश्न गंभीर बनत असताना, अनेक गायी रस्ते अपघात, उपासमार आणि आजारांना बळी पडत आहेत. अशा परिस्थितीत गोमातांना सुरक्षित निवारा, वैद्यकीय सेवा आणि संगोपन उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही गोशाळा सुरू करण्यात येत आहे.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त 'माझी वसुंधरा' अभियानाला गती
## -लोकसहभागातून पर्यावरण संवर्धनाचा निर्धार

**अमरावती :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त ५ जून २०२६ रोजी राज्यभर 'माझी वसुंधरा' अभियानांतर्गत विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार असून नागरिकांनी या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होऊन पर्यावरण संवर्धनाची ई-शपथ घ्यावी व पर्यावरण संवर्धनाचा निर्धार करावा, असे आवाहन विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे. या अंतर्गत विभागातील सर्व जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महापालिका आयुक्त तसेच विविध विभागांच्या प्रमुखांना 'माझी वसुंधरा' अभियानांतर्गत विविध जनजागृती उपक्रम आपापल्या जिल्ह्यात राबविण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. वाढते तापमान, पर्यावरणीय बदल आणि नैसर्गिक संसाधनांवरील वाढता ताण लक्षात घेता, पर्यावरण संवर्धनासाठी सर्व स्तरांवर व्यापक जनजागृतीची गरज असल्यामुळे त्यानुसार सर्व शासकीय, निमशासकीय विभागांनी कार्यवाही करावी, असेही सांगण्यात आले आहे.

# ग्रामगीताचार्य हभप अजाबराव महाराज टाले यांचे निधन
## ग्रामसेवा, राष्ट्रसेवा आणि अध्यात्माचा अखंड दिपस्तंभ हरपला

**खल्लार/प्रतिनिधीः-** नजिकच्या नरदोडा या गावाने ग्रामसेवा, राष्ट्रसेवा आणि अध्यात्म यांचा त्रिवेणी संगम घडविणारे एक कर्मयोगी व्यक्तिमत्त्व गमावले आहे. ग्रामगीताचार्य तथा ह.भ.प. अजाबराव महाराज टाले यांच्या निधनाने केवळ नरदोडा गावच नव्हे, तर संपूर्ण परिसरातील सामाजिक, शैक्षणिक आणि आध्यात्मिक चळवळीत मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

बालवयापासूनच वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या मनावर पडला होता. त्यातूनच त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजजागृती आणि ग्रामविकासासाठी समर्पित केले. नरदोडा हे गाव आध्यात्मिक परंपरा जपणारे गाव म्हणून ओळखले जाते. ब्रह्मलीन संत बालकदास महाराज यांच्या कृपाशिर्वादाने लाभलेल्या या भूमित अजाबराव महाराजांनी सेवाभावाचा वसा घेत समाजकार्यात स्वतःला झोकून दिले.

गावात शिक्षणाच्या सुविधा मर्यादित असताना त्यांनी सहकाऱ्यांच्या मदतीने 'मुष्टी फंड' ही अभिनव योजना राबविली. प्रत्येक घरातून एक मूठ धान्य संकलित करून त्यातून निधी उभारण्यात आला आणि त्याच्या आधारावर श्री गुरुदेव विद्यालयाची स्थापना झाली. ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचे दालन खुले करण्यामागे त्यांची दूरदृष्टी आणि समाजनिष्ठा दिसून येते.



अजाबराव महाराज हे ग्रामगीतेचे गाढे अभ्यासक होते. गुरुदेव सेवा मंडळाच्या माध्यमातून त्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे ग्रामविकास, स्वावलंबन आणि मानवतेचे विचार गावोगावी पोहोचविले. त्यांच्या प्रभावी प्रवचनांतून आणि मार्गदर्शनातून अनेक युवक व्यसनमुक्तीच्या मार्गावर आले. ग्रामसेवा, राष्ट्रसेवा, देशभक्ती आणि संतसेवा यांचे संस्कार त्यांनी असंख्य तरुणांच्या मनावर बिंबविले.

सामुदायिक प्रार्थना, ध्यान, रामधून, ग्रामगीता तत्त्वज्ञान प्रवचने आणि विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून त्यांनी अनेक गावांमध्ये आध्यात्मिक जागृती घडवून आणली. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळावी यासाठी त्यांनी 'अमर ज्ञानदान योजना' राबवून शिक्षण क्षेत्रातही मोलाचे योगदान दिले.

त्यांचा स्वभाव अत्यंत प्रेमळ, संयमी आणि लोकसंग्रही होता. त्यामुळे समाजातील विविध स्तरांतील लोक त्यांच्याशी जोडले गेले. समाजकारण आणि अध्यात्म यांचा सुंदर समन्वय साधत त्यांनी आयुष्यभर कार्य केले.

त्यांनी उभारलेल्या संस्था, दिलेले संस्कार आणि निर्माण केलेले कार्यकर्ते हेच त्यांच्या कार्याचे खरे स्मारक ठरणार आहेत. ग्रामसेवा, शिक्षणप्रेम आणि अध्यात्म यांचा अखंड संदेश देणारे त्यांचे जीवन पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी राहील.

---

## जाहीर नोटीस

सर्व जनतेला या जाहीर सुचना व्दारे कळविण्यात येते की, मला मृत्यूपत्रा व्दारे मिळालेली माझे मालकी व ताब्यातील शेत जमीन मौजा माहुली जहागीर ता.जि.अमरावती येथील शेत सर्वे नंबर ५६/१-डी याचे एकूण क्षेत्रफळ ० हेक्टर २८ आर.

वरील वर्णन केलेल्या शेतजमीनीचा वाद हा विद्यमान २१ वे सह दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, अमरावती येथील दावा क्र.१६८/२०२४, अर्जुन ---- विरुध्द----- प्रल्हाद, दावा प्रलंबित आहे.

सदरचे वादांकित शेत प्रतिवादी प्रल्हान किसनसा बिजवे हे विक्री, ईसारचिठ्ठी करण्याच्या बेतात आहे असे कळते.

तरी आमजनतेस कळविण्यात येते की, सदरचे शेत कुणीही खरेदी, अथवा इसार,बक्षिसपत्र कर नये जर कोणीही याबाबत व्यवहार करित असतील तर ते गैरकायदेशिर कृत्य असेल व असा अनाधिकृत व्यवहार मला कायदयाने बंधनकारक असणार नाही व त्या परिस्थितीत सर्व परिणामांची जबाबदारी संबंधितांची असेल याची नोंद घ्यावी.

सही/-
अर्जन रामसा गोडबोले
मोबाईल नंबर ९३७२६२१५३३
रा.साईप्रसाद अपार्टमेंट, प्लॉट नंबर ९
माईन्दे चौक,यवतमाळ,ता.जि.यवतमाळ

दिनांक- ०३/०६/२०२६
ठिकाण- अमरावती

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 278/2026 कलम २२
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री.जनकल्याण सेवा संस्था, अमरावती, ता.जि.अमरावती एफ-१२७७३/अमरावती**
बाबत अर्जदार - **गोविंद जनार्दन जोग, रा.हेडगेवार हॉस्पीटल, अमरावती**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९/२२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन)** - निरंक
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - अमरावती शहर येथील नझुल शिट नं.६५, प्लॉट नं.५/१, एकुण क्षेत्रफळ २७,५५२.९० चौ.मीटर पैकी ६६९ चौ.मीटर जागा, ह्याचा प्लॉट नं.५/१-ब, त्यावर असलेल्या बांधकामासहीत, ज्याची चतुःसिमा--
पुर्वेस - आदित्य अपार्टमेंट व त्यामागे रेल्वे लाईन
पश्चिमेस - अमरावती-बडनेरा रस्ता
उत्तरेस - प्लॉट नं.५/१-अ
दक्षिणेस - श्री.पाटील यांचे घर

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२४.०४.२०२६** रोजी दिली.

शिक्का
**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

---

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २६७**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्रीमती एन.सी. सोरटे ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१०३५/२०२६**
**श्रीमती ललिता अधिक चार विरुध्द निरंक**
**पुढील ता.२९.०६.२०२६**

## जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Lalita Prabhakar Bhamkar, Age 77 Yrs. Occu.: Household R/o. Mahadevkhori Road, Near Maroti Temple, Prabhu Colony Sai Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravtai
2. Kanchan Anil Patil, Age 54 Yrs. Occu.: Household R/o. Plot No. 18, Suman Apartment, Khamla Near Telephone Exchange, Trisharan Nagar, Nagpur, Tq. & dist. Nagpur
3. Bharati Madan Ujawane, Age 52 Yrs. Occu.: Household R/o. Shegavkar Layout, infront of Savitri fule Vidyalaya, Wardha, Tq. & dist. Wardha
4. Rupali Nilesh Dagwar, Age 48 Yrs. Occu.: Household R/o. Qtr.No. D/71/4, Khaparkheda Power Plant, Prakash Nagar, Khaparkheda, Nagpur, Tq. & Dist. Nagpur
5. Rahul Prabhakar Bhamkar, Age 46 Yrs. Occu.: Private Job R/o. Prabhu Colony, Mahadevkhori Road, Near Maroti Temple, Post-Rukhmini Nagar, Amravati. Tq. & Dist. Amravtai

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत प्रभाकर चुडामण भामकर हे ०४.०४.२०२६ रोजी नागपूर,ता.जि.नागपूर येथे मयत झाले.** अर्जदार **ललिता अधिक चार विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती ललिता अधिक चार विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१५.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

---

## जाहीर सोडचिठ्ठी

**जाहीर सोडचिठ्ठी घेणार - पार्टी नं.१ - सौ.दुर्गा अमोल जवंजाळ**
वय ३५ वर्षे, रा.कठोरा नाका, अमरावती ता.जि.अमरावती

**जाहीर सोडचिठ्ठी देणार - पार्टी नं.२ - अमोल जगदिशराव जवंजाळ**
वय ४० वर्षे, रा.खराळा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

१. आम्ही दोघे पार्टी नं.१ आणि पार्टी नं.२ वरील पत्त्यावर राहतो. आम्ही नात्याने पती-पत्नी आहोत. कुणाच्याही दबावात न येता, चांगल्या मानसिक अवस्थेत सामाजिक जातमान्यतेनुसार मी स्वतः पार्टी नं.१ माझे पतीला दिनांक ५ जून २०२६ ला जाहीर सोडचिठ्ठी देत आहे.

२. आमचा विवाह २७ मार्च २०१२ ला आर्य पध्दतीने झालेला आहे. मागील सहा वर्षा पासून पार्टी नं.१ माहेरी राहत आहे. यापुढे दोघाही पती-पत्नीचे पटणे शक्य नाही. सततच्या सांसासरिक कलहातून कुणाचीही जीवितहानी होऊ नये म्हणून याच क्षणी पार्टी नं.१ बिनशर्त घटस्फोट घेत आहे.

३. यापुढे दोघेही दुसरा विवाह करण्यास मोकळे झालो आहे. यापुढे दोघेही एक दुसऱ्याच्या आयुष्यात हस्तक्षेप करणार नाही. एक दुसऱ्याची सामाजिक बदनामी करणार नाही. हे पती-पत्नीचे वैवाहिक संबंधाचे नाते येथेच संपुष्टात येत आहे.

**स्थळ** - अमरावती जिल्हा (महाराष्ट्र राज्य)
**दिनांक** - ५ जून २०२६

**जाहीर सोडचिठ्ठी देणार**
**पत्नी - सौ.दुर्गा अमोल जवंजाळ**

---

**तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी**
**तहसिल कार्यालय, भातकुली**

**क्रमांक-म.स./प्रस्तु-१/कावि-६४३/२०२६** **दिनांक ०६.०५.२०२६**
**अर्जदार :- अजय गजानन देशमुख, रा.आसरा, ता.भातकुली, जि. अमरावती**

## जाहीरनामा

या जाहीर नोटीस व्दारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, अर्जदार अजय गजानन देशमुख, रा.आसरा, ता. भातकुली, जि.अमरावती यांचे मालकीचे मौजा आसरा भाग-१, ता. भातकुली येथील गट क्रमांक ११९ मधील क्षेत्र १.३५ हे.आर. भोगवटदार वर्ग-१ या शेतजमिनीच्या ७/१२ मधील इतर अधिकारामध्ये साधे कुळ **सखाराम गंगाराम माहोडे** अशी नोंद आहे.

अर्जदार यांनी सदर वरील अधिकारातील साधे कुळ **सखाराम गंगाराम मोहोड** ही नोद कमी करण्याबाबतचा आदेश मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

**परिशिष्ट**

| अ.क्र. | मौजा | शेत स.नं./गट नं. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १. | आसरा भाग-१ | १३९ | एकुण क्षेत्र १.३५ हे.आर. | ८.७७ रु.पै. |

त्यामुळे अर्जदाराने दिलेल्या अर्जावरुन जाहीरनामा प्रसिध्द करण्यात येत आहे. करिता सदर प्रकरणामध्ये ज्या कोणाला अर्जदार यांच्या वरील प्रमाणे नमुद विनंती वर काही हरकती वा आक्षेप असल्यास त्यांनी जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत कार्यालयीन वेळेत आपला आक्षेप अर्ज लेखी स्वरुपात आवश्यक पुराव्यासह या कार्यालयात सादर करावा. मुदतीनंतर प्राप्त झालेला अर्ज स्विकारण्यात येणार नाही तथा त्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही याची नोद घ्यावी. तसेच प्रकरणात कोणालाही काही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्यात येईल.

शिक्का
**स्वाक्षरी/-**
**तहसीलदार, भातकुली**

---

प्रो.क्र. ५३/२०२६

## वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस

**मा.विजय जी.परवरे, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), भातकुली, जि.अमरावती यांच्या न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्रमांक १८२/२०२६ ने.ता.३०.०६.२०२६

**अर्जदार :**
१. मनोहर शामराव गायकवाड, वय ४५ वर्षे, व्यवसाय - मजुरी
२. गौतम शामराव गायकवाड, वय ४० वर्षे, व्यवसाय - मजुरी
दोन्ही रा.जावरा (कामनापुर), ता.भातकुली, जि.अमरावती
३. संगिता दिपक वानखडे, वय ४३ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.वडूरा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदारः-** Nil

ज्यापेक्षा **शामराव चेंडूजी गायकवाड** हे दि.**०८.०१.२०१७** रोजी मयत झाले आणि **भुलुबाई शामराव गायकवाड** हे दि.१३/०९/२०२५ रोजी मयत झाले. अर्जदार मनोहर शामराव गायकवाड, वय ४५ वर्षे,धंदा-मजूरी,रा.जावरा (कामनापुर), ता.भातकुली, जि.अमरावती व इतर यांनी **बॉम्बे रेग्युलेशन कायदा,१८२७ चे कलम २ प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता** या न्यायालयामध्ये दि.**०८.०५.२०२६** रोजी अर्ज केला आहे. या अर्जाप्रमाणे वरील अर्जदार हे मयत **शामराव चेंडूजी गायकवाड व भुलुबाई शामराव गायकवाड** यांचे वारस आहेत. ते सदरहू अर्जदार फक्त मयत **शामराव चेंडूजी गायकवाड व भुलुबाई शामराव गायकवाड** यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत दाखल करावी.

तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदरहु न्यायालय अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बाबत पुरावा घेऊन त्यांना सदरहू अर्जदारांना मयताचे वारस म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक १५.११.२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का
आदेशान्वये,
सहायक अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर),भातकुली
दि.१५/०५/२०२६

---

## जन्म/मृत्यू बाबत जाहीरनामा

**गजानन एकनाथ राजगडे तहसिलदार तथा दंडाधिकारी, चिखलदरा यांचे कोर्ट**

**प्रकरण क्रमांक :- जन्म/मृत्यू नोंद क्र. ०२/एस.आर.सी. -/ चिखलदरा/२०२४-२०२५**

श्री विठठल तुकाराम रनबावळे, रा.चिखलदरा यांच्या आईचा मृत्यू दिनांक २०/०५/२०१९ या रोजी झालेला आहे. याबाबतची नोंद नगर परिषद परिषद चिखलदरा येथे करण्याबाबत श्री विठठल तुकाराम रनबावळे यांनी अर्ज सादर केलेला आहे.

तरी ज्या इसमास सदर नोंद करणे बाबतीत हरकत/आक्षेप असेल तर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आंत हरकत/आक्षेप सादर करावा. विहीत मुदतीत आक्षेप/ हरकत प्राप्त न झाल्यास संबधितांस जन्माची नोंद होणेबाबत आदेश देण्यात येईल व मुदती नंतर हरकत/आक्षेप प्राप्त झाल्यास सदर हरकत/आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही.याची नोंद घ्यावी.

शिक्का
**सही/-**
**तहसिलदार तथा**
**तालुका दंडाधिकारी,**
**चिखलदरा करिता**

---

**दिनांक २४.०५.२०२४**

## जाहीरनामा

अर्जदार **रोशन शाह हुसेन शाह,रा.बेलोरा (बु.)** ता.आष्टी, जि.वर्धा यांनी त्यांचा जन्म मौजा बेलोरा (बु.) येथे झालेला असून त्यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत, बेलोरा (बु.) ता.आष्टी, जि.वर्धा येथे जन्म नोद रजिस्टरला नोद घेण्याकरिता जन्म नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद करण्याबाबत प्रकरण दाखल केले आहे. अर्जदाराचा जन्म ०७/०८/१९८५ रोजी बेलोरा (बु.) येथे झालेला आहे. असे अर्जात नमुद केलेले आहे.

त्या अर्थी मी तालुका दंडाधिकारी, आष्टी उपरोक्त वाचा क्रमांक १ व २ नुसार व ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्माबाबत नोंद घेणे कामीचा आदेश देणेकरिता व गृह चौकशी करणे कामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुंरावे किंवा साक्षीदारांसह तालुका दंडाधिकारी, आष्टी यांचे न्यायालयात स्वतः जातीने वकिला मार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामा प्रसिध्द पासून ३० दिवसांचे आत कार्यालयीन वेळेत सादर करावेत.

विवित मुदतीत आक्षेप हरकतीचा पुराव प्राप्त न झाल्यास जन्माबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा प्रकरण नस्ती करण्यात येईल. विचार केल्या जाणार नाही याची सर्व संबंधितांनी नोद घ्यावी.

शिक्का
**तहसीलदार तथा**
**तालुका दंडाधिकारी, आष्टी**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### महाडीबीटी अंतर्गत प्रलंबित अनुदान तातडीने वितरित करा

**तिवसा -** अमरावती जिल्ह्यातील तसेच विशेषतः तिवसा तालुक्यातील शेतकऱ्यांना महाडीबीटी अंतर्गत ट्रॅक्टर, ठिबक सिंचन, तुषार सिंचन, कृषी यांत्रिकीकरण व इतर शेती साहित्यावरील अनुदानाची रक्कम गेल्या दोन वर्षांपासून प्रलंबित असल्याने ती तातडीने वितरित करण्यात यावी, अशी मागणी तिवसा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा नगरसेवक वैभव वानखडे यांनी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांची भेट घेऊन केली.यावेळी सादर करण्यात आलेल्या निवेदनात खरीप हंगामाची पेरणी व मशागतीचे दिवस सुरू होत असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असून प्रलंबित अनुदानाची रक्कम १५ जून २०२६ पूर्वी थेट लाभ हस्तांतरण (DBT) द्वारे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.यावेळी कृषी अधीक्षक राहुल सातपुते यांनी यांत्रिकीकरण योजनेतील रोटाव्हेटरचा निधी काही प्रमाणात वितरित झाल्याची माहिती दिली. तसेच सर्व प्रलंबित योजनांचा निधी वितरित करण्यासाठी अमरावती जिल्ह्यासाठी सुमारे १५ ते १७ कोटी रुपयांची आवश्यकता असल्याचे सांगितले.शेतकऱ्यांच्या हिताचा हा प्रश्न शासनाने गांभीर्याने घ्यावा व प्रलंबित अनुदान तातडीने वितरित करावे, अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही वैभव वानखडे यांनी दिला.

### उमेश गवई यांची नियुक्ती

**टाकरखेडा संभू -** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अनुसूचित जाती विभागाच्या वतीने संघटन सुदृढीकरण अभियानांतर्गत



चांदूर बाजार ब्लॉक अध्यक्षपदी उमेश लक्ष्मणराव गवई यांची नियुक्ती करण्यात आली आहे.ही नियुक्ती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अनुसूचित जाती विभागाचे अध्यक्ष अनिरुद्ध बनकर यांच्या स्वाक्षरीने जाहीर करण्यात आली. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या मान्यतेने ही नियुक्ती करण्यात आली.नियुक्तीबद्दल उमेशराव गवई यांचे अभिनंदन करताना, काँग्रेस पक्षाची विचारधारा व धोरणे जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी तसेच पक्ष संघटन बळकट करण्यासाठी सातत्याने कार्यरत राहण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.या नियुक्तीमुळे चांदूर बाजार तालुक्यात काँग्रेसच्या अनुसूचित जाती विभागाच्या संघटनात्मक कामकाजाला अधिक बळ मिळणार असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

### श्री क्षेत्र जहागीरपूर आजपासून संगीतमय भागवत कथा

**कुऱ्हा-**विदर्भातील लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या श्री



महारुद्र मारुती संस्थान श्री क्षेत्र जहागीरपूर येथे संगीतमय भागवत कथेचे ५ जून ते १२ जून २०२६ पर्यंत कथा प्रवक्ता कु.भूमिका रविंद्र तिरमारे (मुर्तिजापूर तरोडा) यांच्या अमृतवाणीतून भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. या संगीतमय भागवत कथेला साथ संगत कु. समृद्धीताई मुळे (तबलावादक) ज्ञानेश्वर घोटकर (आर्गॅन वादक) नारायण वानखडे (ऑक्टोपॅड वादक)रविंद्र तिरमारे (गायक) विनोद राठोड (मृदंग वादक) शेषराव वानखडे (झाकी) गजानन राऊत (हरिपाठ) धनराज ढोक (हरिपाठ पठण) यांचा सहभाग असून दररोज सकाळी ५ ते ८ काकडा आरती, दुपारी ३ ते ६ वा. संगीतमय भागवत कथेचे आयोजन करण्यात आले असून सायं. ७.३० ते ८.३० हरिपाठ तसेच दैनंदिन कार्यक्रम होणार आहे. तरी पंचक्रोशीतील व सर्व परिसरातील भाविक भक्तांना वरील भागवत कथेला आवर्जुन उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थानचे कार्यकारी विश्वस्त मंडळ श्री महारुद्र मारुती संस्थान श्री क्षेत्र जहागीरपूर जहागरिपूर यांनी केले आहे.

## महाविद्यालये व प्राध्यापकांच्या विविध प्रश्नांवर
# अ.भा.राष्ट्रीय शैक्षिक महासंघाची सहसंचालकांशी चर्चा

**अमरावती/का.प्र.**

अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाच्या शिष्टमंडळाने उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ. अभय खांबोरकर यांची भेट घेऊन महाविद्यालये व प्राध्यापकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. विभागीय अध्यक्ष प्राचार्य डॉ. मीनल भोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि विभागीय महामंत्री प्रा. डॉ. मंगेश अडगोकर यांच्या नेतृत्वात झालेल्या या बैठकीत अनेक महत्त्वाच्या विषयांवर सकारात्मक चर्चा झाली आहे.



सत्र २०२६-२७ लवकरच सुरू होत असल्याने तासिका तत्त्वावरील अध्यापकांच्या नियुक्ती प्रक्रियेला तातडीने सुरुवात करण्याची मागणी महासंघाने केली. नियमित पदभरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अध्यापन कार्य सुरळीत ठेवण्यासाठी तासिका तत्त्वावरील अध्यापकांची नियुक्ती आवश्यक असल्याचे महासंघाने नमूद केले. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी आवश्यक प्रक्रिया लवकरच सुरू करण्यात येईल, असे आश्वासन सहसंचालकांनी दिले. बैठकीत प्राध्यापकांच्या प्रलंबित स्थाननिश्चिती, पदोन्नती, वेतननिश्चिती व पुनर्निर्धारण प्रकरणांवरही चर्चा झाली. विशेषतः एम.फिल. पात्रताधारक सेवानिवृत्त व दिवंगत प्राध्यापकांच्या स्थाननिश्चिती आणि पदोन्नतीसंबंधी प्रकरणे तातडीने निकाली काढण्याची मागणी करण्यात आली. यासंदर्भात शासन स्तरावर मार्गदर्शन घेऊन आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन सहसंचालकांनी दिले.अनुदानित महाविद्यालयांतील रिक्त पदे भरण्याच्या प्रक्रियेबाबतही महासंघाने विविध मुद्दे मांडले. अनेक महाविद्यालयांच्या पदनिर्धारणामध्ये दुरुस्तीची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आणून देत भरती प्रक्रिया कालबद्ध पद्धतीने राबविण्याची मागणी करण्यात आली.

शासनाच्या विशेष पोर्टलद्वारे भरती प्रक्रिया पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधिष्ठित पद्धतीने राबविण्यात येणार असल्याची माहिती सहसंचालकांनी दिली.

याशिवाय विभागीय संकेतस्थळावर जीपीएफ, डीसीपीएफ/एनपीएस, शासन निर्णय, परिपत्रके व कार्यालयीन आदेशांची अद्ययावत माहिती उपलब्ध करून देण्याची मागणी महासंघाने केली. यासाठी नवीन संकेतस्थळ विकसित करण्यात आले असून आवश्यक सुविधा टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून दिल्या जातील, असे सहसंचालकांनी सांगितले. दरम्यान, सहसंचालक कार्यालयाने विविध प्रकरणांच्या निपटाऱ्यासाठी निश्चित कालमर्यादा जाहीर करणाऱ्या नागरिकांच्या सनदेचे महासंघाने स्वागत केले.

पारदर्शक, उत्तरदायी व नागरिकाभिमुख प्रशासनाच्या दिशेने हे महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे महासंघाने नमूद केले.बैठकीस प्रशासकीय अधिकारी डॉ. प्रभू दवणे उपस्थित होते. महासंघाच्या वतीने विभागीय कोषाध्यक्ष प्रा. डॉ. दिनेश खेडकर, विभागीय महिला प्रमुख प्रा. डॉ. रेखा मग्गीरवार, अमरावती शहराध्यक्ष प्रा. डॉ. ओमप्रकाश मुंदे, प्राचार्य डॉ. एच. आर. देशमुख, प्राचार्य डॉ. दिनेश निचत, प्रा. डॉ. अनुप शर्मा, प्राचार्य डॉ. उदय मांजरे तसेच विविध महाविद्यालयांतील तासिका तत्त्वावरील प्राध्यापक उपस्थित होते.

### नागरी सेवा परीक्षा २०२७ पूर्व प्रशिक्षणासाठी प्रवेश परीक्षा जाहीर

**अमरावती-**केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षा २०२७ च्या पूर्व प्रशिक्षणाकरिता अमरावती येथील 'भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र' (युपीएससी) यांच्यातर्फे विनामूल्य प्रशिक्षण देण्यासाठी प्रवेश परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. राज्यस्तरावरून ऑफलाइन पद्धतीने घेण्यात येणाऱ्या या प्रवेश परीक्षेसाठी पात्र आणि इच्छुक उमेदवारांकडून ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागविण्यात आले आहे. सदर प्रशिक्षणाचा लाभ घेण्यासाठी जाहिरातीत नमूद केलेल्या अटी व शर्तींची पूर्तता करणे आवश्यक असून, या सुवर्णसंधीचा लाभ घेण्याचे आवाहन केंद्राच्या संचालिका डॉ. प्रतिभा भोरजार यांनी केले आहे. प्रवेश प्रक्रियेच्या वेळापत्रकानुसार, ऑनलाइन अर्ज भरण्याचा कालावधी १ ते १७ जून २०२६ पर्यंत असणार आहे. तसेच परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम मुदत १९ जून २०२६ हा निश्चित करण्यात आला आहे. ही ऑफलाइन प्रवेश परीक्षा १९ जुलै २०२६ (रविवार) रोजी सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत घेतली जाईल. या परीक्षेचा सविस्तर अभ्यासक्रम, ऑनलाईन अर्ज भरण्याबाबतची माहिती व परीक्षेसंबंधी इतर सर्व सूचना www.siac.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

### जीवनात विरंगुळा निर्माण करण्यासाठी संगीताशिवाय दुसरे माध्यम नाही-आ.सुलभा खोडके

**अमरावती-**संगीत हि साधना असून कला कि उपासना आहे. जीवनात एक विरंगुळा निर्माण करण्यासाठी संगीतापेक्षा दुसरे कुठले माध्यम नाही. म्हणूनच आज संगीताचे इतके चाहते आहेत कि प्रत्येकाने कलेची जोपासना करून आपल्यातील कलावंत जिवंत ठेवला आहे. शहरातील हौशी गायन कलावंतांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी शिवस्वर कराओके ग्रुप द्वारा संगीताचे मोठे दालन खुले करण्यात आल्याने अमरावतीचे संगीत विश्व अधिकच बहरले आहे. असे प्रतिपादन आ. सुलभा खोडके यांनी केले. कठोरा नाका स्थित विजय -शिक्षक कॉलनी येथील संगीतउपासक राजेंद्र राऊत यांच्या शिवस्वर



कराओके ग्रुप च्या दोनदिवसीय वार्षिक उत्सवाला आ. सुलभा व आ. संजय खोडके यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी आमदारांनी शिवस्वर करा ओके ग्रुपच्या स्टुडिओ, साऊंड व्यवस्था,तसेच कलावंतांची मुक्त कंठाने प्रशंसा केली. यावेळी सविता राजेंद्र राऊत व स्नेहल ऋतुराज राऊत, श्रद्धा राऊत यांनी आमदार महोदयांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी ग्रुपच्या कलावंतांनी जुन्या जमानातील सदाबहार गीतांचा अप्रतिम असा नजराना आपल्या नव्या आवाजातून प्रस्तुत केला. यावेळी एकाहून एक सरस गीतांची प्रस्तुती देण्यात आल्याने वार्षिक उत्सवात चांगलीच रंगत आली. कार्यक्रमाला संगीत प्रेमी व हौशी गायन कलावंत प्रामुख्याने उपस्थित होते.

### हितगुज ज्येष्ठ भगिनी मंडळातर्फे एनसीएमसी कार्ड शिबिराचे आयोजन

अमरावती - हितगुज ज्येष्ठ भगिनी मंडळ, अमरावती यांच्या वतीने परिसरातील सर्व भगिनी तसेच ६५ वर्षांवरील पुरुषांसाठी एसटी प्रवासात भविष्यात उपयुक्त ठरणारे एनसीएमसी (National Common Mobility Card) कार्ड काढण्यासाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.हे शिबिर सोमवार, दि. ८ जून २०२६ रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत श्रीराम मंदिर, रविकिरण कॉलनी येथे आयोजित करण्यात आले आहे. कार्ड काढण्यास इच्छुकांनी आपली नावे पुढील दोन दिवसांत नोंदवावीत, असे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे.शिबिरासाठी येताना स्वतःचा मोबाईल, आधार कार्ड तसेच २५० रुपये शुल्क सोबत आणणे आवश्यक आहे.अधिक माहितीसाठी डॉ. शोभा गायकवाड (अध्यक्ष, हितगुज ज्येष्ठ भगिनी मंडळ, अमरावती) यांच्याशी ९०९६८२५९७९ किंवा ९४२३२७९४३२ या क्रमांकांवर संपर्क साधावा.

## अमरावती सीए शाखा विद्यार्थी संघ समितीच्या वतीने
# स्मार्ट गुंतवणूक आणि ट्रेडिंगच्या भविष्यावर कार्यशाळा

**अमरावती/का.प्र.**

सीए शाखेच्या विद्यार्थी संघ समितीने आयसीएआय भवन, अमरावती येथे 'स्मार्ट गुंतवणुकीद्वारे आर्थिक विकास आणि स्मार्ट ट्रेडिंगचे भविष्य' या विषयावर अत्यंत माहितीपूर्ण आणि ज्ञानवर्धक कार्यशाळेचे यशस्वी आयोजन केले. या कार्यक्रमाला सीए विद्यार्थी आणि कार्यालयीन टीमच्या सदस्यांकडून प्रतिसाद मिळाला, ज्यामध्ये मोठ्या संख्येने लोक सहभागी झाले होते. या कार्यशाळेचा उद्देश सहभागींमध्ये आर्थिक जागरूकता, व्यावहारिक ज्ञान आणि गुंतवणुकीची समज वाढवणे हा होता.



पहिल्या सत्राला एंजेल वन लिमिटेडचे अधिकृत पार्टनर आणि प्रसिद्ध स्टॉक मार्केट शिक्षक, सूरज के. क्षीरसागर यांनी संबोधित केले. त्यांनी शिस्तबद्ध गुंतवणुकीचे महत्त्व, स्मार्ट गुंतवणूक धोरणांद्वारे संपत्ती निर्मिती आणि डिजिटल गुंतवणूक इकोसिस्टममध्ये उपलब्ध असलेल्या वाढत्या संधींबद्दल सविस्तर माहिती दिली. व्यावहारिक उदाहरणे आणि बाजाराच्या माहितीद्वारे, त्यांनी सहभागींना दीर्घकालीन गुंतवणुकीची मानसिकता विकसित करण्यासाठी प्रेरित केल. दुसऱ्या सत्राला एंजेल वन लिमिटेड, नागपूर शाखेचे स्टेट हेड,प्रीतम टेंभुर्णे यांनी संबोधित केले. त्यांनी स्मार्ट ट्रेडिंगचे भविष्य,मार्जिन ट्रेडिंग सुविधा (एमटीएफ), आणि बाजारातील उदयोन्मुख संधींबद्दल मोलाची माहिती दिली. त्यांच्या सत्राने सहभागींना भांडवली बाजारातील ट्रेंड, जोखीम व्यवस्थापन तंत्रे आणि ट्रेडिंग तसेच गुंतवणूक सल्लागार सेवांच्या भविष्याला आकार देणाऱ्या तांत्रिक प्रगतीबद्दल व्यावसायिक दृष्टिकोन प्रदान केला.हा कार्यक्रम विद्यार्थी संघ समिती अमरावती शाखेचे अध्यक्ष, सीए संदीप सुराणा यांच्या गतिमान नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमाचे यशस्वी समन्वय विद्यार्थी संघ समिती व्यवस्थापन समितीने केले, ज्यामध्ये सीए संदीप सुराणा (अध्यक्ष), सीए दिव्या त्रिकोटी (व्यवस्थापन समिती सदस्य), खुशी राजवानी (उपाध्यक्ष), यश खत्री (सचिव), महक थरवानी (सहसचिव), आणि सेजल कापडी (खजिनदार) यांचा समावेश होता. त्यांच्या समर्पित प्रयत्नांमुळे कार्यशाळेचे सुरळीत संचालन सुनिश्चित झाले आणि सहभागींना उत्तम शिक्षणाचा अनुभव मिळाला.कार्यक्रमाचा समारोप संवादात्मक प्रश्नोत्तर सत्राने झाला, ज्यामध्ये सहभागींनी वक्त्यांशी सक्रियपणे संवाद साधला आणि गुंतवणूक तसेच ट्रेडिंगवर मोलाचे व्यावहारिक ज्ञान मिळवले. ही कार्यशाळा जबरदस्त यशस्वी ठरली आणि तिने विद्यार्थी तसेच उदयोन्मुख व्यावसायिकांना दर्जेदार व्यावसायिक आणि आर्थिक शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याप्रती विद्यार्थी संघ समिती अमरावतीच्या बांधिलकीला अधिक बळकट केले.

## जिल्ह्यातील विद्यार्थी व युवकांचे दोन दिवसीय शिबीर

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

चांदुर रेल्वे येथून जवळ असलेल्या मांजरखेड कसबा मधील पु.संत गाडगे बाबा विद्यालय मध्ये AISF व AIYF अमरावती जिल्ह्यातील विद्यार्थी व युवकांचे दोन दिवसाचे अभ्यास शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात जिल्ह्यातील सर्व जिल्हा प्रमुख,तालुका प्रमुख व इतर AISF चे व AIYF चे अध्यक्ष व इतर सदस्य उपस्थित होते.विद्यार्थिनीची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.





या शिबिरामध्ये प्रा प्रसेनजीत तेलंग,प्रा विजयजी रोडगे,कॉ. सुनील मेटकर, कॉ.अशोकजी सोनारकर, डॉ प्रा महेंद्रजी मेटे यांनी मार्गदर्शन केले. दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिरात विद्यार्थी जीवनातील शिक्षणातील समस्या,पुढील दिशा. AISF व AIYF चे स्वतंत्र काळातील लढ्याचा इतिहास, तसेच क्रांतिकारकांच्या चळवळी,आजची शैक्षणिक स्थिती आणि सामाजिक परिस्थिती पाहता विद्यार्थ्यांचे योगदान, विज्ञान युगात मोबाईल व इंटरनेट सेवा उपलब्ध स्थितीचा वापर,सामाजिक बांधिलकी, शैक्षणिक पात्रता व इतर सेवा यामध्ये विद्यार्थ्यांना योग्य संधी प्राप्त करून देणे व शिक्षण घेणे आवश्यक आहे.अशा अनेक विविध प्रकारच्या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. शिबिराचे उद्घाटन कॉ. तुकाराम दादा भस्मे,माजी राज्य सचिव भाकप यांनी केले. यावेळी कॉ. सतीश चौधरी, तालुका सचिव भाकप उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन कॉ. प्रतिक्षा ढोके, प्रास्ताविक कॉ. सागर दुर्योधन व आभार प्रदर्शन राम जोशी यांनी केले. यावेळी कॉ.किशोर फुंडे, कॉ. सुमेध सरदार, नगरसेवक भा क प,चांदूर रेल्वे नगर परिषद,कॉ. विनोद जोशी,कॉ. लता सोनारकर, भारतीय महिला फेडरेशन,कॉ. सुरेश जोशी,कॉ. राऊत,कॉ. ढोके,कॉ दुर्योधन,कॉ प्रशांत पाटील आदी उपस्थित होते.

## जि.प.चे ६व ७ वीचे वर्ग सुरू करण्यासाठी निवेदन

**आसेगाव पूर्णा-**दोनोडा येथील ग्रामस्थांनी जिल्हा परिषद शाळेतील शिक्षणावरील विश्वास व्यक्त करत गावात इयत्ता ६ वी व ७ वी वर्ग सुरू करण्याची मागणी केली आहे. यासाठी महिला पालकांनी पुढाकार घेत अमरावती येथे जाऊन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी व शिक्षणाधिकारी संघरत्न सरोदे यांना निवेदन सादर केले.सध्या गावात इयत्ता ५ वीपर्यंत शाळा असून पुढील शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना अन्य गावात पायपीट करावी लागते. जिल्हा परिषद शाळेत दर्जेदार शिक्षण मिळत असल्याने आपल्या मुलांचे शिक्षण याच शाळेत व्हावे, अशी पालकांची इच्छा आहे.निवेदनाद्वारे महिलांनी गावातील आर्थिक परिस्थिती, विद्यार्थ्यांची गैरसोय व नवीन वर्गांची गरज याकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. मराठी शाळा बंद पडत असताना दोनोडा गावातील पालकांनी मराठी भाषा व जिल्हा परिषद शाळांचे महत्त्व अधोरेखित करत नवीन वर्ग मंजूर करण्याची मागणी केली.यावेळी राजेश वानखेडे, गणेश खांडे, प्रितम साबळे, उषा भानगे, शितल खांडे, प्रतिभा देवबाले, सोनाली धुमाळे, साक्षी धुमाळे, पूजा गुळदे, पूनम शिंगणे, राधिका डवंगे, नम्रता वाघ आदी उपस्थित होते.



## पावसाळ्यापूर्वी नालेसफाईला आला वेग
### आरोग्य सभापती ने केली प्रत्यक्ष पाहणी

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

नागरिकांच्या आरोग्य विषयक प्रश्नाला प्रथम स्थान देत पावसाळ्यात कोणत्याही गैरसोयीचा सामना करावा लागू नये या उद्देशाने आगामी पावसाळ्याच्या पूर्वी नांदगाव शहरातील नालेसफाई व जल निसारण व्यवस्थेच्या कामाने वेग घेतला असून स्वच्छता व नालेसफाईच्या कामाची आरोग्य व स्वच्छता सभापती जोशना धवसे यांनी प्रत्यक्ष पाणी केली त्यावेळी न.प. चे मुख्य अधिकारी निवृत्ती भालकर आरोग्य व स्वच्छता निरीक्षक सोनटक्के सुपरवायझर प्रतीक शिरसाट यांची उपस्थिती होती.



प्रशासनाला जबाबदारीची जाणीव करून देत शहरातील प्रमुख नाले गटार व जलनिस्तारांच्या कामाची पाहणी करून कामाच्या गुणवत्तेचा आढावा आरोग्य

सभापती यांनी घेतला पावसाळ्यापूर्वी शहरातील प्रत्येक नाला व गटार पूर्णपणे साफ करणे आवश्यक असून स्वच्छतेच्या कामात हलगर्जी करणाऱ्यावर प्रशासनाने कठोर कारवाई करावी असे निर्देश सुद्धा यावेळी आरोग्य सभापती यांनी संबंधित अधिकारी यांना दिले. स्वच्छता हि एक मोहीम असून नागरिकांच्या आरोग्याची निगडित जवाबदारी सुद्धा आहे. आरोग्य सभापती जोशना धवसे यांचे पुढाकाराने स्वच्छतेच्या प्रश्नावर न.प.प्रशासन अधिक गतिमान होऊन पावसाळ्यापूर्वी नांदगाव शहरातील स्वच्छतेसह नालेसफाईच्या कामाला वेग आला आहे.

# ४८ कोटींच्या वसुलीत महसूलचा ‘व्हीआयपी फॉर्म्युला’?

## आदिवासी चिमोटेंच्या सातबाऱ्यावर संपूर्ण बोजा; उद्योजक चांडक यांच्या साम्राज्याला अभय?

गाजीपूर-रुदाळी खाण फाईल्स

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** गाजीपूर येथील बहुचर्चित अवैध गौण खनिज उत्खनन प्रकरणातील तब्बल ४८ कोटी रुपयांच्या असा सवाल उपस्थित होत असून, महसूल प्रशासनाने संतोष चांडक यांना या प्रकरणातून एकप्रकारे ‘व्हीआयपी पास’ दिला आहे काय, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करीत आहेत.

### ४८ कोटींच्या दंडावर व्याज किती झाले?

या प्रकरणातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आता चर्चेत आला आहे. शासनाने आकारलेला दंड अनेक वर्षांपासून प्रलंबित असताना त्यावर व्याजाची गणना करण्यात आली का, हा प्रश्न उपस्थित होत आहे. सामान्य नागरिकाचा मालमत्ता कर, महसूल, पाणीपट्टी किंवा इतर कोणतीही शासकीय थकबाकी राहिली तर त्यावर व्याज आकारले जाते. मात्र गाजीपूर प्रकरणात आजही तीच ४८ कोटी रुपयांची रक्कम चर्चेत असल्याचे दिसते. आदेशानंतरच्या कालावधीत व्याज किती वाढले? शासनाचे नेमके किती नुकसान झाले? हा हिशोब कोण ठेवत आहे? याबाबत प्रशासनाने कोणतीही स्पष्ट माहिती दिलेली नसल्याने शंका अधिकच गडद होत आहे.

दंडवसुलीवरून महसूल प्रशासन पुन्हा एकदा प्रश्नांच्या भोवऱ्यात सापडले आहे. शासनाचा कोट्यवधी रुपयांचा दावा वसूल करण्यासाठी महसूल विभागाने आदिवासी व आर्थिकदृष्ट्या मर्यादित साधनसंपत्ती असलेल्या विलास चिमोटे यांच्या सातबाऱ्यावर बोजा चढविण्याची घाई दाखविली; मात्र त्याच प्रकरणातील दुसरे प्रमुख पक्षकार आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम उद्योजक संतोष चांडक यांच्या मालमत्ता, उद्योग, यंत्रसामग्री, वाहने आणि आर्थिक स्रोतांच्या बाबतीत महसूल विभागाने संशयास्पद मौन बाळगल्याची चर्चा आता उघडपणे सुरू झाली आहे.

यामुळेच ’दंड दोघांवर आणि कारवाई फक्त एकावर?’

महसूल विभागाने चिमोटे यांच्या जमिनीवर शासनाचा दावा नोंदवून कारवाई झाल्याचे चित्र उभे केले असले, तरी ४८ कोटी रुपयांची वसुली प्रत्यक्षात त्या जमिनीतून होणे जवळपास अशक्य असल्याची चर्चा महसूल वर्तुळातच सुरू आहे. संबंधित जमिनीचे बाजारमूल्य आणि दंडाची रक्कम यांचा विचार करता संपूर्ण दंड तर दूरच, त्यातील किरकोळ भागही वसूल होणे कठीण असल्याचे जाणकारांचे मत आहे. अशा परिस्थितीत महसूल प्रशासनाने आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या दुसऱ्या पक्षकाराच्या मालमत्तांचा शोध घेतला का? त्यांच्या उद्योगांची, यंत्रसामग्रीची, वाहनांची किंवा आर्थिक व्यवहारांची तपासणी केली का? या प्रश्नांची उत्तरे

### सर्व सामान्यांना दिसणारे उद्योग महसुलच्या अधिकाऱ्यांना दिसत नाही का ?

स्थानिक स्तरावर सुरू असलेल्या चर्चेनुसार, दंड आदेशाशी संबंधित असलेले चांडक यांचे उद्योग आणि व्यावसायिक उपक्रम अनेक वर्षांपासून कार्यरत आहे. स्टोन क्रशर, डांबर हॉट मिक्स प्लांट, वाहने, मशिनरी आणि इतर मालमत्ता यांची माहिती विविध शासकीय कार्यालयांकडे उपलब्ध असण्याची शक्यता असताना महसूल प्रशासनाने या स्रोतांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे. सामान्य नागरिकाच्या बाबतीत किरकोळ महसूल थकबाकीसाठी जप्ती, नोटिसा आणि विविध निर्बंध लावणारी यंत्रणा येथे मात्र निष्क्रिय का झाली, हा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.

### महसूल अधिकारी ‘मुक्या प्रेक्षकांच्या’ भूमिकेत?

सामान्य नागरिकाच्या बाबतीत कठोर भूमिका घेणारे महसूल प्रशासन या प्रकरणात मात्र अत्यंत सावध आणि संथ गतीने वागत असल्याची टीका आता उघडपणे होत आहे. काही नागरिक तर ’धनदांडग्यांसमोर महसूल अधिकारी सर्कसमधील मुक्या प्रेक्षकांसारखे झाले आहेत’ अशा शब्दांत संताप व्यक्त करीत आहेत.कारण एका बाजूला गरीब आदिवासी जमीनमालकाच्या सातबाऱ्यावर शासनाचा दावा नोंदविला जातो, तर दुसऱ्या बाजूला आर्थिकदृष्ट्या सक्षम पक्षकाराच्या मालमत्तांचा शोध घेण्याचीही तयारी दिसत नाही, अशी भावना व्यक्त होत आहे.

मात्र अद्याप गुलदस्त्यातच आहे. परिणामी सदर प्रकरणात महसूल प्रशासनाचा दंडाच्या रक्कमेबाबत करण्यात आलेल्या कारवाईतून दूजाभाव झाल्याची भावना व्यक्त होत आहे.

### अपील दाखल अन् वसुलीला ‘ब्रेक’?

या प्रकरणातील आणखी एक चर्चेचा मुद्दा म्हणजे संतोष चांडक यांनी उपविभागीय अधिकाऱ्यांकडे दाखल केलेली अपील याचिका. संबंधित शासन निर्णयानुसार अशा प्रकरणांमध्ये दंडाच्या रकमेचा काही भाग जमा करणे अपेक्षित असते, अशी चर्चा महसूल वर्तुळात सुरू आहे.

मात्र या प्रकरणात दंडाच्या रकमेतील एक रुपयाही जमा न होता याचिका स्वीकारण्यात आल्याचा आरोप केला जात आहे. कायदेशीरदृष्ट्या अपील दाखल केल्याने दंडाची वसुली आपोआप थांबत नाही. तरीदेखील प्रत्यक्षात या अपीलमुळे वसुली प्रक्रियेलाच ’ अर्थपूर्ण ’ ब्रेक लागल्याची चर्चा रंगत आहे. जर ही चर्चा खरी असेल, तर शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या महसुलाला फटका बसत असताना संबंधित अधिकारी नेमकी कोणती भूमिका घेत आहेत, हा प्रश्न निर्माण होतो.

# दगडाने ठेचून तरुणाची हत्या

## दोन आरोपी ताब्यात, दारू पिण्यातून झाला वाद





**चांदुर रेल्वे/प्रतिनिधीः-** दारू पिण्यातून झालेल्या वादात तरुणाची दगडाने ठेचून हत्या करण्यात आल्याची घटना तालुक्यातील राजना गावातील आदिशक्ती ढाब्या जवळ समोर आली आहे. यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. प्रकरणाचे गांभीर्य पाहून पोलिसांनी दोन तासात फरार होण्याच्या फिरकीत असणाऱ्या दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले आहे. त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली आहे. नितीन मोरेश्वर भगत (वय ३०, राजना) असे हत्या झालेल्या तरुणाचे नाव आहे.तर प्रफुल सुभाष राऊत (वय २६) व रोशन विश्वासराव मेश्राम (वय ३०, दोघे राहणार राजना, चांदुर रेल्वे) हे आरोपी आहे. माहिती नुसार मृतक नितीन मोरेश्वर भगत हा राजना परिसरातील मोहम्मद आसिफ मोहम्मद खालीद यांच्या शेतात ट्रॅक्टर ने शेणखत टाकत होता. यावेळी त्याच्या सोबत गावातील मयूर मधुकर चौधरी ,सुरज विजय मेश्राम, बाळकृष्ण गंगाराम मेश्राम व प्रवीण गंगाराम मेश्राम हे काम करत होते. बुधवारी रात्री दीड वाजता दरम्यान आरोपी रोशन विश्वासराव मेश्राम व प्रफुल सुभाष राऊत यांनी नितीन भगत याला फोन केले आणि सरळ शेतात गेले. त्यांनी नितीन भगत याला तू आम्हाला दारू पाजतो का ? यावरून त्याच्याशी वाद घातला आणि त्याच्यावर लोखंडी सत्तुर, फावडा ने मारत गंभीर जखमी केले व नंतर मोठा दगड मृतकाच्या डोक्यावर टाकून ठार मारले. सदर घटनेची माहिती मृतकासोबत काम करणारे सहकाऱ्यांनी गावात जाऊन त्यांच्या भाऊ प्रवीण मोरेश्वर भगत (वय ४३) याला दिली. भावाने पोलीस पाटील☞(पान २ वर)

# कोणार्क कंपनीच्या सुपरवायझरची हत्या

## उपचारादरम्यान घेतला अखेरचा श्वास, कुटुंबीयांचा रूग्णालयात गोंधळ





**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिका अंतर्गत स्वच्छता ठेकेदार कंपनी कोणार्क चे सुपरवायझर मोहम्मद रफीक मोहम्मद युनुस यांनी उपचार दौरान अखेरचा श्वास घेतला. रविवार ३१ मे रोजी अकोली स्थित कचरा डेपो परिसरात दोन सह कर्मचाऱ्यांनी त्यांच्यावर प्राणघातक हल्ला केला होता. या हल्ल्यात ते गंभीरित्या जखमी झाले होते. गुरुवारी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ही घटना माहीत होताच कुटुंबीयांनी आक्रोश केला आणि रिम्स हॉस्पिटलमध्ये जाऊन गोंधळ घातला .

मोहम्मद रफीक यांचा मृत्यू झाल्याने बडनेरा पोलिसांनी या प्रकरणी हत्येचे कलमे वाढवले आहे. यापूर्वीच हल्ला करणाऱ्या दोन कर्मचाऱ्यांना पोलिसांनी अटक देखील केली आहे.

कुटुंबीयांनी आरोप लावला की पोलिसांनी आरोपींना अटक करताना उशीर केला आणि कोणार्क कंपनीने निष्काळजीपणा दाखवला. त्यामुळे रफिक यांना आपला जीव गमवावा लागला.

परिस्थिती पाहता हॉस्पिटल परिसरात तणाव निर्माण झाला होता. पोलिसांनी अतिरिक्त बंदोबस्त तैनात केला.

याप्रकरणी माहिती अशी की रविवार ३१ मे च्या सकाळी ११ वाजता अकोली मिनी कंपोस्ट डेपो परिसरात मोहम्मद रफीक आपले कर्तव्य बजावत होते. कंपनीचे दोन अन्य कर्मचारी आदर्श कैथवास आणि त्याचा ड्रायव्हर यांनी रफिक वर मागून लोखंडी रॉड व फावड्याने हल्ला केला ,त्यामुळे ते रक्ताच्या थारोळ्यात☞(पान २ वर)

# प्राणघातक हल्ल्यातील जखमी तरुणाचा मृत्यू



## दोघांना अटक, दोन फरार

**महात्मा फुले नगर येथील घटना**

**अमरावती/प्रतिनिधीः-** नवसारी परिसरातील महात्मा फुले नगरात घरगुती वादात तरुणावर प्राण घातक हल्ला करण्यात आला होता. या हल्ल्यात गंभीर जखमी शेखर सुनील नेतनराव (वय २७, महात्मा फुले नगर) याचा उपचारादरम्यान आज गुरुवार ४ जूनच्या पहाटे नागपूर मध्ये मृत्यू झाला.

माहितीनुसार शेखर नेतनराव २० मेच्या रात्री आपल्या घरासमोर एकटा मोबाईल पहात बसला होता. त्यावेळी हातात चाकू घेऊन आलेल्या आरोपी क्षितिज टेंभरे, हर्षल पोहकार, भूषण पोहकार सर्व राहणार नवसारी व इतर एक यांनी त्याच्यावर चाकूने सपासप वार केले. आरोपी क्षितिज टेंभरे याचा १९ मे रोजी रात्री त्याच्या बायको सोबत वाद झाला होता. या वादात शेखर नितनराव याने मध्यस्थी केली होती आणि क्षितिजला समजाविले होते. याची खुन्नस मनात ठेवून दुसऱ्या दिवशी आरोपीने आपल्या सहकाऱ्यांसोबत मिळून त्याच्यावर चाकुने प्राण घातक हल्ला केला होता. या हल्ल्यात तो गंभीर जखमी झाला होता. त्याला जिल्हा सामान्य रुग्णालयात☞(पान २ वर)

# शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख नरेंद्र पडोळे यांचा राजीनामा

## शिंदे गटात प्रवेश घेणार



**अचलपूर/प्रतिनिधीः-** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे अचलपूर- मेळघाट जिल्हाप्रमुख नरेंद्र उत्तमराव पडोळे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना पाठविलेल्या पत्रातून त्यांनी संघटनेतील अंतर्गत गटबाजी, पदाधिकाऱ्यांच्या कामात होणारा हस्तक्षेप आणि कार्यकर्त्यांना योग्य न्याय मिळत नसल्याबाबत नाराजी व्यक्त केली आहे. राजीनामा पत्रात पडोळे यांनी नमूद केले की, १९८५ पासून शिवसेनेत विविध पदांवर काम करताना शाखाप्रमुख, विभागप्रमुख, तालुकाप्रमुख, उपजिल्हाप्रमुख आणि जिल्हाप्रमुख अशी जबाबदारी त्यांनी सांभाळली. तसेच ग्रामपंचायत सदस्य, सेवा सहकारी संस्थेचे संचालक आणि पंचायत समिती सभापती म्हणूनही त्यांनी काम केले आहे. पक्षाचे नेते खासदार अरविंद सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली संघटना ☞(पान २ वर)

# अपक्ष उमेदवार प्रशांत महल्ले यांची माघार

## -पोटे, देशमुख, विश्वकर्मा यांच्यात लढत

### विधान परिषद निवडणुकीचे चित्र स्पष्ट



**अमरावती/प्रतिनिधीः-** विधान परिषदेच्या अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीचे चित्र आज गुरुवार ४ जून रोजी नामांकन अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी स्पष्ट झाले आहे. शेवटच्या दिवशी अपक्ष उमेदवार प्रशांत महल्ले यांनी निवडणुकीतून माघार घेतली आहे. दुसरीकडे,(पान २ वर)

# रुक्मिणी नगर परिसरात नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई

**अमरावतीः** रुक्मिणी नगर परिसरात प्लास्टिक जप्ती व डस्टबिन तपासणीची विशेष मोहीम यशस्वीपणे राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान एकूण १४ आस्थापनांची तपासणी करण्यात आली. तपासणीवेळी काही ठिकाणी कापडी व कागदी पिशव्यांसह ५१ मायक्रॉनपेक्षा अधिक जाडीच्या प्लास्टिकचा वापर आढळून आला. प्लास्टिक वापराबाबतच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर नियमानुसार कारवाई करण्यात आली. कारवाईदरम्यान मातोश्री रिअल फ्रुट सेंटर यांच्याकडून ५,००० रकमेचा धनादेश प्राप्त झाला. सदर मोहिमेत प्लास्टिक नोडल अधिकारी ए. के. गोहर, ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक कुंदन हडाले तसेच स्वास्थ निरीक्षक विनोद टांक, ☞(पान २ वर)

# पोलिसांची अवैध दारू विक्रेत्यावर कारवाई

## -१ लाख १५ हजारांचा मुद्देमाल जप्त



**अंजनगाव सुर्जी / प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशनच्या पथकाने अवैध दारू धंद्यांविरुद्ध धडक मोहीम राबवत एका इसमाला रंगेहात पकडले आहे. या कारवाईत पोलिसांनी ३० हजार रुपये किमतीची देशी दारू आणि गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल असा एकूण १ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.दिनांक ३ जून २०२६ रोजी पोलीस☞(पान २ वर)

# उपनिबंधक नोंदणी कार्यालयात गोंधळ

## आंतरजातीय विवाहाला कुटुंबीयांचा विरोध

### वर - वधू पक्षात धक्काबुक्की



**अमरावती/प्रतिनिधीः-** प्रेम विवाह करण्यासाठी आलेल्या तरुण-तरुणीच्या विवाहाला कुटुंबीयांनी विरोध केल्याने जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील उपनिबंधक कार्यालयात आज गुरुवार ४ जून रोजी जबरदस्त ड्रामा पहायला मिळाला. दोन्ही पक्षांमध्ये धक्काबुक्की ☞(पान २ वर)

# लोकेश चंद्र यांना महा आयकॉन पुरस्कार

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रदान



**अमरावती / मुंबईः-** मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तसेच महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांचा विजेच्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल ‘महा आयकॉन २०२६’ हा जीवनगौरव पुरस्कार देऊन पुढारी’ माध्यम समूहातर्फे गौरव करण्यात आला. केंद्रीय भूपृष्ठ☞(पान २ वर)